पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

रविवार, दि. ०२ फेब्रुवारी, २०२५ | वर्ष : १३ | अंक : ०२७ | पाने ८ | किंमत २ रुपये

www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ नारायणगाव येथे राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहाचे आयोजन

४ गौतम बँकेच्या व्हा.चेअरमनपदी सुनील डोंगरे यांची निवड

५ ठाण्यात टाकाऊ वस्तुंपासून पालिकेने बनविल्या



पान ८ वर..

# मध्यमवर्गीयांना दिलासा : १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त : किसान क्रेडीट कार्ड कर्ज मर्यादा पाच लाख

**जनप्रवास । वृत्तसंस्था**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या तिसर्या कार्यकाळातील २०२५–२६ वर्षासाठीचा संपूर्ण अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन संसदेत सादर केला. हा अर्थसंकल्प सादर करत सीतारामन यांनी सलग आठ अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम नोंदवला. आजच्या या अर्थसंकल्पात निर्मला सितारामन यांनी सर्वसामान्याचं लक्ष लागून असलेल्या टॅक्सबाबत मोठी घोषणा केली. यावेळी १२ लाखांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त असल्याचं त्यांनी जाहीर करत त्यांनी मध्यमवर्गियांना मोठा दिलासा दिला. यासह आजच्या बजेटमधून त्यांनी शेतकरी, सूक्ष्म व लघू उद्योग यासह विज्ञान आणि तंत्रज्ञानावर भर दिल्याचं पाहायला मिळत आहे.

अर्थसंकल्प उघडताच शेतकर्यांसाठी नवी धनधान्य योजना; बिहारसाठी विशेष बोर्ड, शेतकर्यांसाठी महत्वाच्या मानल्या जाणार्या किसान क्रेडिट कार्डवरील कर्जाची मर्यादा त्यांनी ३ लाखांवरून ५ लाखांवर केली, तर यूरीया निर्मितीत देशाला आत्मनिर्भर करण्यासाठी तीन नवीन कारखाने उभारणार असल्याची घोषणा सीतारामन यांनी केली.

तसंच देशात ३ एआय सेंटर उभारण्यात येणार असून लोकांसाठी परदेशी प्रवासासाठी गरजेचा असलेल्या व्हिजासाठीचे नियम सोपे करत तो सहज उपलब्ध व्हावा यासाठी अनेक नियमांत बदल करण्यात आले आहेत, तर पुढील आठवड्यात इन्कम टॅक्स बील पुढील संसदेत मांडले जाणार आहे. यांसह कस्टम ड्युटीतून ३६ महत्वाची औषधे वगळली जाणार असून कॅन्सरवरील औषधे कस्टम ड्युटीतून वगळण्यात येणार असल्याची घोषणाही अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केली.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी मोदी सरकार ३.० चा अर्थसंकल्प आज सादर करण्यास सुरूवात केली. मात्र त्यांच्या भाषणाच्या सुरूवातीलाच काँग्रेससह सपाच्या खासदारांनी जोरदार गदारोळ करत सभात्याग केला, सभागृहात एकच गोंधळ सुरू झाला होता. अशा गोंधळातच सीतारामण यांनी अर्थसंकल्पाच्या भाषणाला सुरूवात केली. यावेळी त्यांनी, आम्ही विकसित भारतासाठी अर्थसंकल्प सादर करत असून सरकारची कामगिरी सांगत आहे. मी गरीब, तरुण, शेतकरी आणि महिलांची विशेष काळजी घेण्याबद्दल बोलत असल्याचे म्हटले. यानंतर अर्थमंत्र्यांनी शेतकरी आणि कृषी क्षेत्रासाठी एक नवीन योजना जाहीर केली आहे. नवीन योजनेत राज्यांसोबत भागीदारी असेल. या योजनेत १०० जिल्हे समाविष्ट केले जातील. ज्याचा लाभ १.७ कोटी शेतकर्यांना होणार आहे. ग्रामीण भागातील होणारे स्थलांतर थांबवून नव्या संधी निर्माण करण्याचा असल्याचेही त्या म्हणाल्या.

नवीन योजना तरुण आणि महिलांवर लक्ष केंद्रित करणारी असून त्यांना आपल्या घराजवळ राहून रोजगार करता येणार आहे. या योजनेतून शेतकर्यांना खात्री देण्यात येणार आहे की, त्यांचे पीक खरेदी केले जाईल, यासाठी केंद्र सरकार थेट धान्य खरेदीचे काम सुरू करेल.

दरम्यान सरकारने तूर, उडद आणि मसूर यांसारख्या डाळींच्या खरेदीसाठी रणनीती आखली असून किंमत समर्थन योजना आणि किंमत स्थिरीकरण निधीचा वापर करण्यात येणार असल्याचेही अर्थमंत्र्यांनी सांगितले आहे. तर सरकारने १०० टक्के उडीद, तुळस आणि मसूर डाळी खरेदी करण्याचे आश्वासन दिले आहे.


किसान क्रेडिट कार्ड

आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्र्यांनी, किसान क्रेडिट कार्डची मर्यादा वाढवल्याची घोषणा केली असून आता किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ३ लाखांवरून ५ लाखांपर्यंत करण्यात आली आहे. याचा थेट लाभ ७ कोटींहून अधिक शेतकर्यांना कर्जासाठी होणार आहे, तर किसान क्रेडिट कार्ड ७.७ कोटी शेतकरी, मच्छीमार आणि दुग्ध उत्पादकांना अल्पकालीन कर्ज सुविधा देत राहील, असे म्हटले आहे.

- टीव्ही, मोबाईल स्वस्त होणार
- डाळी, खाद्यतेलांसाठी ६ वर्षांचे विशेष अभियान
- चामड्यांच्या वस्तु स्वस्त होणार
- वैद्यकीय महाविद्यालयांसाठी ७५ हजार अधिक जागा उपलब्ध करून देणार
- कॅन्सरवरील औषधे स्वस्त होणार, ३६ औषधांवरील कस्टम ड्युटी माफ.
- तेलबियांची हमीभावाने १०० टक्के खरेदी करणार.
- २०० डे – केअर कॅन्सर उपचार केंद्र उभे करणार
- आयआयटी क्षमतावाढ प्रकल्प राबवणार
- कौशल्य प्रशिक्षणासाठी ५ राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्रे



## विकसित भारताची स्वप्नपूर्ती करणारा अर्थसंकल्प ! : ना. चंद्रकांतदादा पाटील



पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामनजी यांनी सादर केलेला अर्थसंकल्प क्रांतिकारक अशा स्वरूपाचा आहे. १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करुन केंद्राने मध्यमवर्गियांसाठी खूप मोठा दिलासा दिला आहे. वैद्यकीय सुविधा, पायाभूत सुविधांचे प्रकल्प, संरक्षण, शिक्षण अशा विविध क्षेत्रासाठी करण्यात आलेली तरतूद भारताला प्रगतीची नवी दारे उघडून देणारी आहे. या अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्रात बदल घडवण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या तरतूदी मांडण्यात आल्या आहेत. आयआयटीच्या ६ हजार ५०० जागा आणि वैद्यकीय महाविद्यालयात ७५ हजार जागा वाढविण्याचा निर्णय ही तरुणांसाठी मोठी सुसंधी आहे. महिला, तरुण, शेतकरी, मध्यमवर्गीय अशा सर्वच घटकांचा विचार करणारा हा अर्थसंकल्प २०४७ विकसित भारत हे स्वप्न साकारण्याच्या दृष्टीने टाकलेले ठाम पाऊल आहे. अशा सर्वस्पर्शी अर्थसंकल्पाबद्दल पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी आणि अर्थमंत्री माननीय निर्मला सीतारामनजी यांचे मन:पूर्वक धन्यवाद!

## मध्यमवर्गियांसाठी स्वप्नवत : फडणवीस



मध्यम वर्गासाठी एक स्वप्नवत असा अर्थसंकल्प मांडला आहे. अपेक्षेपेक्षा अधिक देण्याचा प्रयत्न केला आहे. १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्यात आले आहे. सात लाखांची असलेली मर्यादा थेट १२ लाखांपर्यंत नेण्यात आली आहे. त्यामुळे आता १२ लाख उत्पन्न असलेल्यांना कोणताही कर भरावा लागणार नाही. याचा मोठा फायदा मध्यमवर्गीय, नोकरदार आणि तरुणांना होणार आहे. यामुळे मोठे उत्पन्न मध्यमवर्गीयांच्या खिशात येणार आहे. हे उत्पन्न खर्च करताना देशातील मागणी वाढेल. ज्याचा थेट फायदा सूक्ष्म, लघू आणि मध्यम उत्पादनांना होईल. यातून रोजगार निर्मितीही होईल.

## लक्ष्मीच्या पाऊलखुणा उमटल्या...



हा अर्थसंकल्प सर्वसामान्यांना दिलासा देणारा असून १२ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर संपूर्ण करमुक्ती मिळाल्याने घराघरात लक्ष्मीच्या पाऊलखुणा उमटल्या असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोशल मिडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' वर पोस्ट केली आहे. ते म्हणाले की, देशाचे लोकप्रिय आणि कर्तृत्ववान पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी विकसित भारताचं पाहिलेलं स्वप्न प्रत्यक्षात येणार, याची खात्री देणारा केंद्र सरकारचा अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पात सामान्य नोकरदार वर्गाला जो दिलासा मिळाला आहे, त्याचं वर्णन अभूतपूर्व असंच करावं लागेल.

## मध्यमवर्गीयांना मोठा दिलासा



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात बारा लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करुन मध्यमवर्गीय देशवासियांना मोठी भेट दिली आहे. अर्थसंकल्पातील नव्या कररचनेमुळे १२ लाख उत्पन्न असलेल्या करदात्यांना ८० हजारांची सूट दिल्याने त्यांना शंभर टक्के करमाफी मिळणार आहे. १८ लाख उत्पन्नधारकांना ७० हजारांचा फायदा होणार आहे. २५ लाख उत्पन्न असलेल्यांचा कर १ लाख २५ हजारांनी कमी होणार आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी टीडीएस मर्यादा ५० हजारांहून १ लाख करण्याचा निर्णयही स्वागतार्ह आहे. कॅन्सर आणि इतर गंभीर आजारांवरील ३६ जीवनावश्यक औषधांवरील सीमाशुल्क संपूर्ण माफ केल्याने ही औषधे स्वस्त होणार आहेत.

## संक्षिप्त

### ...तेव्हा शरद पवार यांनी घाई केली : छगन भुजबळ

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : 'तेलगी प्रकरणाशी कोणताही संबंध नसताना शरद पवार यांनी माझा उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्रीपदाचा राजीनामा घेतला, मात्र, त्यानंतर झालेल्या चौकशीमध्ये माझ्यावरील कोणतेही आरोप सिद्ध झाले नाहीत. एक प्रकारे शरद पवार यांनी माझा राजीनामा घेण्याची घाई केली,' असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी येथे केला. ओबीसींसाठी दोन वेळा मुख्यमंत्रिपद सोडले, अन्यथा तेव्हाच मुख्यमंत्री झालो असतो, असेही ते म्हणाले. जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे नर्हे येथील संस्थेच्या सभागृहात आयोजित आठव्या युवा संसदेमध्ये २ रा संसद कट्टा अंतर्गत भुजबळ यांची विशेष मुलाखत झाली.

## १५ ठिकाणी खासगी टँकरच्या पाण्यातच जीवाणू असल्याचे उघड !

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : गुइलेन बॅरे सिंड्रोमची (जीबीएस) लागण झालेले रुग्ण आढळत असलेल्या भागांत खासगी टँकरनेही पाणीपुरवठा होतो. हे टँकर जेथून पाणी घेतात, अशा १५ ठिकाणच्या पाण्यात ई–कोलाय जीवाणू आढळला आहे. महापालिकेने आवाहन करूनही टँकरमालकांनी आवश्यक ती काळजी न घेतल्याने हे घडल्याचे उघडकीस आले आहे.




शहरात गेल्या काही दिवसांपासून खडकवासला, धायरी, किरकिटवाडी आणि आजूबाजूच्या परिसरात जीबीएस' रुग्णांची संख्या वाढत आहे. या भागातील नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या पाण्याचे स्रोत आणि अन्नपदार्थांची तपासणी करण्याचे काम महापालिकेच्या वतीने केले जात आहे. या परिसरातील सोसायट्यांना पाणीपुरवठा करणारे खासगी टँकर ज्या केंद्रांवरून पाणी भरतात, त्याचीही तपासणी करण्यात आली होती. त्याचा अहवाल आला असून, या पाण्यामध्ये ई–कोलाय' जीवाणू आढळला आहे. त्यामुळे पाणीपुरवठा करताना टँकरचालकांनी ब्लीचिंग पावडरचा वापर करावा, अशी सूचना महापालिकेने केली आहे. यासाठी महापालिकेने ब्लीचिंग पावडरदेखील मोफत उपलब्ध करून दिली आहे. मात्र, अनेक टँकरचालकांनी ही पावडर नेण्याकडेही दुर्लक्ष केले आहे. केवळ तीन ते चार टँकर मालक महापालिकेकडून ब्लीचिंग पावडर घेऊन गेले असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी दिली. ई–कोलाय जीवाणू सापडलेल्या सर्व केंद्रांना तातडीने नोटीस बजाविण्यात येणार असून, महापालिकेने दिलेल्या ब्लीचिंग पावडरचा वापर टँकरमध्ये करून त्यानंतरच नागरिकांना पाणी द्यावे, अशी सूचना दिली आहे. या भागात पाणीपुरवठा करणाऱ्या अनेक खासगी टँकर मालकांची महापालिकेकडे नोंदच नाही. वास्तविक टँकरमधून पाणी पुरविताना ते कोठून भरले जाते, याची माहितीही महापालिकेला देणे बंधनकारक आहे. मात्र, त्याकडेही दुर्लक्ष केले जात आहे. नंदकिशोर जगताप म्हणाले, जीबीएसचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी पालिका आवश्यक ती काळजी घेत आहे. खाजगी टँकर मालकांनी ब्लिचिंग पावडरचा वापर करावा यासाठी पालिकेने सूचना केलेल्या आहेत. टँकरमालकांनी महापालिकेच्या सूचनेकडे दुर्लक्ष केल्यास, त्यांच्यावर सार्वजनिक आरोग्याला नुकसान पोहोचविल्याचा ठपका ठेवून जेथे हा जीवाणू आढळला ती केंद्रे कायमची बंद केली जातील.

## कात्रज भागात अमली पदार्थ विक्री करणारा गजाआड

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : अमली पदार्थ विक्री प्रकरणात गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने एका तरुणाला अटक केली. कात्रज भागातील मांगडेवाडी परिसरात ही कारवाई करण्यात आली. आरोपीकडून चरस, मोबाइल संच, रोकड असा एक लाख ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

शिवलिंग नागनाथ आवटे (वय ३९, रा. शंभू रेसीडन्सी, मांगडेवाडी, कात्रज) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. त्याच्याकडून ९८ ग्रॅम चरस, दोन मोबाइल संच, रोकड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## कारवाईची भीती दाखवून ज्येष्ठ महिलेची साडेदहा लाखांची फसवणूक

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : काळ्या पैसे व्यवहारात बँक खात्याचा वापर करण्यात आला असून, याप्रकरणात अटक करण्याची धमकी देऊन फसवणुकीचे प्रकार वाढीस लागले आहेत. एका ६९ वर्षीय महिलेला सायबर चोरट्यांनी धमकावून तिची साडेदहा लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

याप्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने खडकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला खडकीतील औंध रस्ता भागात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. काळ्या पैसे व्यवहारात बँक खात्याचा वापर करण्यात आला आहे. याप्रकरणात पोलिसांकडून अटक करण्यात येणार आहे. कारवाई टाळण्यासाठी तातडीने पैसे भरावे लागतील, अशी धमकी देऊन चोरट्यांनी महिलेला बँक खात्यात पैसे जमा करण्यास सांगितले. गेल्या दीड महिन्यात चोरट्यांनी महिलेला धमकावून वेळोवेळी पैसे घेतले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन चोरमोले तपास करत आहेत.

## पुण्याची वाहतूक कोंडी फुटणार !

### रिंगरोड प्रकल्पाला गती

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : शहरातील वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेऊन पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बाहेरून जाणाऱ्या रिंगरोडच्या कामाला फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात प्रारंभ होईल. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ १७० किमी लांबीच्या सहा पदरी रिंगरोडसाठी ४२,००० कोटी रुपये खर्च करणार आहे. या रिंगरोडचा वापर मुंबईकडे ये–जा करणाऱ्या जड वाहतुकीसाठी केला जाईल, ज्यामुळे पुणे आणि पिंपरी–चिंचवडमध्ये वाहतूक कोंडी कमी होईल. कात्रज–देहू रोड फक्त शहराच्या अंतर्गत वाहतुकीसाठी वापरला जाईल, आणि समांतर मेट्रो व बीआरटी प्रकल्प सार्वजनिक वाहतूक प्रणालीला बळकटी देतील.



पश्चिम रिंगरोड अंतर्गत सातारा रोडवरील खेड शिवापूरमार्गे जाणाऱ्या वाहनांसाठी सिंहगड किल्ल्याच्या मागे मोठा बोगदा बांधण्यात येणार आहे. या मार्गावर वाहने खडकवासला जलाशयावरील पुलावरून जातील. पुढे हा रस्ता हिंजवडी आयटी पार्कच्या मागून पौड रोड ओलांडेल आणि ग्रामीण भागातून कुसगाव जलाशयाच्या मागे जाईल. शेवटी, हा मार्ग मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गाच्या उर्से भागाशी जोडला जाणार आहे, ज्यामुळे वाहतूक अधिक सुलभ होईल.

पूर्व रिंगरोड सातारा रोडवरील वाहतूक सासवड–बोपदेव रोड आणि पंढरपूर रोड ओलांडून पूर्वेकडे वळवेल. हा मार्ग प्रस्तावित पुरंदर विमानतळातून सोलापूर रोडला जोडला जाईल आणि लोणीकंदमार्गे शहराच्या मुख्य रस्त्याशी मिळेल. पुढे, हा रस्ता आळंदीमार्गे नाशिकरोडपर्यंत पोहोचेल. तसेच, तळेगाव, चाकण आणि शिक्रापूरच्या औद्योगिक क्षेत्रांसाठी हा रस्ता महत्त्वाचा ठरेल. यामुळे सोलापूर, नगर आणि नाशिक महामार्गांवरील वाहने पुणे आणि पिंपरी–चिंचवडच्या वाहतूक कोंडीपासून मुक्त होतील.

रिंग रोड दोन भागांत विभागला असून, पश्चिम रिंग रोड (६९ किमी) आणि पूर्व रिंग रोड (१०१ किमी) हे १२ विभागांमध्ये वाटले गेले आहेत. सर्व टप्प्यांच्या निविदा मंजूर होऊन कंत्राटदारांना कामाचे आदेश देण्यात आले आहेत. हे काम एकाच वेळी सुरू होणार आहे. पश्चिम रिंगरोडसाठी ९९% आणि पूर्व रिंग रोडसाठी ८६% जमीन संपादन पूर्ण झाले आहे.



# अक्षरधारा

**सलग आठव्यांदा अर्थसंकल्प मांडणाऱ्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना जागतिक पातळीवरील वाढती अस्थिरता, आर्थिक वाढीचा मंदावलेला वेग, सातत्याने रुपयाचे होणारे अवमूल्यन या देशातील आर्थिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आर्थिक सुधारणांचा वेग कायम ठेवण्याच्या दृष्टीने अर्थसंकल्प सादर करणे अपेक्षित होते. त्यादृष्टीने त्यांनी मध्यमवर्ग व तरुणाई खुश ठेवण्याचा प्रयत्न केला असला तरी देशाच्या आर्थिक विकासाचा वेग ७ टक्क्याच्या पुढे ठेवणे हेच खरे मोठे आव्हान आहे.**

## विकसित भारताचे गोंडस स्वप्न दाखविणारा अर्थसंकल्प

अर्थसंकल्पातून कुणाला काय काय मिळणार? कितनी खुशी और कितना गम हा नेहमीच उत्सुकतेचा विषय असतो. प्राप्तिकरात आम्हाला काय दिलासा मिळेल का अशी अपेक्षा ठेवणारा मध्यमवर्ग तर दुसऱ्या बाजूला कर्जमाफी कि अनुदान, कृषी क्षेत्राला दिलासा कि तोंडाला पाने पुसणे काय होईल याविषयी भाबड्या अपेक्षा ठेवून वाट पाहत बसणारा शेतकरी राजा. खरे तर अर्थसंकल्प सादरीकरण हे एक कौशल्य असते. एकाचवेळी सर्वांना खुश ठेवणे कोणत्याच अर्थमंत्र्यांना शक्य नसते. मात्र किमान सार्वजनिक कल्याणाच्या योजना सादर कराव्यात अशी अपेक्षा असते.

**मध्यमवर्गावर अधिक मर्जी बहाल :**

मध्यमवर्ग अर्थात नोकरदार हा अर्थव्यवस्थेचा कणा होऊ लागला आहे याची जाण आणि भान असणाऱ्या अर्थमंत्री महोदयांनी मध्यमवर्गावर अधिक मर्जी बहाल केली आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पावर नोकरदार मंडळी खुश आहेत. एकाचवेळी सर्वांना खुश ठेवणे कोणत्याच अर्थमंत्र्यांना शक्य नसते. मात्र अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मात्र नोकरदार मंडळीना खुश करून मतदान पेटी अधिक घट्ट करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. असे म्हटले तर फारसे वावगे होणार नाही.केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीतारमण यांनी मध्यमवर्गीयांसाठी मोठी घोषणा केली आहे. १२ लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करण्याची घोषणा त्यांनी आज केली. करमुक्त उत्पन्नाची मर्यादा वाढवण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून केली जात होती. दरम्यान, यंदाच्या अर्थसंकल्पात १० लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त होईल, असा अंदाज व्यक्त केला जात होता. परंतु, अर्थमंत्र्यांनी थेट १२ लाखांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करण्याची घोषणा केली आहे.आता १२ लाख रुपयांपर्यंतचे वार्षिक उत्पन्न असलेल्यांना कोणताही कर भरावा लागणार नाही. तसेच १२ लाखांच्या पुढे उत्पन्न असलेल्या करदात्यांनाही १,१०,००० रुपयांचा फायदा मिळू शकेल. असे असले तरी १ लाख कोटीचा महसूल घटणार आहे याचा विसर पडता कामा नये. सगळी नाटकं करता येतात पैशाचे नाटक करणे अवघड असते.त्यामुळे सकृतदर्शनी आनंद वाटत असला तरी महसूल कमी होणे म्हणजे कभी ख़ुशी कभी गम अशी अवस्था आहे.गरीब आणि मध्यम वर्गीयावर लक्ष्मीची कृपा राहो अशी अपेक्षा खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली होती ती अर्थमंत्र्यांनी फार कौशल्याने पूर्ण केली आहे.

**नवा आत्मविश्वास आणि उर्जा**

आत्मविश्वास आणि उर्जा याचा संबंध लक्ष्मीशी अधिक जवळचा आहे. रोजगार निर्मितीचा विचार केला तर किमान दरवर्षी १ कोटी लोकांना रोजगार मिळाला पाहिजे. विकासाचा दर ८ टक्के राहिलाच पाहिजे. एवढेच नव्हे तर आर्थिक विकासाच्या बाबतील विषमता राहता कामा नये अन्यथा शेतीचा आर्थिक विकासाचा दर जेमतेम ३ ते ४ टक्के आणि सेवा क्षेत्राचा दरअगदी १२ टक्क्यापर्यंत हे चित्र फारसे समाधानकारक नाही. जास्त असणे विकासाच्या दृष्टीने घातक आहे. रोजगार निर्मिती, गुंतवणुकीत वाढ, निर्मिती क्षेत्राला प्रोत्साहन या त्रिसूत्रीवर बरेच काही अवलंबून आहे. फक्त शिक्षणक्षेत्राला नियंत्रमुक्त अधिकाधिक स्वायत्तता देऊन सर्वच प्रश्न सुटणार नाहीत. आर्थिक साक्षरता हा विषय फार जुना झाला आहे. आता डिजिटल साक्षरता हाच खरा प्रश्न आहे. विकसित भारताचे स्वप्न उराशी बाळगून मांडलेला अर्थसंकल्प तरुणाईच्या देशात दरवर्षी १ कोटी लोकांना रोजगार मिळाला तरच भवितव्य आहे हे नाकारून कसे चालेल. अर्थव्यवस्था भक्कम असल्याचा दावा सरकारकडून केला जातो आहे. बेरोजगारी कमी होत असल्याचा दावा केला जातो आहे. रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे हेच खरे मोठे आव्हान पुढे आहे. केंद्र सरकार आणि भारतीय रिझर्व्ह बँक यांच्यापुढील महागाई हे सर्वात मोठे आव्हान आहे. महागाईचा दर ५.५ टक्केच्या वर





**अर्थतरंग**

**प्रा. संजय ठिगळे**

राहिला आहे तो कमी करावाच लागेल. वाढत्या ऑटोमायजेशनच्या युगात रोजगार वाढीच्या फार मोठ्या अपेक्षा ठेवणे अवघड आहे. देशातील श्रीमंतांची श्रीमंती वाढत चालली आहे हे आपणास नाकारून कसे चालेल. बेरोजगारी, विकासातील असमानता, वाढती महागाई, कृषी क्षेत्राचा विकासदर २०२२-२३ मध्ये ४.७ टक्के होता. तो पुन्हा कमी होतो आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा अर्थसंकल्प महत्वाचा वाटतो.

एका बाजूला शाश्वत आर्थिक विकासाच्या गप्पा मारायच्या तर दुसऱ्या बाजूला आर्थिक महासत्ता होण्याचे स्वप्न रंगवायचे अशा दुहेरी भूमिकेत असलेल्या सरकारला जगातली पहिल्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याचे स्वप्न सत्यात उतरण्यासाठी आर्थिक विषमता कमी करण्याकरिता कठोर पाऊले उचलावीच लागतील त्यासाठी अर्थसंकल्प हा एक राज मार्ग असतो. जनतेच्या दृष्टीने रोटी प्यारी असते हे जरी खरे असले तरी आणखी काय काय हवे असते याचा विचार महत्वाचा ठरतो.

**सर्वात वेगाने वाढणारी आपली अर्थव्यवस्था'**

आपली अर्थव्यवस्था सर्व प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे जगाचे लक्ष आपल्या अर्थव्यवस्थेने वेधले आहे. हे आता आम्हाला नवीन राहिले नाही त्यादृष्टीने विचार केला तर भारताचा विकासाचा दर ८.५ टक्क्याच्या पुढे कसा नेता येईल हाच खरा प्रश्न आहे. सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पात SC-ST च्या MSME महिला उद्योजकांसाठी विशेष कर्ज योजना आणली जाणार, पहिल्यांदाच उद्योजक होणाऱ्या महिलांना २ कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज मिळण्याची तरतूद होईल.महिला वर्गांनी नुकतीच मतदान पेटीच्या माध्यमातून चुणूक दाखविली असल्यामुळे हा निर्णय घेतला असावा. खासगी क्षेत्रातील गुंतवणूक वाढवण्याचा हेतू अर्थसंकल्पात साध्य केला आहे. तूर,मसूर आणि उडीदडाळ उत्पादनावर भर दिला जाणार आहे. विकासाचा भाग म्हणून शेती उत्पादकता वाढवण्याचा प्रयत्न केला जाणार असून १०० जिल्ह्यांवर लक्ष देले जाणार आहे. किसान क्रेडीट कार्डची मर्यादा ३ लाखावरून ५ लाखावर नेली आहे.युरिया निर्मितीच्या बाबतीत आत्मनिर्भर होण्याचा संकल्प सोडला असला तरी सेंद्रिय शेतीचे काय हा प्रश्न अनुत्तरीत राहतो.

सर्वात वेगवान अर्थव्यवस्था म्हणून उल्लेख केला जाणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेला एवढी आर्थिक तरतूद आणि योजना नक्कीच पुरेशा नाहीत. महागाई,बेरोजगारी आणि वाढती आर्थिक वित्तीय तुट या समस्या कायमच्या डोक्यावर बसल्या आहेत.किंवा बऱ्याचदा डोके वर काढताना दिसत आहेत.त्याचे त्रांगडे जोपर्यंत सुटत नाही तोपर्यंत काहीच उपयोग नाही.

**(लेखक आर्थिक व सामाजिक घडामोडीचे अभ्यासक आहेत. )**

## अडचणीत नेमके कोण....?



**मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण गेले ५० दिवसांहून अधिक राज्यभर गाजत आहे. याप्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांचे कारभारी वाल्मिक कराड आणि टोळीवर संशय व्यक्त होत आहे. या टोळीनेच ही हत्या केली आणि त्याचा संबंध खंडणी प्रकरणाशी आहे हे आता जवळपास स्पष्ट झाले आहे; परंतु या संपूर्ण प्रकरणात धनंजय मुंडेंवर थेट असा कोणताही आरोप नाही. अर्थात असे असले तरी वाल्मिक कराड हा धनंजय मुंडेमुळेच इतका ताकदवर झाला हे उघडच दिसत आहे. धनंजय मुंडे यांचा आशीर्वाद असल्याशिवाय वाल्मिक कराड आणि त्याच्या लोकांना अशी दादागिरी करता येणे शक्य नव्हते. परळीत धनंजय मुंडेचा सगळा कारभार वाल्मिक कराडच पाहतो असे म्हटले जाते. पंकजा मुंडेंनीदेखील एका जाहीर सभेत वाल्मिक कराडची ओळख धनंजय मुंडे यांचा उजवा हात अशीच करून दिली होती. एवढे सूर्यप्रकाशाईतके स्पष्ट असूनही ना धनंजय मुंडेंचा राजिनामा होतो ना कराडांचे थेट खुनाशी संबंध स्पष्ट होतात. मग नेमके अडचणीत कोण, धनंजय मुंडे की अजितदादा की सरकार हा प्रश्न मात्र चर्चेचा बनला आहे.**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात एकाचा अपवाद वगळता इतर सगळ्या आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यासोबतच या हत्या प्रकरणाशी संबंधित असलेल्या खंडणी प्रकरणातही धनंजय मुंडे यांचा खास हस्तक म्हणविला जाणारा वाल्मिक कराड यालादेखील अटक करण्यात आली आहे. या हत्या आणि खंडणी प्रकरणाचा तपास तीन स्तरावर होत आहे; परंतु या तपासात राजकीय दबाव येण्याची शक्यता लक्षात घेऊन विरोधकांनी धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याची मागणी सातत्याने लावून धरली आहे. देशमुख यांची हत्या होऊन आता पन्नासपेक्षा अधिक दिवस झाले आहेत. या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी सातत्याने रेटा सुरूच आहे.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन त्यांच्याकडे पुरावे सादर केले असल्याचा दावा केला होता. गेल्या बुधवारी धनंजय मुंडे दिल्ली दौऱ्यावर गेले असल्यामुळेते राजीनामा देतील, अशी जोरदार चर्चा होती; परंतु दिल्लीमध्ये आपली प्रतिक्रिया देताना धनंजय मुंडे यांनी आपल्या राजीनाम्याचा चेंडू मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्र्यांच्या कोर्टात टटविल्याचे दिसते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मी दोषी वाटत असेल तर त्यांनी माझा राजीनामा मागावा. मी राजीनामा देण्यास तयार आहे. मी दोषी आहे की नाही, हे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री सांगू शकतील. मला विनाकारण लक्ष्य केले जात आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली. मी नैतिकदृष्ट्यादेखील दोषी नाही हे सांगण्यासही ते विसरले नाहीत.



**राजरंग**

**अमृत चौगुले**

संतोष देशमुख यांची हत्या वाल्मिक कराडच्या टोळीने केली आणि त्याचा संबंध खंडणी प्रकरणाशी आहे हे आता जवळपास स्पष्ट झाले आहे; परंतु या संपूर्ण प्रकरणात धनंजय मुंडेंवर थेट असा कोणताही आरोप नाही. अर्थात असे असले तरी वाल्मिक कराड हा धनंजय मुंडेमुळेच इतका ताकदवर झाला हे उघडच दिसत आहे. धनंजय मुंडे यांचा आशीर्वाद असल्याशिवाय वाल्मिक कराड आणि त्याच्या लोकांना अशी दादागिरी करता येणे शक्य नव्हते. परळीत धनंजय मुंडेचा सगळा कारभार वाल्मिक कराडच पाहतो असे म्हटले जाते. पंकजा मुंडेंनीदेखील एका जाहीर सभेत वाल्मिक कराडची ओळख धनंजय मुंडे यांचा उजवा हात अशीच करून दिली होती. खरे तर धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांचे संबंध इतक्या ठळकपणे समोर आलेले असताना नैतिकदृष्ट्या धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यायला हवा होता किवा अजित पवारांनी त्यांच्याकडून हा राजीनामा घ्यायला हवा होता. मुख्यमंत्र्यांनीदेखील अजित पवारांवर या संदर्भात दबाव आणायला हवा होता; परंतु असे काहीही झालेले दिसत नाही. त्यातच भगवान गडाचे महंत नामदेवशास्त्रींनीही धनंजय मुंडे यांचा या प्रकरणाशी संबंध नसल्याचे सांगत त्यांची पाठराखण केली आहेच. शिवाय त्यांच्यावर आरोप करणाऱ्यांनाही त्यांनी खडेबोल सुनावले आहेत. यावरून वेगळाच वाद उफाळला आहे हा भाग निराळा.

अर्थात या संतोष देशमुख खून प्रकरणामुळे अडचणीत धनंजय मुंडे आहे की अजित पवार आणि मुख्यमंत्री, असा प्रश्न निर्माण होऊ पाहत आहे. धनंजय मुंडे फडणवीस-पवारांचे खास असल्यामुळे ते त्यांचा राजीनामा मागणार नाहीत, असा दावा आमदार संदीप क्षीरसागर यांनी केला आहे. खरे तर अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधात अगदी ठोस असे पुरावे अजित पवारांकडे दिले. त्यावर अजित पवारांनी मुख्यमंत्र्यांशी या संदर्भात आपण चर्चा करू असे आश्वासनही अंजली दमानिया यांना दिले. तशी चर्चादखील त्यांची झाली. परंतु या चर्चेतून काहीही निष्पन्न झालेले नाही हे दिसून येत आहे. धनंजय मुंडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांचे खास आहे या दाव्यात तथ्य नक्कीच आहे. परंतु या प्रकरणात धनंजय मुंडे यांचे पाय इतक्या खोलवर गाळात फसले आहेत, हे उघडपणे दिसत असूनही त्यांना वाचविण्याचा प्रयत्न या दोन्ही नेत्यांकडून होत असेल तर या दोन्ही नेत्यांच्या नैतिकतेवरही प्रश्नचिन्ह लागू शकते.

धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणे तसेच फारसे कठीण नाही; परंतु त्यानंतरही तो घेतला जात नसेल तर नक्की अडचणीत कोण आहे, धनंजय मुंडे की अजित पवार अथवा मुख्यमंत्रीही शंका आता व्यक्त केल्या जात आहे. मुख्यमंत्री आणि अजित पवार धनंजय मुंडे यांना वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत तर धनंजय मुंडे वाल्मिक कराड यांना पडद्याआडून वाचवण्याचा प्रयत्न करीत आहे. या साखळीचा संबंध नेमका कशाशी आहे. शेवट कुठे आहे हे एक गूढ बनत चालल्याचे दिसते. दुसरीकडे राजकीय नैतिकता हा भागच शिल्लक राहिला नसल्याने आणि पूर्णत: पाशवी बहुमतामुळे एवढा दबाव वाढूनही ना मुंडे राजिनामा देतात ना कोणी मागते. उलट रोज भाजपच्याच सुरेश धसांचे नवनवे छोटा-मोठा आका म्हणत कराड-धनंजय मुंडेंवरील आरोपांचे पुराण सुरूच आहे. इकडे फडणवीस, अजितदादाच काय खुद्द मुंडेही संतोष देशमुखांच्या खुन्यांना फाशी झालीच पाहिजे अशी भीमगर्जना करीत आहेत. पण एकूणच आरोपींना राजकीय पाठबळ असेल तर हे होणार कसे, हा प्रश्न आ-वासून उभा आहे.

## जगात सर्वाधिक मोबाईल खरेदी भारतात

**केंद्रीय अर्थसंकल्प आणि संसदेतील आर्थिक सर्वेक्षण अहवाल यातून भारतातील प्रत्येक नागरीकाची क्रयशक्ती वाढली आहे. परिणामी देशाच्या दरडोई उत्पन्नातही वाढ होत असल्याचे त्यातून निर्देशित केले जाते. ही अपेक्षित वाढ नसली तरी आपल्या उत्पन्नाच्या मर्यादेत अनेकानेक वस्तूंची खरेदी तो करू शकतो. हे त्यातून स्पष्ट होते. आणि त्याच्या या खरेदी शक्तीचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे भारतात मोबाईल खरेदी करणाऱ्यांची संख्या जगात सर्वाधिक असल्याचे आढळून आले आहे. साहजिकच हा मोबाईल वापर निव्वळ संवाद नव्हे तर माहिती-तंत्रज्ञानाचे आदानप्रदान आणि आर्थिक उलाढालीचे ही माध्यम बनले आहे.**

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये मोबाईल ही आता आवश्यक गोष्ट झालेली आहे. एकमेकांशी संपर्क साधण्याबरोबरच अनेक गोष्टींची माहिती आपल्या हातात असलेल्या मोबाईलवर उपलब्ध होते आणि त्याचा अनेक अर्थांनी उपयोगही होतो. विशेषतः वेळ, शक्ती आणि पैशाचीही बचत होते. अनेक कामे वेगाने होतात. अशा एक ना अनेक कारणांमुळे मोबाईलची उपयुक्तता सिद्ध झालेली आहे. गेल्या २०२४ वर्षामध्ये भारतात मोबाईल खरेदीमध्ये १६ टक्क्यांनी वाढ झाली. सरासरी १६ कोटीपेक्षा जास्त मोबाईल हे वर्षभरामध्ये विकले गेले. आज जवळपास ८५ ते ९० टक्के भारतीयांकडे मोबाईल दे आहेत आणि म्हणूनच जगातील सर्वाधिक मोवाईल वापरणाऱ्यांची संख्यादेखील भारतात असल्याचे स्पष्ट होते. मोबाईल खरेदी करण्याची



भारतीयांची वाढलेली ही क्षमता त्याच्या खरेदी क्षमतेमध्ये वाढ झाल्याचेच मिद्ध करते. याच मोबाईलचा उपयोग करून अनेक भारतीय आपला व्यवसायदेखील वाढवत असल्याचे समोर आलेले आहे.

ज्या मोबाईलला आपण एकेकाळी केवळ संवादाचे माध्यम समजत होतो. तो मोबाईल आता

**वास्तव**

**शिवानी देसाई**

अनेक प्रकारच्या आदानप्रदानाचेदेखील माध्यम आणि साधन झालेले आहे. एका खाजगी सर्वेक्षणातून समोर आलेला आकडा पाहिला तर मोबाईलवर नवनवीन ॲप्स डाऊनलोड करण्याचे प्रमाण रोज साधारणपणे सरासरी सहा ते सात तास मोबाईलवर घालवणाऱ्यांची संख्या म्हणजेच साधारणपणे प्रत्येक व्यक्ती दिवसाकाठी मोबाईलवर जो वेळ घालवतो त्यातून मोबाईल कंपन्यांचा आणि इतर ऑनलाईन मार्केटिंगची होत असलेली उलाढाल हीसुद्धा मोबाईल वापरणाऱ्यांच्या खरेदी विक्रीच्या क्षमतेचेच दर्शन घडवते. अर्थात गेल्या वर्षभरात केवळ मोबाईल म्हणजेच ऑनलाईन वस्तू खरेदी करणा-यांचे प्रमाण प्रचंड वाढल्याचे समोर आले आणि वर्षभरामध्ये मोबाईलवरून झालेल्या या ऑनलाईन खरेदीतून पंधरा हजार कोटीची उलाढाल झाल्याचे समोर आले.

म्हणजे पूर्वी दुकानात जाऊन चोखंदळपणाने वस्तू खरेदी करण्याची किंवा वस्तूंचा भाव कमी जास्त करून वस्तू खरेदी करण्याची भारतीयांना सवय होती ती आता जवळपास मागे पडलेली दिसते. आणि ऑनलाईन खरेदीकडेच त्यांचा कल असल्याचे स्पष्ट होते. म्हणजे मोबाईल वापरणाऱ्यांची संख्या वाढलेली आहे परंतु मोबाईलवरून म्हणजेच ऑनलाईन वस्तू खरेदी करणाऱ्यांचे प्रमाणही दुप्पट झाल्याचे गेल्या वर्षभरात स्पष्ट झाले आहे. वेगाने विस्तारणारे तंत्रज्ञान आणि त्यातून उपलब्ध होत असलेल्या सोयीसुविधा याचा पुरेपूर वापर करून घेण्यातही भारतीय लोक आघाडीवर असल्याचे दिसते.

कारण वेगवेगळ्या संदर्भातील ॲस तयार होणे ते ॲप्स डाऊनलोड करणे त्या ॲप्सचा वापर करून अनेक प्रकारचे व्यवहार करणे एवढेच नव्हे तर याच मोबाईलच्या माध्यमातून इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉटसअप, यू ट्यूब यासारख्या माध्यमांचा वापर करून आर्थिक किंवा आपापल्या आवडीनिवडीच्या गोष्टींबाबतचे व्यवहार करणे याबाबी देखील होऊ लागल्या आहेत. म्हणजे संवादाच्या पलिकडे जाऊन अर्थव्यवहाराचेही मोठे माध्यम म्हणून मोबाईलचा वापर होतो आहे. बदलणार तंत्रज्ञान तितक्याच वेगाने आत्मसात करणे आणि त्याच्या उपयोगातून आपल्या विषयाशी किंवा व्यवसायाशी निगडीत व्यवहारांमध्ये गती आणणे यासारख्या गोष्टी घडून येत असल्याने मोबाईलवर होणारा सर्वाधिक खर्च हा आज तरी भारतीयांच्या आवडीचा विषय म्हणावा लागेल.

## साप्ताहिक राशी भविष्य

**दि. २ फेब्रुवारी २०२५ ते ०८ फेब्रुवारी २०२५**

**मेष :** महत्त्वाचे निर्णय आज नकोत. कोणतेही महत्त्वाचे शुभकाम नको. प्रवास टाळावेत. वैवाहिक जीवनात मतभेदाची शक्यता आहे. आरोग्याकडे लक्ष हवे. घरात जर वृद्ध व्यक्ती असतील तर त्यांच्या आजाराकडे विशेष लक्ष द्यावे. प्रवास टाळावेत. खर्च वाढणार आहे.

**वृषभ :** आपल्या आर्थिक लाभामध्ये काहीही कमी पडणार नाही. शुभ कामे नकोत. शासकीय कामांत यश मिळेल. थोरामोठ्यांचे सहकार्य मिळेल. व्यापारात व नोकरीत स्वास्थ्य राहील. आरोग्य चांगले राहील. सढळ हस्ते खर्च कराल. प्रियजनांसाठी खर्च कराल. सार्वजनिक कार्यात आपले श्रेष्ठत्व

**मिथुन :** मुलामुलींच्या दृष्टीने काही समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्रातील व्यक्तींना काही समस्या जाणवतील. कटाक्षाने कोणतीही शुभ कामे नकोत. महत्त्वाचे निर्णय नकोत. शासकीय कामे नकोत. प्रवास टाळावेत. मानसिक अस्वस्थता राहील. आपल्या हातून शासकीय नियमांचे उल्लंघन होत

**कर्क :** प्रवासाचे योग येतील. वरिष्ठांकडे काही कामे असली तर वरिष्ठांची भीती न बाळगता आपली कामे नि:संकोचपणे सांगा, ती पूर्ण होण्याची दाट शक्यता आहे. प्रवासाचे योग येतील. आरोग्य उत्तम राहील. प्रवास सुखकर होतील. नोकरी-व्यवसायात प्रगतीचे वातावरण राहणार आहे.

**सिंह :** कोणतेही शुभ कार्य नको. प्रवास कटाक्षाने टाळावेत. शासकीय कामे नकोत. वरिष्ठांकडे कोणतेही प्रस्ताव घेऊन जाऊ नका. तडजोडीचे व सबुरीचे धोरण ठेवावयास हवे. व्यवसायात धाडस नको. नवीन जबाबदारी घेण्याचे शक्यतो टाळावे. प्रकृतीकडे विशेष लक्ष द्यावे. वरिष्ठ व वडिलधारी व्यक्तींकडून अपेक्षा नको.

**कन्या :** वास्तू, फ्लॅट, वाहनखरेदी इ. गोष्टी पुढे ढकलाव्यात. मानसिक अस्वास्थ्य वाटेल. व्यवसायात अडचणी आल्या तरीही आपल्या प्रामाणिकपणे वागण्याच्या स्वभावामुळे प्रगती होत राहील. आरोग्य चांगले राहील. पत्नीचा सल्ला फायदेशीर ठरेल. मुला-मुलींसंदर्भात एखादी समस्या

**तूळ :** आपल्या बुद्धीकौशल्याचा उपयोग करून घ्याल. आपल्या बुद्धीला, अनुभवांना योग्य ती संधी मिळणार आहे. कामाचा ताण वाढणार आहे. जबाबदारी वाढणार आहे. काहींना मनाविरुद्ध प्रवास करावा लागणार आहे. अनेकांना मार्गदर्शन कराल. भावी आयुष्याच्या दृष्टीने एखादी चांगली बातमी समजेल. तडजोडीचे

**वृश्चिक :** स्वभावात चिडचिडेपणा वाढणार आहे. त्यामुळे कौटुंबिक जीवनात व सहकाऱ्यांमध्ये वैचारिक दरी निर्माण होईल. महत्त्वाचे निर्णय कटाक्षाने टाळावेत. नवीन प्रकल्प तूर्त हातात घेऊ नका. स्वभावामध्ये कडकपणा व ताठरपणा निर्माण होईल.

**धनु :** प्रवासाचे योग येतील. घरी पाहुणे येण्याची शक्यता आहे. ग्रहांची मोठ्या प्रमाणावर मदत होईल. एखादी भाग्यकारक घटना घडेल. मनोबल व उत्साह वाढेल. नोकरी, व्यवसायात परिस्थिती चांगली आहे. शासकीय कामात यश मिळेल. अनेक कामे मार्गी लागतील. सुसंधी लाभेल.

**मकर :** एखादे साहस करण्याची उर्मी निर्माण होईल. साहस कटाक्षाने टाळावे. प्रवासही टाळावेत. वास्तू, फ्लॅट, बंगला या कामांमध्ये अडचणी येतील. आर्थिक प्रगतीमध्ये मात्र खंड पडणार नाही. शासकीय कामे नकोत. खर्च वाढतील. कौटुंबिक जीवनात मात्र चांगले वातावरण राहील.

**कुंभ :** आर्थिक क्षेत्रात धाडस टाळावे. वैवाहिक जीवनात मतभेदाची शक्यता आहे. उधारी वसूल होईल. आरोग्याकडे लक्ष हवे. संततीसौख्य लाभेल. काहींची अध्यात्मिक प्रगती होईल. मित्रांच्या आश्वासनांवर अवलंबून राहू नये. घरातील वृद्ध व्यक्तींकडे कटाक्षाने लक्ष द्यावे.

**मीन :** मित्र, सहकारी, वरिष्ठ ऐनवेळी तोंडघशी पाडतील. हितशत्रूंचा त्रास जाणवेल. मात्र, विरोधक आपले नुकसान करू शकणार नाहीत. भागीदारी व्यवसायात कटकटी वाढतील. सहकाऱ्यांची वागणूक पाहून आपण वैतागून जाल. काहीजणांच्या मनात निराशाजनक विचार येतील. वैवाहिक जीवनात मतभेद गंभीर होणार नाहीत याची काळजी घ्यावी.

# स्वयंसेवी संस्था व दानशूर व्यक्तींच्या मदतीने सीसीटीव्ही बसविणार : आमदार शरद सोनवणे

## नारायणगाव येथे पोलीस ग्राम सुरक्षा दल व पत्रकारांच्या बैठकीचे आयोजन

जनप्रवास : वार्ताहर

नारायणगाव : वाढत्या चोऱ्या तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने जुन्नर तालुक्यातील सर्वच सार्वजनिक ठिकाणी शासनाच्या वतीने तसेच स्वयंसेवी संस्था व दानशूर व्यक्तिंच्या मदतीने सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्यात येणार असल्याची ग्वाही आमदार शरद सोनवणे यांनी दिली.



वाढत्या चोऱ्या व घरफोड्या यापुढे होऊ नये तसेच नागरिकांनी सुरक्षितते बाबत काय काळजी घ्यावी या संदर्भात आज दिनांक १ फेब्रुवारी रोजी नारायणगाव पोलीस स्टेशन हद्दीमधील सर्व ग्राम सुरक्षा दलाचे जवान, पोलीस पाटील, सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष यांची नारायणगाव पोलीस स्टेशन येथे मीटिंग घेण्यात आली. याप्रसंगी आमदार सोनवणे बोलत होते

या बैठकीमध्ये जुन्नर चे उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर यांनी व सहाय्यक पोलीस निरीक्षक। महादेव शेलार यांनी ग्राम सुरक्षा दलातील जवानांना मार्गदर्शन केले त्याचबरोबर आमदार शरद सोनवणे यांनी पोलीस पाटलांनी वाड्या वस्त्यांवरील ग्रामसुरक्षा दलातील जवानांना ॲक्टिव्ह करून स्वत:च्या पदाप्रमाणे शासनाने सोपवलेली जबाबदारी पार पाडावी व आपले गाव कसे सुरक्षित राहील याबाबत पुढाकार घ्यावा.तसेच सीसीटीव्ही कॅमेरा संदर्भात जुन्नर तालुक्यामधील सर्व पोलीस स्टेशनचे एक्झिट पॉईंट सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्याने कव्हर करणार असलेबाबत आमदार शरद सोनवणे यांनी ग्वाही दिली.

या कार्यक्रमासाठी उपस्थित ग्राम सुरक्षा दलातील जवानांना सुरक्षेच्या कारणास्तव बॅटरी , टी-शर्ट तसेच शिट्ट्या 'चे वाटप करण्यात आले.

या मीटिंगसाठी जिल्हा परिषद सदस्या आशाताई बुचके, संतोष नाना खैरे, नारायणगावचे सरपंच योगेश उर्फ बाबू पाटे, वारूळवाडी सरपंच राजेंद्र मेहेर, भागेश्वर डेरे, ज्ञानेश्वर औटी ग्राम सुरक्षा दलाचे जवान, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष व पत्रकार बांधव उपस्थित होते.सदर कार्यक्रमासाठी आकाश बोरकर शेवंताई उद्योग समूह, विशाल बानखेले, प्रमोद पिंगळे, अजय राऊत पोलीस पाटील धनगरवाडी, प्राध्यापक काशिनाथ आल्हाट सर यांचे विशेष सहकार्य लाभले.

# श्रीगोंदा येथील डॉ.उत्तम वडवकर यांच्या रुग्णालयाच्या चतुर्थ वर्धापनदिनाच्या निमित्ताने अनोखा उपक्रम

## चार महिने बाह्य रुग्ण तपासणी मोफत चालवणार

**रुग्णालयास चार वर्षे पूर्ण**

जनप्रवास : प्रतिनिधी



श्रीगोंदा : शहरातील डॉ उत्तम वडवकर याच्या रुग्नालयाला चार वर्षे पूर्ण झाल्याने त्यांनी एक अनोखा उपक्रम हाती घेतला असून रुग्णालयाच्या चतुर्थ वर्धापनदिनाच्या निमित्ताने चार महिने ओपीडी (बाह्यरुग्ण तपासणी) मोफत चालवणार असल्याची माहिती डॉ वडवकर दाम्पत्यांनी बोलताना दिली आहे

डॉक्टर हि पदवी स्वीकारताना घेत असलेली शपथ म्हणजे हिप्पोक्रॅटिक शपथ. ही शपथ ग्रीक भाषेत आहे. हिप्पोक्रॅटिक शपथ ही डॉक्टरांनी घेतलेली नैतिकतेची शपथ आहे आजही बऱ्याच वैद्यकीय शाळांमध्ये पदवीधर डॉक्टर अद्ययावत आवृत्तीची शपथ घेतात.याचा अर्थ असा होतो कि मला मिळालेल्या पदवीचा मी सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी वापर करून अनेकांना वेदनेतून मुक्ती देण्याचा प्रयत्न मनोभावे करील शपथेचा प्रत्यय आज डॉ उत्तम वडवकर यांच्या अनोख्या उपक्रमाने समोर येत आहे त्याच्या निरामय सहकार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व आय सी यु सेंटरचे उदघाटन होऊन चार वर्षे पूर्ण झाल्याने रुणालयाचा वाढदिवस त्यांनी केक कापून साजरा केला त्यावेळी बोलताना डॉ वडवकर व त्याच्या पत्नी डॉ सुनीता वडवकर यांनी बोलताना सांगितले कि आमच्या हॉस्पिटलला चार वर्षे पूर्ण झालीत त्यामुळे आम्ही दोघेही डॉ दाम्पत्य तब्बल चार महिने सकाळी १० ते सायंकाळी ७ पर्यंत ओपीडी(बाह्यरुग्ण तपासणी) मोफत चालवणार आहोत शुगर बीपी याची मोफत तपासणी केली जाणार आहे तसेच अबीद नदाफ (बीए एमएसएमडी)हे सुद्धा मोफत सेवा प्रदान करणार आहेत त्यासाठी गरजू रुग्णांनी विनामूल्य सेवेचा लाभ घेऊन आम्हाला जनतेची सेवा करण्याची संधी द्यावी असे आवाहन वडवकर दाम्पत्यांनी बोलताना केलं आहे

# लग्नाच्या दूसऱ्याच दिवशी नवरी लाखोंचे दागिने घेवून पसार

**पाच जणांवर गुन्हा दाखल**

जनप्रवास : प्रतिनिधी

टाकळी हाजी : लग्न कराव, सेटल व्हावं अशी अनेक लोकांची इच्छा असते. काही जण प्रेमविवाह करतात, पण काही लोक अरेंज मॅरेजचा मार्ग निवडतात, त्यासाठी विवाह मंडळात नावही नोंदवलं जातं.मात्र लग्नाच्या नावाखाली विवाहोत्सुक, लग्नाळू तरूणांना फसवून त्यांचे पैसे लुबाडणारी टोळ्या शहरासह ग्रामीण भागातही सक्रिय झाली आहे.पोलिसांनी आतापर्यंत अनेक टोळ्यांचा पर्दाफाश केला आहे. मात्र तरी सुद्धा अनेक लग्नाळू तरुण अश्या फसवणूक करणाऱ्या टोळ्यांना बळी पडत आहे.

अशीच एक घटना अहिल्यानगर जिल्हातील जामखेड तालुक्यातील खर्डा येथे घडली असून तेथे एका तरूणाची फसवणूक करण्यात आली आहे. त्याला तब्बल ५ लाख रुपयांचा गंडा घालण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, बाबू गोरख मत्रे ( वय २८ वर्षे ) असे फसवणूक झालेल्या तरूणाचे नाव असून लग्न करून देण्यासाठी त्याच्याकडून तब्बल ५ लाख रुपये उकळण्यात आले. बाबूच्या ओळखीचे लग्न लावून देणारे एजंट बापू काटे आणि नाना कात्रजकर या दोघांनीच त्याची फसवणूक केली. १५ जून २०२४ रोजी बाबू मत्रे या तरुणाचे स्नेहा चव्हाण या मुलीसोबत लग्न लावून दिले. मात्र लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी मुलीने नवरदेवाच्या घरातुन धूम ठोकली आणि ती फरार झाली.

अनेक दिवसांपासून बाबू म्हात्रे ग्रासाठी मुलीच्या शोधात होता अशातच त्याला त्याच्या ओळखीचे लग्न लावून देणारे एजंट बापू काटे आणि नाना कात्रजकर हे भेटले. त्यावेळी त्यांनी लग्नासाठी पाच लाख रुपये लागतील असे सांगितले. त्यावेळी नवरदेव बाबू मत्रे याच्याकडून सर्व तयारी करण्यात आली. आळंदी येथे दोघांचेही लग्न लावून देण्यात आले. मात्र लग्नाच्या दुसऱ्या दिवशी नवरी मुलीने धूम ठोकली. लग्न आणि भावी आयुष्याची सुखस्वप्न पाहणाऱ्या बाबूने आपले लग्न लावून देण्यासाठी एजंट आणि मुलीकडच्या फसवणाऱ्या टोळीला एकूण ३ लाख ६० हजार रुपये तसेच दोन तोळे सोने दिले होते. मात्र लग्नाच्या दुसऱ्या दिवशी नवरी मुलगी फरार झाली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर बाबूने खर्डा पोलीस ठाण्यात नवरी मुलगी आणि तिच्यासोबत आलेल्या टोळीविरोधात फिर्याद नोंदवली. त्या आधारे खर्डा पोलिस स्टेशमध्ये दोन एजंट, मुली सोबत आलेली एक करवलीरी, आणि लग्न जमवून देणारी महिला अशा ५ जणांविरोधात खर्डा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास खर्डा पोलीस करत आहेत.

# कोळगावचे सरपंच पुरुषोत्तम लगड यांची जिल्हा नियोजन समितीवर निवड



श्रीगोंदा तालुक्यातून सर्व सरपंचांमधून जिल्हा परिषदेच्या नियोजन समितीवर निवड झाल्याने श्रीगोंदा तालुक्यासाठी हा बहुमान असून या नियोजन समितीच्या वतीने पंधराव्या वित्त आयोगामध्ये प्राप्त झालेला निधी चालू वर्षाच्या आराखड्यातून जास्तीत जास्त गावांना उपलब्ध करून देणार आहे. तसेच बंधीत व अबंधित कामे मार्गी लावणार आहे. या पदाचा उपयोग श्रीगोंदा तालुक्यातील सर्व गावांना निधी उपलब्ध करून विकास कामे मार्गी लावण्यासाठी करणार असल्याचे प्रतिपादन कोळगावचे सरपंच पुरुषोत्तम लगड यांनी केले.

जनप्रवास : प्रतिनिधी

श्रीगोंदा : कोळगाव चे लोकनियुक्त सरपंच पुरुषोत्तम लगड यांची श्रीगोंदा तालुक्यातील सर्व सरपंचांमधून जिल्हा परिषदेच्या नियोजन समितीवर सदस्य म्हणून नियुक्त झाल्याने श्रीगोंदा तालुक्याला हा बहुमान प्राप्त झाला आहे.

पंधराव्या वित्त आयोगातून प्रत्येक तालुक्याला निधी वितरित करून विकास कामे मार्गे लावण्यासाठी जिल्हा परिषदेची नियोजन समिती कार्यरत असते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी( ग्रामपंचायत विभाग) हे या समितीचे प्रमुख असतात . ते प्रत्येक तालुक्यातून एक सरपंच या समितीवर नियुक्त करतात. या समितीच्या माध्यमातून १५ आयोग वित्त आयोगाला जो निधी प्राप्त झाला त्यामध्ये तालुक्यामध्ये विकास कामे मार्गे लावणे, नियुक्त सरपंचांच्या मार्फत तालुक्यातील सर्व सरपंचांना मार्गदर्शन करणे, त्यांची प्रशिक्षण कार्यक्रम घेणे, तसेच या वित्त आयोगामार्फत संपूर्ण तालुक्यात योग्य प्रमाणात निधीचे वाटप करणे अशी विविध कामे असतात.

त्यामुळे पुरुषोत्तम लगड यांचे जिल्हा परिषदेच्या नियोजन समितीवर निवड झाल्याने त्यांचे माजी खासदार सुजय विखे, आमदार विक्रम सिंह पाचपुते, माजी आमदार बबनराव पाचपुते यांनी अभिनंदन केले आहे.

# आज ऑनलाईन वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन

जनप्रवास : वार्ताहर

टाकळी हाजी : हिंदू शेगर धनगर समाज विकास मंच महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने ऑनलाईन वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन रविवार दि.०२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे,असे मेळाव्याचे प्रमुख प्रा.अजय गाढवे यांनी सांगितले आहे.

या मेळाव्याचे उद्घाटन राज्याचे क्रिडा व युवक अल्पसंख्याक मंत्री नामदार श्री.दत्तात्रय मामा भरणे यांच्या शुभहस्ते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिरूरचे माजी आमदार श्री.पोपटराव गावडे व प्रमुख आकर्षण मराठी फिल्म अभिनेत्री उषा बिबे आणि अभिनेता बाळराजे वाळुंजकर तसेच भाजपा प्रदेश उपाध्यक्ष श्री.बाळासाहेब तात्या गावडे व शेगर धनगर महासंघाचे अध्यक्ष श्री.सुनील भगत यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

आजच्या आधुनिक युगात समाजातील एकत्रित कुटुंब पद्धती लोप पावून कुटुंब विभक्त होत चालली आहे.समाजाची शैक्षणिक व सामाजिक प्रगती सुधारत असली तरी सामाजिक एकोपा व स्नेहभाव कमी होत असल्याचे पाहावयास मिळत आहे.तसेच अलीकडच्या काळात विवाह जुळणीसाठी अनेक समस्या निर्माण होत आहेत.समाजात वधू वरांना योग्य अनुरूप जोडीदार मिळावा यासाठी या वधू वर सूचक मंडळाच्या वतीने झूम पद्वारे मोफत मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. या ऑनलाईन वधू वर मेळाव्यामध्ये आजच्या धावपळीच्या युगात दैनंदिन जीवनातील वेळ व पैशाची बचत करून घरबसल्या सुरक्षित ठिकाणी राहून सहभागी व्हावे, असे आवाहन मेळाव्याचे आयोजक प्रा.संभाजी साबळे सर यांनी केले आहे.

# १३ वर्षीय अल्पवयीन चिमुरडीवर ३९ वर्षीय नराधमाचा अत्याचार

**आरोपीला शिरूर पोलिसांकडून अटक**

जनप्रवास : प्रतिनिधी

कारेगाव : शिरूर तालुक्यातील काठापुर येथे एका घराचे काम करणाऱ्या सुरेश भगवान ढोकणे (वय ३९ वर्ष) रा. नागापूर, ता. जि. बीड या नराधम मिस्तरीने घरातील १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ करुन बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याबाबत शिरूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी सुरेश ढोकणे याला शिरूर पोलिसांनी तत्परतेने शोध घेत बेड्या ठोकल्या आहे.

याबाबत सविस्तर हकीगत अशी की, दि. २७डिसेंबर २०२४ पासून दि. २२ जानेवारी २०२५ रोजी पर्यंतच्या कालावधीमध्ये वेळोवेळी शिरूर तालुक्यातील काठापूर खुर्द, या ठिकाणी फिर्यादी यांच्या राहत्या घराच्या हॉलमध्ये मिस्त्री काम करण्यासाठी आलेल्या सुरेश भगवान ढोकणे (वय ३९ वर्ष) रा. नागापूर, ता. जि. बीड याने अल्पवयीन १३ वर्षीय चिमुरडीवर बळजबरीने शारिरीक संबंध निर्माण करून बलात्कार केला असुन. सध्या या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक करांडे हे करत आहे.

# राहुरीतील महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन

जनप्रवास : प्रतिनिधी



राहुरी : शहरातील महिलांसाठी दारूवाला लॉन्स या ठिकाणी मंगळवार ४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती माजी नगरसेविका सौ. अर्चना रावसाहेब तनपुरे यांनी सांगितले.

दरवर्षीप्रमाणे मकर संक्रातीच्या निमित्ताने . मंगळवार ४ फेब्रुवारी रोजी दारूवाला लॉन्स मल्हारवाडी रोड राहुरी या ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या हळदी कुंकू कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सौ. शालिनीताई राधाकृष्ण विखे पाटील व सौ. प्रियंकाताई अक्षय कर्डिले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे या कार्यक्रमासाठी शहरातील महिलांनी उपस्थित राहावे असे आवाहन सौ.जया संतोष तनपुरे, सौ. वृषाली नंदकुमार तनपुरे, सौ. प्रियंका सचिन तनपुरे सौ मेघना रवींद्र तनपुरे, सौ अश्विनी विशाल तनपुरे, सौ. कांचन अलोक तनपुरे, सौ ज्योती अक्षय तनपुरे यांनी केले आहे. यावेळी सायंकाळी पाच ते दहा भोजनाचा कार्यक्रम होणार आहे.

# कोपरगाव मतदार संघातील तीन देवस्थानास 'क' वर्ग दर्जा : आ. काळे

जनप्रवास : वार्ताहर

कोळपेवाडी : जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केलेल्या मागण्यांची दखल घेवून कोपरगाव विधानसभा मतदार संघातील श्री राजा विरभद्र देवस्थान भोजडे, श्री महादेव मंदिर देवस्थान डाऊच खु. व श्री महादेव मंदिर देवस्थान सडे या देवस्थानास तीर्थक्षेत्र 'क' वर्ग दर्जा मंजूर करण्यात आला असून वारी व संवत्सर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी प्रत्येकी एक रुग्णवाहिका मंजुर करण्यात आली असल्याची माहिती आ.आशुतोष काळे यांनी दिली आहे.



राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पा. यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार (दि.०१) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली. या बैठकीत आ.आशुतोष काळे यांनी पालकमंत्र्यांकडे मतदार संघाच्या विविध विकास कामांबरोबरच मतदार संघाच्या समस्यांकडे पालकमंत्र्यांचे लक्ष वेधून मतदार संघातील विविध देवस्थानांना क वर्ग दर्जा मिळावा अशी मागणी केली. तसेच मतदार संघातील उर्जा विभागाच्या समस्या मांडल्या. शेतकऱ्यांबरोबरच छोटे-मोठे व्यावसायिक वीज ग्राहकांना येणाऱ्या विजेच्या समस्या तातडीने दूर कराव्यात व आरोग्य विभागासाठी रुग्णवाहिका मिळाव्यात अशी मागणी केली. या मागण्यांची दखल घेऊन पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पा.यांनी श्री राजा विरभद्र देवस्थान भोजडे, श्री महादेव मंदिर देवस्थान डाऊच खुर्द व श्री महादेव मंदिर देवस्थान सडे या देवस्थानास तीर्थक्षेत्र 'क' वर्ग दर्जा मंजूर करून उर्जा विभागाच्या समस्या दूर करण्यात येतील अशी ग्वाही देवून कोपरगाव मतदार संघाच्या पूर्व भागातील वारी व संवत्सर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी प्रत्येकी एक रुग्णवाहिका मंजुर केली असल्याची माहिती आ.आशुतोष काळे यांनी दिली आहे.

# नारायणगाव येथे राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहाचे आयोजन

जनप्रवास : वार्ताहर

नारायणगाव : लायन्स क्लब ऑफ नारायणगाव, ग्रामोन्नती मंडळ नारायणगाव आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय,पिंपरी चिंचवड (मोशी ) यांच्या संयुक्त विद्यमाने ३६ वा राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहाचे आयोजन गुरुवर्य रा.प. सबनीस विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय नारायणगाव येथील वसंत व्हीला याठिकाणी नुकतेच करण्यात आले अशी माहिती लायन्स क्लबचे कॅबिनेट ऑफिसर योगेश रायकर यांनी दिली.

याप्रसंगी ग्रामोन्नती मंडळाचे विश्वस्त प्रकाश पाटे,अध्यक्ष सुजित खैरे,उपाध्यक्ष शशिकांत वाजगे लायन्स क्लबचे अध्यक्ष राजेंद्र कुमार देसाई, सचिव कल्पेश गुगळे,सुधीर भागवत,मनोज भळगट, अनुष्का शिंदे, आनंद कोठारी, गिरीश मुनोत,विजय मुनोत,वैभव मुथ्था, प्रकाश निमसे आदी मान्यवर उपस्थित होते.



या कार्यक्रमप्रसंगी ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिल तात्या मेहेर म्हणाले की, राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने विद्यार्थी दशेत कायदा व सुव्यवस्थेचे ज्ञान मिळत आहे त्याच अनुषंगाने विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी देखील प्रयत्न केले पाहिजेत त्यासाठी ग्रामोन्नती मंडळ सदैव प्रयत्नशील राहील.सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अमोल घुले म्हणाले,

वाहन चालवत असताना हेल्मेट घातलं पाहिजे,नियमांचे पालन करून वाहनांचा अतिवेग टाळला पाहिजे तसेच व्यसनांच्या आहारी न जाता मोबाईल चा वापर टाळून सावधगिरीने वाहन चालवावीत. त्याचबरोबर नारायणगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार म्हणाले की,लायसन्स शिवाय गाडी पालकांनी विद्यार्थ्यांना देऊ नये अन्यथा आम्हाला कारवाई करावीच लागेल.विद्यार्थ्यांनी आयुष्यात चांगली संगत धरावी व अभ्यासासोबत योग्य वर्तन ठेवावं, आपल्या पालकांची मान उंचवता आली नाही तरी चालेल पण खाली झुकता कामा नये असे म्हणत शेलार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

मुख्याध्यापक सतीश तंवर तसेच उपप्राचार्य हनुमंत काळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाचे पर्यवेक्षक अनुपमा पाटे, विलास शिंदे, संजय वलटे,विज्ञान विभाग प्रमुख नितीन पोखरकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक झोन चेअरपर्सन ला.योगेश रायकर यांनी तर सूत्रसंचालन प्रा.रमेश शेटे यांनी तर आभार अनुष्का शिंदे यांनी मानले.

# अखेरच्या श्वासापर्यंत साधुसंतांनी देवाशी, पतिव्रता पत्नीच्या भक्ती समान नाते जोडले : अक्रुर महाराज साखरे

जनप्रवास : वार्ताहर

माळवाडगांव : अखेरच्या श्वासापर्यंत साधुसंतांनी देवाशी पतिव्रता पत्नीसमान भक्तीचे नाते जोडल्याने संकटकाळी देव मदतीला धावून येत असे असा उपदेश अक्रुर महाराज साखरे यांनी श्रीक्षेत्र अडबंगनाथ संस्थान येथील किर्तन महोत्सव सोहळ्यात किर्तनातून भाविकांना केला. श्रीक्षेत्र अडबंगनाथ संस्थान येथे धर्मनाथ बीज किर्तन महोत्सव सोहळा असुन किर्तन सेवेतील सातवे पुष्प गुंफताना अक्रुर महाराज साखरे यांनी संत तुकाराम महाराजांच्या गाथेतील

भोळे भाविक हे जुनाट चालले , होय तैसे केले भक्ती भावे या अभंगातून निरूपण केले. सर्वजण देवाची भक्ती करतात त्या देवाचे भक्तीचे स्वरूप सांगणारा अभंग....असुन देवाशी नातं जोडलं की कार्य सफल होतं. कुठल्याही देवाची भक्ती करा.परंतू देवाशी पतिव्रता पत्नीच्या भक्ती समान नातं जोडा . संत तुकाराम महाराज, संत नामदेव,संत मिराबाई संत जनाबाई संत चोखामेळा,संत रोहिदास महाराज,संत सावता माळी महाराज यांनी पांडुरंगाच्या भक्तीत,




सुदामाने भगवान श्रीकृष्णाच्या भक्तीत नातं जोडल्याने त्यांची भक्ती सफल झाल्याचे महाराज म्हणाले.

अडबंगनाथाच्या देवस्थानच्या वतीने मठाधिपती अरूणनाथगिरी महाराज यांनी अक्रुर महाराज यांचा पुष्पहार घालून सन्मान केला. शुक्रवार दि.३१ रोजी उमेश महाराज दशरथे यांनी किर्तन महोत्सव सोहळ्यात आठवे पुष्प गुंफविले. आज शनिवार दि.१ फेब्रुवारी रोजी सकाळी ११वाजता किर्तन महोत्सव सांगता,नवनाथ पारायण सोहळा समाप्तीच्या नवव्या दिवशी मठाधिपती अरूणनाथगिरी महाराज यांच्या काल्याचे किर्तनाने सांगता होणार आहे

## थोडक्यात



### श्री विशाल गणेश मंदिरात गणेश जयंती निमित्त भाविकांची मोठी गर्दी

नगर (जनप्रवारस : प्रतिनिधी) : श्री गणेश जयंतीनिमित्त शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे श्री गणेश जन्मावेळी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. याप्रसंगी देवस्थानचे अध्यक्ष अ‍ॅड. अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे ,विश्वस्त विजय कोथिंबीरे, बापूसाहेब एकाडे, हरिभाऊ फुलसौंदर, रंगनाथ फुलसौंदर, ज्ञानेश्वर रासकर, पांडूरंग नन्नवरे, गजानन ससाणे, हरिचंद्र गिरमे ,चंद्रकांत फुलारी, संजय चाफे, प्रा.माणिकराव विधाते, नितीन पुंड आदिंसह पुजारी संगमनाथ महाराज उपस्थित होते. प्रारंभी सकाळी अभिषेक करण्यात आला. भाविकांनी पहाटे पासून रांगा लावल्या होत्या. दुपारी गणेश जन्मवेळी यावेळी भाविकांनी पुष्पसृष्टी केली. गणेश जयंतीनिमित्त गणेश यागचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे यजमान शंकरराव फुलसोंदर व परिवार होता. यावेळी उदयोजक गणेश झंवर यांच्याहस्ते आरती करण्यात आली . यागाचे पौराहित्य नाशिक येथील मुकुंदशास्त्री मुळे यांनी केले. यानंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. गणेश जयंतीनिमित्त मंदिर व परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. देवस्थान ट्रस्टच्यावतीने भाविकांसाठी मंडप, बॅरिगेटस्, पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. गणेश मंदिरातील सेवेकरी व पोलिस प्रशासन भाविकांच्या गर्दीचे नियोजन करत होते.

### बदामांच्या पौष्टिकतेचा फायदा घ्या: ९० टक्के कमी केसगळती आणि १०० टक्के अधिक आत्मविश्वास

पुणे (जनप्रवारस : प्रतिनिधी) : वेगवेगळ्या हेयरस्टाइल्स करताना खूप धमाल येते, पण अनेकदा स्टायलिंग, केमिकल्स व ऋतूबदलांमुळे केसांचे नुकसान होऊ शकते. विशेषत: हिवाळ्यादरम्यान तापमान कमी असताना केस कोरडे व नाजूक होऊ शकतात. सुदैवाने, निसर्गाने गुणकारी उपाय दिला आहे, तो म्हणजे बदाम. हे पौष्टिक नट्स केसांना दुरूस्त व चमकदार करण्याच्या क्षमतेसाठी ओळखले जातात.मेरिको लिमिटेडच्या चीफ आरअँडडी ऑफिसर डॉ. शिल्पा वोरा यांनी केसांची काळजी घेण्यामध्ये बदामांच्या फायद्यांवर भर दिला आहे. आवश्यक व्हिटॅमिन्स असलेले बदाम केस आरोग्यदायी व मजबूत ठेवतात. दैनंदिन नित्यक्रमामध्ये बदामाच्या तेलाचा वापर केल्यास केसांची चमक कायम राहते, केसांमध्ये ओलावा राहतो आणि केस मजबूत होतात. टाळूवर बदामाच्या तेलाने मसाज केल्याने रक्ताभिसरण वाढते, केसांचे नुकसान कमी होते आणि केस कोमल व आरोग्यदायी राहतात.डॉ. वोरा नुकसानामुळे होणारी केसगळती कमी करण्यासाठी हेयर अँड केअर आल्मंड हेयर ऑइलची शिरफास करतात. जे केसगळती जवळपास ९० टक्क्यांनी कमी करते (*अस्वीकृती). आठवड्यातून १ ते २ वेळा वापरल्यास हे हेयर ऑइल मजबूत व आकर्षक केस मिळवण्यासाठी किफायतशीर व गुणकारी मार्ग आहे. वजनाने हलके व पोषक हेयर अँड केअर आल्मंड हेयर ऑइल सर्व प्रकारच्या केसांसाठी अनुकूल आहे, जे केसांच्या समस्यांसाठी परिवर्तनात्मक सोल्यूशन आहे, तसेच आत्मविश्वास वाढवते.

### मेहेरबाबाच्या समाधी स्थळी ५० हजार मेहेरप्रेमींनी पाळले मौन


अहिल्यानगर (जनप्रवारस : प्रतिनिधी) : बिगिन दि बिगिन ही धून पावणे बारा वाजता वाजवण्यात आली नंतर नगर सेंटरने च्या सदस्यांनी मेहेरधून म्हटली. दु १२ वा मौनास सुरुवात झाली यावेळी सर्वत्र शांतता होती टाचणी पडली तरी समजेल इतकी शांत वातावरण होते १५ मिनिटानंतर अवतार मेहेर बाबा कि जय च्या जयघोषात मौन सोडण्यात आले.यावेळी टेकडीवर ५० हजाराच्या वर भाविक होते अवतार मेहेरबाबाच्या समाधी स्थळी ५६ वी अमर तिथी सोहळात आज ३१ जानेला बाबांनी देहत्याग केला त्यावेळेस दु १२ वा दौंड रोडवरील मेहराबाद(अरणगाव)येथे सुमारे ५० हजार भाविकाचे मौन पाळले तर जगात लाखो भाविकांनी याच वेळेस मौन पाळले. कालपासून सुरु झालेल्या अमरतिथीसाठी हजारो भाविक बसतील असा भव्य मंडप आहे.त्याव्यतिरिक्त जेथे मिळेल भाविक बसून होते अवतार मेहेरबाबांनी मौनास सुरवात केल्यावर शेवटपर्यंत मौन पाळले म्हणून आज हे महामौन पाळले जाते सकाळी भजनास सुरवात झाली नंतर मेहेरधून म्हटली गेली नंतर मुख्य मंडपात कार्यक्रम सुरु झाले आजहि समाधीचे दर्शन घेण्यास रांगा लागल्या होत्या. भारतातून सुमारे ७०,००० मेहेरप्रेमी आले आहेत कोठेहि गडबड,गोंधळ नव्हता सांस्कृतिक कार्यक्रम दिवसभर चालू होता त्यात मेहेर प्रेमीनी भजने,गजल,नृत्ये,कव्वाली,गाणे ,नाटिका सादर केल्या

### भगिनींच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी 'महिला आयोग आपल्या दारी'

पुणे (जनप्रवारस : प्रतिनिधी) : देशभरात महिला अत्याचाराच्या तक्रारींमध्ये मोठी वाढ होत आहे. राज्य व राष्ट्रीय महिला आयोग, कौटुंबिक न्यायालयात लाखो तक्रारी प्रलंबित आहेत. ५०-६० टक्के तक्रारी कौटुंबिक वादाच्या असून, या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगाने देशभर 'महिला आयोग आपल्या दारी' अभियान हाती घेतले आहे.

## निधन वार्ता

### वारबाई लष्करे



नेवासा : शहरातील जुन्या पिढीतील वारबाई शेटीबा लष्करे वय १०३ यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले त्यांच्या मागे दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते नरसू लष्करे यांच्या त्या मातोश्री होत्या.

### सुशीला फुले



अहिल्यानगर : तालुक्यातील नेप्ती येथील माळी समाजाच्या सुशीला माधव फुले यांची हदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ८१ व्या वर्षी प्राणज्योत मालवलीत्यांच्या पश्चात एक मुलगा, चार मुली ,सुना, नातवंडे असा परिवार आहे . सामाजिक कार्यकर्ते दादाभाऊ फुले यांच्या त्या मातोश्री होत्या

# देशात संविधानिक नैतिकता निर्माण करण्याची आवश्यकता : कमलाकांत काळे

## हंगा येथे प्रजासत्ताक गौरव परिषद संपन्न

जनप्रवारस : प्रतिनिधी




पारनेर : भारतीय लोकांना त्यांचे मौलिक अधिकार कायदेशीर रित्या प्राप्त करुन देणारे साधन हे केवळ संविधान आहे ही बाब भारतीय जनतेच्या लक्षात आल्यामुळे देशात संविधानबाबत प्रचंड आत्मीयता व लोकप्रियता निर्माण झाली आहे.संविधानाने सर्वांना समान अधिकार बहाल करुन लोकांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीमधे अमुलाग्र क्रांतिकारक बदल घडवून आणला. परंतु लोकांमधील संविधानाबाबत अज्ञानाचा आणि उदासीनतेचा फायदा घेवून शासकवर्ग संविधानाचा प्रभाव कमी करण्याचे षडयंत्र करीत आहे.हे षडयंत्र हाणून पाडण्यासाठी लोकांना जागृत करुन देशात संविधानिक नैतिकता निर्माण करणे गरजेचे आहे, असे मत बामसेफ तथा युनिटी ऑफ मुलनिवासी समाज संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष कमलाकांत काळे यांनी व्यक्त केले.संविधान व प्रजासत्ताकाच्या अमृत महोत्सवानिमित्त हंगा येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.कार्यक्रमाचे उद्घाटक छत्रपती क्रांती सेनेचे बाळासाहेब मिसाळ, ड.बाळासाहेब सोनवणे, ड.रामदास शिंदे,गट कृषी अधिकारी देवेंद्र जाधव, जेष्ठ कार्यकर्ते वसंत पाडळे,मा.सरपंच राजेंद्र शिंदे, माही सुर्यवंशी, आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर अमृत महोत्सवानिमित्त गेल्या वर्षभरापासून पारनेर तालुक्यात संविधानाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी अनेक मान्यवर व अभ्यासक बोलावून प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आले.तसेच पुरोगामी चळवळीतील सर्व महापुरुष व महामातांच्या जयंती महोत्सवाचा उपक्रम राबवुन संविधानाबाबत जनजागृती करण्यात आली. यापुढे ही संविधानाचा रथ बनवून संविधान संवाद यात्रा सुरु करुन संपूर्ण पारनेर तालुका आणि पंचक्रोशीत जनजागृती करणार असल्याची माहिती लोकशाही व संविधान बचाव अभियानाचे मुख्य प्रवर्तक राजेंद्र करंदीकर यांनी आपल्या भाषणात दिली.

सदर अभियानात सातत्याने योगदान देणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.यामधे बाळासाहेब पातारे, सुरेश रोकडे, हिरामण सोनवणे महेंद्र रोकडे, महेंद्र बोरुडे,सुरेश गायकवाड, मोहन कसबे, शब्बीर इनामदार, दादाभाऊ पटेकर आदींचा समावेश होता.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संतोष विधाटे यांनी, तर शेवटी आभार प्रदर्शन मनोज सुर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युनिटी ऑफ मुलनिवासी समाज व संविधान जनजागृती अभियान हंगा आणि सहयोगी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

> भविष्यात संविधान संवाद यात्रेच्या माध्यमातून घराघरात संविधान पोहचविण्याचा आमचा संकल्प आहे.
>
> – राजेंद्र करंदीकर,
> लोकशाही व संविधान बचाव अभियान मुख्य संयोजक

## गौतम बँकेच्या व्हा.चेअरमनपदी सुनील डोंगरे यांची निवड

जनप्रवारस : वार्ताहर



कोळपेवाडी : प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करणाऱ्या सहकारी बँकिंग क्षेत्रात अग्रभागी असणाऱ्या गौतम सहकारी बँकेच्या व्हा.चेअरमनपदी सुनील भास्करराव डोंगरे यांची निवड झाली असल्याची माहिती निवडणूक अधिकारी नामदेव ठोंबळ यांनी दिली आहे.

गौतम सहकारी बँकेचे विद्यमान व्हा.चेअरमन बापूराव जावळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर सुनील डोंगरे यांची निवड करण्यात आली आहे. शुक्रवार (दि.३१) रोजी अध्यक्षीय अधिकारी नामदेव ठोंबळ तथा सहाय्यक निबंध सहकारी संस्था कोपरगाव यांच्या उपस्थितीत व्हा.चेअरमनपदासाठी निवडणूक संपन्न झाली. यावेळी व्हा.चेअरमनपदासाठी सुनील डोंगरे यांच्या नावाची सूचना जेष्ठ संचालक राजेद्र ढोमसे यांनी मांडली. सदर सूचनेस बापूसाहेब वक्ते यांनी अनुमोदन दिले. त्यावेळी निवडणूक अधिकारी नामदेव ठोंबळ यांनी व्हा. चेअरमनपदी सुनील भास्करराव डोंगरे यांची बिनविरोध निवड झाली असल्याचे जाहीर केले.

गौतम सहकारी बँकेच्या व्हा. चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल बँकेचे मार्गदर्शक मा.आ. अशोकराव काळे व कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याचे अध्यक्ष आ.आशुतोष काळे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी बँकेचे चेअरमन संजय आगवण, मावळते व्हा. चेअरमन बापूराव जावळे व सर्व संचालक मंडळाने अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी व्हा. चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल सुनील डोंगरे म्हणाले की, प्रगतीपथावर असलेल्या गौतम सहकारी बँक केवळ आर्थिक संस्थाच नाही, तर सामाजिक आणि ग्रामीण जीवनाच्या प्रगतीचा एक महत्त्वाचा आधार आहे. गौतम बँकेच्या माध्यमातून हजारो कुटुंबांची आर्थिक गरजा पूर्ण करून खासकरून छोटे आणि मध्यम व्यवसायिक, शेतकरी वर्ग आणि सामान्य नागरिक यांना आर्थिक साहाय्य देऊन विश्वसनीय संस्था म्हणून नावलौकिक कमविला आहे. मा.आ. अशोकराव काळे व आ.आशुतोष काळे यांनी विश्वासाने माझ्यावर दिलेली बँकेच्या विकासाची जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्वांना सोबत घेवून यशस्वीपणे पार पाडणार असल्याचे त्यांनी सांगितले.



## राहुरी तालुक्यातील सत्संग सोहळ्यात चोरी करणाऱ्या चार महिलांना पकडले

जनप्रवारस : प्रतिनिधी

राहुरी : तालुक्यातील राहुरी फॅक्टरी परिसरात प. पूज्य गुरु माऊली अण्णासाहेब मोरे यांच्या उपस्थितीत सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अनेक छोट्या मोठ्या चोरीच्या घटना घडल्या. चोरी करणाऱ्या चार महिलांची टोळी राहुरी पोलिस पथकाने रात्रभर कोंबीग ऑपरेशन करून गजाआड केली.

प. पू. गुरु माऊली अण्णासाहेब मोरे यांच्या उपस्थितीत ३१ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी राहुरी बाजार समितीच्या मुळा सूतगिरणी मैदान, राहुरी फॅक्टरी, येथे राष्ट्रीय सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्यातील माऊलींचे सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते. पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचा मोठा बंदोबस्त कार्यक्रम स्थळी तैनात करण्यात आला होता. तरी देखील छोट्या मोठ्या चोरीच्या अनेक घटना घडल्या. एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण चोरून नेले. सदर महिलेने राहुरी पोलिस ठाण्यात चोरीची फिर्याद दिली. त्यानंतर पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार सहाय्यक फौजदार तुळशीदास गिते, सुरज गायकवाड, राहुल यादव, प्रमोद ढाकणे, नदिम शेख, सतिष कुऱ्हाडे, सचिन ताजने, अंकुश भोसले आदि पोलिस पथकाने रात्रभर कोंबीग ऑपरेशन केले आणि बीड येथून चार महिलांच्या मुसक्या आवळून ताब्यात घेतले.

केशर सुखदेव जाधव, वय ५० वर्षे, रा. गांधीनगर, ता. जि. बिड, गवळण पांडुरंग गायकवाड, वय ४० वर्षे, रा. शास्त्री नगर, ता. जि. बिड, पुजा विशाल वाघमारे, वय २५ वर्षे, रा. खोकर माहे, ता. शिरुर, जि. बिड, पुजा विशाल मोहिते, वय २७ वर्षे, रा. साईतेज कॉलनी, नेवासा फाटा, ता. नेवासा, अशी ताब्यात घेतलेल्या महिलांची नावे आहेत. पोलिस पथकाकडून त्यांची चौकशी सुरु आहे. या घटने बाबत दुपारी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते. राहुरी पोलिस पथकाच्या या कारवाईचे अनेकांनी कौतुक केले.



## रसाळ बंधूंनी जपला वारसा जनसेवेचा

### गरिब कुटुंबातील मुलींना मदत देऊन स्त्री जन्माचे केले स्वागत

जनप्रवारस : प्रतिनिधी

जामखेड : समाजात आजही मूलगी जन्माला आली की काही लोकांची चिंता वाढते. आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या लोकांना राष्ट्रवादी काँग्रेसचे जामखेड यूवक तालूकाध्यक्ष पै सुरज रसाळ व यूवा उद्योगजक धीरज रसाळ हे बंधू त्यांचे वडील कै. रामभाऊ बाबुराव रसाळ उर्फ आबा यांच्या संकल्पनेतून आबासाहेब सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून सातत्याने समाजातील विविध प्रकारे समाजसेवा करत असतात. दि ३१ जानेवारी रोजी २०२४ – २०२५साठी दिघोळ माळेवाडी गावातील नूकत्याच जन्मलेल्या ९ मूलींच्या नावे आबासाहेब प्रतिष्ठानच्या वतीने पाच हजार रुपयांचा धनादेश मान्यवरांच्या हस्ते देऊन स्त्री जन्माचे स्वागत करण्यात आले. यावेळी तहसीलदार गणेश माळी, हभप रामकृष्ण रंधवे महाराज, खर्डा पोलीस स्टेशनचे एपीआय विजय जंजाळ, गटविकास अधिकारी शुभम जाधव, कृषी अधिकारी रवींद्र घुले, व दिघोळ माळेवाडी मधील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आबासाहेब सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून सर्व जाती धर्माच्या लोकांसाठी जेवढे काही सामाजिक करता येईल तेवढे करणार असे रसाळ बंधूंनी घोषित केले. नवरात्र उत्सवानिमित्त राज्यस्तरीय सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रम ९ दिवस केले. प्रत्येक शिवजयंतीला शालेय मूलांमध्ये वकृत्व स्पर्धा. तसेच शालेय विद्यार्थींना खेळाचे साहित्य वाटप करण्यात आले. रसाळ बंधू घ्या सामाजिक कामाचे कौतुक होत आहे.

## महानगरपालिकेच्या पाणी पुरवठ्याबाबत खोटी माहिती दिल्याबद्दल एकावर गुन्हा दाखल

जनप्रवारस : प्रतिनिधी

अहिल्यानगर : महानगरपालिकेच्या पाणी पुरवठ्याबाबत खोट्या बातम्या पसरवल्याप्रकरणी एकाविरोधात महानगरपालिकेने गुन्हा दाखल केला आहे. पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख परिमल निकम यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अल्तमश जरीवाला (रा. अहिल्यनगर) यांच्या विरोधात तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जल अभियंता निकम यांना त्यांच्या व्हॉट्सपवर विशेष सूचना- अहिल्यानगर महानगरपालिकेतर्फे सर्वांना विनंती आहे की, पाणी गरम करून प्यावे. जलशुध्दीकरण केंद्रातील फिल्टर मशीन बिघाड झाल्याने येत्या ३ किंवा ४ दिवसात कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेतर्फे पाणी फिल्टर न करता सोडण्यात येणार आहे. कृपया ही माहिती आपल्या सर्व मित्र परिवाराला कळवावी आणि आपण पण काळजी घ्यावी., अशा आशयाचे पत्रक असलेला मेसेज आला. अशा खोट्या बातम्या पसरवून महानगरपालिकेची बदनामी केल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हटले आहे. नागरिकांनी महानगरपालिकेबाबत अशा प्रकारच्या बातम्या प्रसारित करण्यापूर्वी, पोस्ट व्हायरल करण्यापूर्वी खात्री करावी, खोट्या बातम्या पसरवून नागरिकांमध्ये दिशाभूल करू नये, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.




## संभाजी महाराज समाधी स्थळी बीजेएस महाविद्यालयाचा हेरिटेज वॉक संपन्न

जनप्रवारस : प्रतिनिधी

सणसवाडी : श्री क्षेत्र वढू बुद्रुक (ता.शिरूर) येये बी.जे. एस. महाविद्यालय विद्यार्थ्यांचा ऐतिहासीक भेट दौरा ( हेरिटेज वॉक) संपन्न झाला. संभाजी शिवले गुरुजी यांनी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जाज्वल इतिहासाची माहिती दिली. मराठ्यांच्या इतिहासाची रक्तरंजित, चित्तथरारक असे जाज्वल्य पराक्रमाची साक्षीदार असलेली वीरभूमी म्हणजे वढू बुद्रुक असल्याचे प्रतिपादन शिवले गुरुजी यांनी केले.

तसेच महाराजाच्या जन्मापासून ते हत्येपर्यंतचा इतिहास व मृत्युसमयी झालेल्या हालअपेष्टा ऐकताना विद्यार्थी भरलेल्या डोळ्यांनी अक्षरशः भारावले होते.

प्राचार्य डॉ. संजय गायकवाड यांनी अहिल्याबाई होळकरांचे कार्य आणि कर्तृत्व या विषयावर मौलिक माहिती दिली. यावेळी छत्रपती संभाजी महाराज समाधी, कवी कलिश समाधी, शिवमंदिर इत्यादी वास्तूंचा इतिहास समजावून घेतला.

यावेळी प्रतिमेचे पूजन सरपंच ज्ञानेश्वर भंडारे, माजी सरपंच अंकुश शिवले, माजी सरपंच अनिल शिवले, माजी उपसरपंच हिरालाल तांबे, रमाकांत शिवले, संतोष शिवले, ग्रामसेवक शंकर भाकरे, पोलीस पाटील जयसिंग भंडारे, माजी विद्यार्थी किरण शिवले, संतोष शिवले व इतर मान्यवर यांच्यासह १०० विद्यार्थी उपस्थित होते.

प्रयाग राज येथील कुंभमेळ्यातील आणलेल्या पवित्र कलशातील जल शंकराच्या मंदिरात रुद्र पठण करत जलाभिषेक करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भूषण फडतरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सचिन कांबळे यांनी तर आभार चेअरमन बाळासाहेब सूर्यवंशी यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. भूषण फडतरे, डॉ. सचिन कांबळे, प्रा. बंडू ब्राम्हणे, शुभम आव्हाळे माजी विद्यार्थी किरण शिवले. सरपंच ज्ञानेश्वर भंडारे, संतोष शिवले व ग्रामपंचायत सर्व सदस्य यांनी केले.

## ना.विखे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे सोयाबीन खरेदीला मुदतवाढ

### ६ फेब्रुवारी पर्यत सुरू राहाणार खरेदी केंद्र

जनप्रवास : प्रतिनिधी



अहिल्यानगर : केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत किंमतीत सोयाबीन खरेदी करण्यासाठी ६फेब्रुवारी २०२५ पर्यत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.सोयाबीन खरेदीला मुदतवाढ मिळावी यासाठी ना.विखे पाटील यांनी पाठपुरावा केला होता.

हंगाम २०२४-२५ मध्ये आधारभूत किंमतीने सोयाबीन खरेदी करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला होता.यासाठी ३१जानेवारी २०२४ पर्यतची मुदत देण्यात आली होती.

जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे.त्याप्रमाणात खरेदी केंद्राची संख्या कमी असल्याने सोयाबीन खरेदी मोठ्या होणे बाकी आहे.यासंदर्भात अनेक सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी पालक मंत्री विखे पाटील यांची भेट घेवून सोयाबीन खरेदीला मुदतवाढ देण्याची मागणी केली होती.

ना.विखे पाटील यांनी पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याशी संपर्क साधून सोयाबीन खरेदीला मुदतवाढ देण्याबाबत निर्णय करण्याबाबत चर्चा केली.विशेष म्हणजे मंत्री जयकुमार रावल दिल्ली मध्येच असल्याने त्यांनी याबाबत केंद्रीय मंत्र्यांशी चर्चा करून सोयाबीन खरेदीला मुदतवाढ देत असल्याचे ना.विखे पाटील यांना कळवले.

सहकार व पणन विभागाच्या अप्पर सचिव संगिता शेळके यांनीही शासनाचे परीपत्रक काढून या निर्णयाची माहीती जिल्ह्यातील सोयाबीन खरेदी करणाऱ्या केंद्राना कळवली आहे.

# डोंबिवलीत देवीचापाडा येथील जुगार, गांजाच्या अड्डयांमुळे नागरिक त्रस्त

जनप्रवास प्रतिनिधी
डोंबिवली :
डोंबिवली पश्चिमेतील देवीचापाडा येथील सत्यवान चौकातील जुगार अड्डा आणि देवीचापाडा येथील खाडी किनारच्या जेट्टीवर गांजा सेवन करणाऱ्यांच्या अड्ड्यांमुळे स्थानिक रहिवाशांबरोबर शहरातून खाडी किनारी फिरण्यास येणाऱ्या नागरिकांना सर्वाधिक त्रास होत आहे. महिलांना जीव मुठीत घेऊन या भागात फिरावे लागते.

पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या आदेशावरून गैरकृत्यांविरुध्द जोरदार मोहीम सुरू असताना विष्णुनगर पोलीस ठाणे हद्दीतील देवीचापाडा येथील सत्यवान चौकात एक जुगार अड्डा २४ तास सुरू आहे. हा अड्डा सत्यवान चौकातील खंडोबा मंदिर समोरील महालक्ष्मी सुपर मार्केट जवळ आणि दत्तु साई इमारतीजवळ गल्लीत असलेल्या एका मोडक्या चाळीत सुरू आहे. या जुगार खेळणाऱ्यांची वाहने मुख्य रस्त्यावर उभी केलेली असतात. त्यामुळे पादचारी, वाहन चालकांना त्यांचा त्रास होतो. स्थानिक रहिवासी या जुगार अड्ड्यामुळे त्रस्त आहेत.

या जुगार अड्ड्यावर येणारे बहुतांशी खेळगडी हे यापुर्वीचे गुन्हेगार, तडीपार गटातील असल्याचे स्थानिक रहिवाशांनी सांगितले. याविषयी उघड बोलले तर जुगार अड्डा चालक त्रास देतील या भीतीने उघडपणे कोणीही रहिवासी याविषयी बोलत नाही. या चाळीवर पोलिसांची धाड पडली तर पाठीमागून पळण्यासाठी चाळीतून एक चोर वाट एका इमारतीच्या आवारातून ठेवण्यात आली आहे, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत अड्डा सुरू असतो, असे देवीचापाडा भागातील रहिवाशांनी सांगितले.

तसेच, देवीचापाडा खाडी किनारच्या गणेशघाट विसर्जन जेट्टीवर गांजा सेवन करणाऱ्यांच्या झुंडी दररोज दुपारी दोन नंतर दाखल होतात. रात्री उशिरापर्यंत ते जेट्टीच्या बाजुला अंत्यविधी कार्यासाठी बांधण्यात आलेल्या निवाऱ्यात, बाजुच्या खारफुटीच्या झाडांखाली गांजा सेवन करत बसलेले असतात. याठिकाणी त्यांचा दिवस, रात्री उशिरापर्यंत धिंगाणा असतो, अशा तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. देवीचापाडा खाडी किनारा ठिकाणी सकाळ, संध्याकाळ अनेक महिला, पुरूष निसर्गरम्य परिसर म्हणून कुटुंबीयांसह फिरण्यास येतात. खाडी किनारी गांजा सेवन करणाऱ्यांचे अड्डे असल्याने त्यामुळे नागरिकांना खाडी किनारी जाता येत नाही. महिला वर्ग, ज्येष्ठ नागरिक या अड्ड्यांमुळे या भागात अलीकडे फिरकत नाहीत, असे समजते.

देवीचापाडा भागातील स्थानिक, काही जाणकार नागरिक या सगळ्या प्रकाराविषयी तीव्र नाराज आहेत. पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या आदेशावरून सर्व पोलीस ठाणे हद्दीत गैरधंदे करणाऱ्यांविरुध्द जोरदार कारवाया सुरू असताना स्थानिक पोलिसांना हे गैरधंदे दिसत नाहीत का असे प्रश्न स्थानिक रहिवासी करत आहेत. पोलीस उपायुक्त झेंडे यांनी सत्यवान चौकातील जुगार अड्डा, देवीचापाडा जेट्टी येथील गांजा अड्डे उध्वस्त करण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी नागरिक करत आहेत.

## तात्पुरत्या मलमपट्टीमुळे ठाणेकरांचा प्रवास संकटात



जनप्रवास प्रतिनिधी
ठाणे :
ठाणे आणि घोडबंदर भागातून जाणाऱ्या महामार्ग आणि त्यावरील उड्डाण पुलांवर पावसाळ्याच्या काळात पडलेले खड्डे भरणीसाठी मास्टीकच्या साहाय्याने तात्पुरती मलमपट्टी करण्यात आली होती. परंतु महामार्ग तसेच उड्डाण पुलांवर खड्डे भरणीसाठी टाकण्यात आलेल्या मास्टीकचे फुगवटे तयार झाले असून काही ठिकाणी रस्ता उंच-सखल झाल्याने अपघातांची भिती व्यक्त होत आहे. काही ठिकाणी मास्टीकने भरलेले खड्डे पुन्हा उखडले आहेत. तात्पुरत्या मलमपट्टीमुळे ठाणेकरांचा प्रवास संकटात असल्याचे चित्र आहे.

ठाणे शहरातून मुंबई-नाशिक तर, घोडबंदर भागातून मुंबई-अहमदाबाद महामार्ग जातो. या मार्गांवर उरण जेएनपीटी बंदर, गुजरात, नाशिक आणि भिवंडी या शहरांमध्ये अवजड वाहनांची दुपार आणि रात्रीच्या वेळेत वाहतूक सुरू असते. याशिवाय, हे दोन्ही मार्ग शहरातील वाहतूकीसाठी महत्वाचे असून या मार्गावरून शहरातील नागरिकांच्या वाहनांची सतत वर्दळ सुरू असते. माजिवाडा ते गायमुखपर्यंतचा रस्ता आणि त्यावरील उड्डाणपुल सार्वजनिक बांधकाम विभागाकडे येतो. तर, ठाणे शहरातून जाणारा रस्ता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारित येतो. या मार्गांवर दरवर्षी पावसाळ्यात खड्डे पडतात आणि यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होतो. हे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच एमएमआरडीएच्या अखत्यारित येत असले तरी ते ठाणे शहरातून जात असल्याने खड्ड्यांच्या मुद्द्यावरून ठाणे महापालिका टिकेची धनी ठरते. नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी ठाणे महापालिकेने गेल्यावर्षी महामार्गावरील खड्डे भरणीची कामे केली. सिमेंट काँक्रीट किंवा इतर साहित्याने पावसाळ्यात बुजवलेले खड्डे उखडतात. यामुळे मास्टीकचा वापर करून खड्डे भरणीची कामे करण्यात आली. तसेच पावसाळ्यापुर्वी अनेक उड्डाण पुलावरील रस्ते मास्टिकच्या साहाय्याने तयार करण्यात आले होते. परंतु या मास्टिकमुळे अनेक ठिकाणी फुगवटे आले आहेत. तर, काही ठिकाणी रस्ता उंच-सखल झाल्याने अपघातांची भिती व्यक्त होत आहे.

घोडबंदर महामार्गावरील वाघबीळ, पातलीपाडा, कापुरबावडी आणि माजिवाडा उड्डाण पुलावर मास्टीकने रस्ते तयार करण्यात आले होते. काही ठिकाणी खड्डे भरणीसाठी मास्टीक वापरले होते. यातील वाघबीळ, पातलीपाडा उड्डाण पुलावर मास्टिक गोळा होऊन त्याचे फुगवटे झाले आहेत. अशीच परिस्थिती घोडबंदरहून ठाण्याकडे जाणाऱ्या मार्गिकेवर आहे. ठाण्यातून मुंबईकडे जाताना आनंदनगर चेक नाका भागातही मास्टिकचे फुगवटे आले आहेत. वेगाने येणारी वाहने मास्टिक फुगवटेवरून आदळतात. दुचाकी चालकांचाही तोल जाऊन ते पडतात. त्यामुळे या मार्गांवरील प्रवास जीवघेणा ठरू लागला आहे.


घोडबंगर मार्गावरील उड्डाण पुलांवर उन्हामुळे मास्टिक गोळा होऊन फुगवटे झाले आहे. हे मास्टिक काढून तेथे दुरुस्ती करण्यात येणार आहे. त्यासाठी वाहतूक पोलिसांकडून परवानगी घेण्यात येत आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आली.

## उल्हासनगरात आणखी दोन बांगलादेशी पकडले

जनप्रवास प्रतिनिधी
उल्हासनगर :
सैफ अली खानवर झालेल्या हल्ल्यानंतर मुंबई महानगर प्रदेशातील बांगलादेशी घुसखोरांचा प्रश्न ऐरणीवर आला असून स्थानिक गुन्हे शाखा आणि पोलिसांच्या झाडाझडतीत अनेक बांगलादेशी छुप्या पद्धतीने कोणत्याही वैध कागदपत्रांशिवाय राहत असल्याचे समोर येते आहे. नुकतेच उल्हासनगरात गुन्हे शाखा आणि विठ्ठलवाडी पोलिसांनी दोन बांगलादेशींना अटक केली असून दोघेही येथे काम करत वास्तव्यास होते.

गेल्या काही दिवसात उल्हासनगर गुन्हे शाखेने विविध कारवाईत १६ बांगलादेशी घुसखोरांवर कारवाई केली होती. विशेष म्हणजे यातील बहुसंख्य बांगलादेशी शहराच्या कोपऱ्यात चाळींमध्ये वास्तव्यास असल्याचे दिसून आले होते. नुकतेच विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या आशेळे गाव येथे पोलिसांनी कारवाई करत आणखी दोन बांगलादेशींना अटक केली आहे. यात उल्हासनगर गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत एका बांगलादेशी महिलेला अटक केली आहे. अटक केलेल्या महिलेचे नाव रुमा बीबी हाफिजुल खान (४०) असे आहे. ती आधी कोलकाता येथे राहत होती. त्यानंतर ती खडेगोवेली परिसरात स्थायिक झाली. पोलिसांनी महिलेला राहण्याची सोय करणाऱ्या घरमालक रफिक विश्वास (४९) याच्याविरुद्धही गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली गुप्त माहितीच्या आधारे गुन्हे शाखेने ही कारवाई केली आहे. तर दुसऱ्या कारवाईत आशेळे पाडा येथीलच दर्शना कॉलनी, गोपी कडू चाळ येथे राहणाऱ्या मुनीरूल महीमुद्दीन सरदार (४१) या बांगलादेशीला अटक करण्यात आली आहे. ही कारवाई बेकायदेशीरपणे राहणाऱ्या परदेशी नागरिकांविरुद्ध सुरू असलेल्या मोहिमेचा एक भाग आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## अटल सेतूवर लवकरच फूड प्लाझा आणि पेट्रोल पंप



जनप्रवास प्रतिनिधी
मुंबई :
देशातील सर्वात मोठ्या अटलबिहारी वाजपेयी शिवडी - न्हावाशेवा सागरी सेतूवरून अतिजलद प्रवास करणाऱ्या प्रवासी - वाहनचालकांना आता खानपानासह इंधनाची सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. अटल सेतूच्या शेवटच्या टोकाला असलेल्या जासई येथे फूड प्लाझा आणि पेट्रोल पंपची सुविधा उपलब्ध करण्याचा निर्णय मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) घेतला आहे. त्यादृष्टीने प्रक्रिया सुरू असून येत्या काही महिन्यात ही सुविधा कार्यान्वित होणार आहे.

मुंबई - नवी मुंबई अंतर केवळ १२ मिनिटात पार करता यावे यासाठी एमएमआरडीएने २१.८० किमी लांबीचा सागरी सेतू बांधला. हा सेतू जानेवारी २०२४ पासून वाहतूक सेवेत दाखल झाला. या सेतूवरून दिवसाला सरासरी २२ हजार ५०० वाहने धावतात. या सागरी सेतूमुळे प्रवास अतिजलद झाला आहे. मात्र सागरी सेतूवरुन प्रवास करताना वाहनचालक-प्रवाशांसाठी खानपानाची वा इंधनाची सुविधा उपलब्ध नाही. ही बाब लक्षात घेता आता एमएमआरडीएने अटल सेतूवर फूड प्लाझा आणि पेट्रोल पंप विकसित करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती एमएमआरडीएतील अधिकाऱ्यांनी दिली. अटल सेतूच्या नवी मुंबईच्या दिशेच्या असलेल्या जासई येथे फूड प्लाझा आणि पेट्रोल पंप बांधण्यात येणार आहे. या दोन्ही सुविधा खासगी कंपनीच्या माध्यमातून विकसित केल्या जाणार आहे. त्यानुसार ऑक्टोबर २०२४ पासून यासाठीच्या प्रक्रिया सुरू आहे. यासाठी एका खासगी कंपनीबरोबर चर्चा सुरू असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. अटल सेतूच्या दोन्ही बाजूच्या मार्गिकांवर जासई येथे फूड प्लाझा आणि पेट्रोल पंप असणार आहे. या सुविधा उपलब्ध झाल्यास वाहनचालक-प्रवाशांची मोठी सोय होणार आहे.

## तानसा अभयारण्यात पक्षी गणना: ७५ पक्ष्यांची नोंद

जनप्रवास प्रतिनिधी
शहापूर :
इंटरनॅशनल वेटलँड आणि वनविभागाच्या माध्यमातून अभयारण्यातील तानसा, मोडकसागर तलावांसह पाणवठ्यावर पक्ष्यांची गणना करण्यात आली. या पक्षी गणनेत ३५ पाणपक्ष्यांसह ७५ पक्ष्यांची नोंद झाली आहे. दरवर्षी हिवाळ्यात करण्यात येणाऱ्या पक्षी गणनेत स्थलांतरित पक्ष्यांसह स्थानिक पक्ष्यांची नोंद करण्यात येते. यंदा नकट्याबदक, थापट्याबदक, भुवई, तलवारबदक या पाणपक्ष्यांसह कॉमन सँडपायपर, ग्रीन सँडपायपर, वुड सँडपायपर, कॉमन ग्रीनशँक अशा पक्ष्यांची नोंद झाली आहे.

हिवाळ्यामध्ये प्रामुख्याने थंड प्रदेशातून विविध प्रकारचे पाण पक्षी तानसा अभयरण्यासह पाणवठ्यावर येतात. तानसा तलावासह, नदीपात्र व अभयारण्यातील पाणवठ्यांवर शनिवारी सकाळी सहा वाजेपासून ते आठ वाजेपर्यंत पक्ष्यांची नोंद करण्यात आली. यावेळी नकट्याबदक, थापट्याबदक, भुवई, तलवारबदक, पांढऱ्या छातीची पाणकोंबडी या पाणपक्ष्यांसह चिखले पक्षी देखील आले होते. यामध्ये कॉमन सँडपायपर, ग्रीन सँडपायपर, वुड सँडपायपर, कॉमन ग्रीनशँक यांसह गार्गेनी, नॉर्दर्न शोव्हलर, गॅडवॉल, युरेशियन विजियन, नॉर्दर्न पिंटेल, ग्रीन विंग्ड टील, ब्लॅक विंग स्टिल्ट, लिटल रिंग्ड प्लोव्हर, रेड वॅटल्ड लॅपविंग, फिजंट टेल जकाना, रिव्हर टर्न, लिटिल ग्रेब, एशियन ओपनबिल, पेंटेड स्टॉर्क, लिटिल कॉर्मोरंट, ग्लॉसी आयबिस, ब्लॅक हेडेड आयबिस, रेड नेप्ड आयबिस, लिटिल एग्रेट, इंडियन पॉन्ड हेरॉन, कॅटल एग्रेट, ग्रेट एग्रेट, मीडियम एग्रेट, ग्रे वॅगटेल, वेस्टर्न यलो वॅगटेल अशा ७५ पक्ष्यांची नोंद झाली आहे. वन्यजीव विभागाचे उप वनसंरक्षक अक्षय गजभिये, साहाय्यक वनसंरक्षक दत्तात्रेय मिसाळ यांच्या मार्गदर्शनाने खर्डी, तानसा, वैतरणा व परळी येथील वनपरिक्षेत्र अधिकारी एकनाथ रोंगटे, रमेश रसाळ, प्रकाश चौधरी, आणि पवार यांच्या सहकार्याने घुबड संवर्धन संस्थेचे वन्यजीव अभ्यासक व पक्षी निरीक्षक रोहीदास डगळे यांनी तानसा अभयारण्यात पाणपक्षी गणना केली.

## डोंबिवलीत सुभाष रस्त्यावर झाड कोसळून दुचाकींचा चुराडा



जनप्रवास प्रतिनिधी
डोंबिवली :
डोंबिवली पश्चिमेतील सुभाष रस्त्यावर रस्तारुंदीकरण आणि भुयारी गटार योजनेचे काम सुरू आहे. या कामासाठी जेसीबीच्या साहाय्याने खोदकाम सुरू असताना सुभाष रस्त्यावरील एका जुनाट वर्दळीच्या रस्त्यावरील जांभळाचे झाड रविवारी अचानक मुळासकट उन्मळून पडले. या झाडाखाली उभ्या करण्यात आलेल्या तीन ते चार दुचाकींचा चुराडा झाला. सुदैवाने यात जीवित हानी झाली नाही.

काही दिवसापूर्वी याच भागातील कागदे सभागृहाजवळ एक झाड गटाराचे काम सुरू असताना कोसळले होते. पेंडसेनगर भागात असाच प्रकार यापूर्वी घडला होता. रस्ते, गटारे काम करताना झाडांच्या आजुबाजुला खोदले जाते. या झाडांची आधार मुळे तुटतात. झाडाच्या परिसरात खोदकाम केल्यानंतर तेथे अनेक दिवस गटार, रस्ते बांधणी केली जात नाही. त्यामुळे झाडाचा आधार निघून जातो. हळूहळू मुळे सैल होत जातात. झाड अचानक एक दिवस कोसळते, असे एका जाणकाराने सांगितले.

सुभाष रस्त्यावर मारुती मोटार ट्रेनिंग शाळेच्या जवळ जांभळाचे जुनाट झाड आहे. या झाडाच्या परिसरात रस्ता रुंदीकरण आणि भुयार गटार योजनेचे काम सुरू आहे. या कामासाठी जेसीबीच्या साहाय्याने खोदकाम करण्यात आले आहे. या खोदकामानंतर या भागातील जांभळाचे झाड रस्त्यावर कोसळले. या झाडाखालील तीन ते चार दुचाकींना चुराडा झाला. सुदैवाने या भागातून झाड कोसळताना कोणी पादचारी जात नव्हता. अन्यथा दुर्घटना घडली असती, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

झाड कोसळल्यानंतर सुभाष रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली. रस्त्याच्या दुतर्फा वाहनांचा रांगा लागल्या. वाहनांनी गुप्ते रस्ता, गणेशनगर भागातून वळसा घेऊन इच्छित स्थळी जावे लागले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी येऊन पहिले झाडांच्या फांद्या तोडून रस्ता मोकळा केला. तोपर्यंत अर्धा ते एक तासाचा कालावधी गेला. तोपर्यंत या रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. झाड कोसळल्यानंतर या भागातील ठाकरे गटाचे पदाधिकारी राहुल चौधरी, सुनील पवार यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन अग्निशमन दलाला पाचारण केले. स्वता रस्त्यावर उभे राहून कोसळलेल्या झाडाच्या परिसरात झालेली वाहतूक कोंडी सोडवली. या झाडाखाली ज्या दुचाकी वाहन मालकांचे नुकसान झाले आहे. त्यांना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे, असे राहुल चौधरी यांनी सांगितले.एप्रिल, मे महिन्यात या जांभाळाच्या झाडाला जांभळांचा भर बहर यायचा. पहाटेच अनेक नागरिक रस्त्यावर पडलेली जांभळे वेचण्यासाठी येत असत. शाळकरी मुलांचा दिवसभर जांभळे खाण्यासाठी याठिकाणी राबता असायचा.

## प्राप्तिकर कराच्या बाबतीत नोकरदारांना,करदात्यांना, सर्वसामान्य व शेतकऱ्यांना सुद्धा दिलासा देणारा अर्थसंकल्प

### -आमदार विक्रम पाचपुते

जनप्रवास प्रतिनिधी
श्रीगोंदा : अर्थमंत्री निर्मला जी सिताराम यांनी सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय करदात्यांच्या अपेक्षेप्रमाणे फार मोठी सवलत प्राप्तिकरामध्ये या अर्थसंकल्पामध्ये दिलेली आहे. नोकरदारांच्या बाबतीत त्यांच्या स्टँडर्ड डिडक्शन मध्ये ५०००० पासून ७५ पर्यंत पर्यंत वाढ केल्यामुळे त्यांना १२ लाखापर्यंत उत्पन्न असेल तर टॅक्स लागणार नाही.

मात्र इतर करदात्यांच्या बाबतीत चार लाखापर्यंत उत्पन्न करमुक्त आहे ४ लाखाच्या पुढे ८ लाखापर्यंत पाच टक्के टॅक्स, ८ लाख ते १२ लाख,- दहा टक्के टॅक्स, १२ लाख ते १६ लाख-- पंधरा टक्के टॅक्स, १६ लाख ते २० लाख- वीस टक्के टॅक्स ,२० लाख ते २४ लाख- पंचवीस टक्के टॅक्स आणि २४ लाखाच्या पुढे तीस टक्के टॅक्स अशा पद्धतीने कररचनेमध्ये आणि कराच्या दरामध्ये फार मोठे बदल करण्यात आले असून त्याचा फायदा निश्चितपणे प्राप्तिकर करदात्यांना मोठ्या प्रमाणावर होणार आहे. हा फायदा सर्वच करदात्यांना कमी अधिक प्रमाणात होणार आहे .पन्नास हजारापासून करकपातीची मर्यादा ज्येष्ठ नागरिकांना एक लाखापर्यंत वाढवण्यात आलेली आहे .करकपातीसाठी घरभाड्याची मर्यादा सुद्धा वाढवण्यात आलेली आहे आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे ज्यांनी रिटर्न्स भरलेली नाहीत ते आता चार वर्षापर्यंत त्यांची प्राप्तिकर विवरणपत्र भरू शकणार आहेत.

यामध्ये प्राप्तिकर खात्याच्या कराच्या रूपाने मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये वाढ होणार आहे. तसेच विवरण पत्र न भरणाऱ्या करदात्यांची सुद्धा सोय होणार आहे .दंडापेक्षा करदात्यांना न्याय देण्यावर भर असल्याचा संकल्प अर्थमंत्र्यांनी बोलून दाखवला आहे .२०४७ पर्यंत नवीन अनुशक्ती धोरणानुसार १०० गिगा वॅट चे लक्ष ठेवलेले आहे. २०२५ मध्ये चाळीस हजार नागरिकांना घर देण्याचा संकल्प आहे .अनेक वस्तू त्यामध्ये एलईडी ,एलसीडी वैद्यकीय उपकरणे, टीव्हीचे पार्ट, इलेक्ट्रिक कार, मोबाईल संच स्वस्त होणार आहेत आणि त्यामुळे सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय नागरिकांना निश्चितपणे दिलासा मिळणार आहे.अर्थमंत्र्यांनी प्राप्तिकर विषयीचे नवीन विधेयक पुढच्या आठवड्यात सादर करणार आहे असे आश्वासन दिले आहे.

शेतकऱ्यांना सुद्धा काही अनेक सवलती देण्यात येणार आहेत.किसान क्रेडिट कार्डची मर्यादा पाच लाखापर्यंत वाढवणे, पाच लाखांपर्यंत कर्ज मर्यादा वाढवणे,शंभर जिल्ह्यामध्ये कृषिधन धान्य योजना लागू करणे ,सूक्ष्म उद्योगांना कर्ज देणे, मागासवर्गीय महिलांना मदत करणे ,अशा अनेक तरतुदी अहवालात केलेल्या आहेत. मेडिकल कॉलेजमधल्या जागा ७५ हजार पर्यंत वाढवणार आहेत आणि विशेषतः मध्यमवर्गाची क्रयशक्ती वाढवण्यासाठी कर रचनेमधील बदल निश्चितपणे उपयोगी ठरणार आहेत. एकंदरीत सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय नागरिकांना, करदात्यांना आणि शेतकऱ्यांना सुध्दा या बजेटमुळे दिलासा मिळणार आहे अशी माहिती आमदार पाचपुते यांनी दिली.

## त्याच्या नशिबी आता आजीवन बंदीवासच

जनप्रवास प्रतिनिधी
मुंबई :
संक्रांतीचा सण पतंग उडवून साजरा करण्याची प्रथा मुंबईत चांगलीच लोकप्रिय झाली आहे. कोण कोणाचा पतंग कापणार या खेळातली उत्कंठा पक्ष्यांच्या जीवावर बेतत आहे. दरम्यान, या पतंगबाजीने एका घुबडाला कायमचे जायबंदी केले आहे. मांजामध्ये अडकलेल्या या घुबडाचे प्राण वाचले, मात्र त्याचे उडणे कायमचे बंद झाले. यामुळे त्याच्या नशिबी आता बंदीवास आला आहे.

संक्रांत जवळ येऊ लागताच अनेक मुंबईकर पतंगा उडविण्यात मग्न होतात. पतंग उडविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मांजामुळे जखमी होणाऱ्या पक्ष्यांची लक्षणीय आहे. पतंग उडविण्याचा आनंद दिवसेंदिवस पक्ष्यासाठी धोक्याची घंटा ठरत आहे. काही दिवसांपूर्वी पतंगाच्या मांजामध्ये एक घुबड अडकले होते. त्याचा बचाव करण्यात आला असून, त्याच्यावर वैद्यकीय उपचारही करण्यात आले. मात्र, घुबडाच्या पंख्याला झालेल्या गंभीर दुखापतीमुळे आता तो कधीच उडू शकणार नाही. त्यामुळे त्याला पुन्हा नैसर्गिक अधिवासात सोडणे शक्य नाही. त्याला पुढील आयुष्य बचाव केंद्रातच काढावे लागणार आहे. निसर्गापासून तो वंचित राहणार आहे. दरम्यान, दरवर्षी पतंग उडविण्याचा आनंद लुटत असताना मांजामुळे अनेक पक्षी जखमी होतात.

## ठाण्यात टाकाऊ वस्तुंपासून पालिकेने बनविल्या कलाकृती

जनप्रवास प्रतिनिधी
ठाणे :
टाकाऊ वस्तुंचा पुर्नवापर करण्याबाबतचा संदेश देण्यासाठी ठाणे महापालिकेने टाकाऊ वस्तुंपासून चार कलाकृती तयार केल्या आहेत. यामध्ये ठाणे बदलतंय, टायर टू ट्रेजर, तंत्र फुलपाखरु आणि सायकल टू सस्टेनिबिलिटी यांचा समावेश असून या कलाकृती कोलशेत, गायमुख चौपाटी, ठाणे महापालिका मुख्यालय आणि उपवन येथे ठेवण्यात आल्या आहेत. या कलाकृती सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत.

ठाणे महापालिका क्षेत्रात दररोज १ हजार मेट्रीक टनच्या आसपास कचरा जमा होतो. त्यात ६० टक्के ओला तर, ४० टक्के सुका कचरा असतो. सुका कचरा वर्गीकरण करण्यात येते. यामध्ये टायर, लाकूड, धातू, सायकल टायर, रिंग, प्लास्टिक पाईप आणि ई कचऱ्याचा समावेश असतो. या कचऱ्याचा पुर्नवापर करणे गरजेचे असून याविषयीचा संदेश देण्यासाठी ठाणे महापालिकेने अनोखा उपक्रम राबविला आहे. या कचऱ्याचा पुर्नवापर करून पालिकेने आकर्षक कलाकृती तयार केल्या आहेत. त्यामध्ये ठाणे बदलतंय, टायर टू ट्रेजर, तंत्र फुलपाखरु आणि सायकल टू सस्टेनिबिलिटी यांचा समावेश आहे. यापैकी या कलाकृती कोलशेत, गायमुख चौपाटी, ठाणे महापालिका मुख्यालय आणि उपवन येथे ठेवण्यात आल्या आहेत.

**ठाणे बदलतंय**

ठाणे बदलतंय ही १८० किलो वजनाची कलाकृती प्लास्टिक आणि ई-कचऱ्याचा वापर करून तयार करण्यात आली असून त्यासाठी प्लास्टिक आणि ई-कचरा वापरला आहे.

**टायर टू ट्रेजर ही कलाकृती**

पावसाळ्यात रिकाम्या टायरमध्ये पाणी साचून डेंगू- मलेरियाचे डास तयार होता. त्यामुळे अशा टायरचा आणि लाकडाचा पुर्नवापर करून १२० किलो वजनाचे टायर टू ट्रेजर ही कलाकृती तयार करण्यात आली आहे.

**तंत्र फुलपाखरु**

कचऱ्यातील ई- कचरा, स्क्रॅप धातू, सायकल टायर रिंग यापासून १२० किलो वजनाचे तंत्र फुलपाखरु तयार करण्यात आले आहे.

**सायकल टू सस्टेनिबिलिटी**

हवा प्रदुषण रोखण्याचा संदेश देण्यासाठी सायकल टू सस्टेनिबिलिटी ही १०० किलोची कलाकृती सायकल, सायकल टायर, प्लास्टिक, पाइप यापासून बनविण्यात आली आहे. टाकाऊ वस्तुंचा पुर्नवापर करण्याबाबतचा संदेश देण्यासाठी कचऱ्यातील टाकाऊ वस्तुंपासून चार कलाकृती तयार केल्या आहेत. या कलाकृतींमुळे शहराच्या सुशोभिकरणातही भर पडत आहे.

**- डॉ. राणी शिंदे**
**घनकचरा व्यवस्थापन अधिकारी, ठाणे महापालिका**

दै.जनप्रवास वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा !!

माळवाडगाव विविध कार्यकारी
सहकारी संस्था मर्यादित, माळवाडगाव
तालुका-श्रीरामपूर, जिल्हा-अहिल्यानगर

श्री. गिरिधर किसनराव आसने - चेअरमन
श्री. उमेश दत्तात्रय लटमाळे - व्हा.चेअरमन
श्री. रमेश शंकर जाधव - मुख्य सचिव

श्री.निवृत्ती कारभारी आसने
श्री.बाबासाहेब सयाजी आसने
श्री.नानासाहेब विष्णू शिंदे
सौ.किसनाबाई नानासाहेब आसने
श्री.भास्करराव रायभान आसने
सौ.अर्चना अशोक आसने
श्री.सुरेश भाऊसाहेब चिडे
सौ.लताबाई दिलीप आसने
श्री.अमोल भारत मोरे
श्री.भाऊसाहेब जयवंत आसने(सेल्समन)
श्री.राजेंद्र बाबासाहेब आढाव
श्री.प्रदीप सुभाष आसने (क्लार्क)

*- स्विकृत संचालक मंडळ -*
श्री. बबनराव लटमाळे
श्री. लक्ष्मण आसने
श्री. गोरक्षनाथ दांगट

शुभेच्छुक - सर्व सभासद, कर्मचारी वृंद, माळवाडगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटी.

मुठेवाडगाव विविध कार्यकारी
सहकारी संस्था मर्यादित, मुठेवाडगाव
तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर



श्री. डॉ. शंकरराव वसंतराव मुठे पा.

श्री. संभागिर (संभाजी) सारंगधर गोसावी पा. (चेअरमन)
श्री. दत्तात्रय ज्ञानदेव जासूद पा. (मुख्य सचिव)

*- माननीय संचालक मंडळ -*
श्री.डॉ. शंकरराव वसंतराव मुठे पा.
श्री. शिवाजी लक्ष्मण मुठे पा.
सौ.शकुंतलाबाई संपतराव मुठे पा.
श्री. रमेश माणिक मुठे पा.
श्री. भागवतराव चंद्रभान मुठे पा.
सौ. द्वारकाबाई बाळकृष्ण मुठे पा.
श्री. किरण सिताराम मुठे पा. (सेल्समन)
श्री. विलास मुरलीधर खैरे पा. (शिपाई)

सर्व सभासद, कर्मचारी वृंद, मुठेवाडगाव
विविध कार्यकारी सहकारी सोसायटी



येणाऱ्या महानुभावं धर्मियांच्या सेवेसाठी
श्री.चक्रपाणी महानभावं आश्रम,भोकर ता. श्रीरामपूर
महंत. प.पू गुंफेकर बाबा महानुभाव
गुंफेकर परिवार, संत महंत, वासनेक,उपदेशी

माळवाडगावचे लोकनियुक्त सरपंच



मा.बाबासाहेब पा.चिडे
(सरला बेट संस्थानचे विश्वस्त)
लक्ष्मीमाता मिल्क ॲण्ड मिल्क प्रोसेस
खोकर फाटा,नेवासा रोड, ता. श्रीरामपुर
कर्मचारी वृंद, संचालक, हितचिंतक

# स्त्रियांना भीतिदायक स्वप्नं जास्त पडतात



पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना जास्त प्रमाणात भीतीदायक स्वप्नं पडतात आणि या स्वप्नांमुळे घडणारे गंभीर परिणाम स्त्रियांना दीर्घकाळपर्यंत भोगावे लागतात. शारीरिक तापमानात घडून आलेल्या बदलामुळे स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत जास्त प्रमाणात वाईट स्वप्नं पडतात असे ब्रिटिश विद्यापीठाच्या एका अभ्यासात आढळून आले आहे.

ब्रिस्टल येथील विद्यापीठाचे डॉ. जेनी पार्कर यांनी म्हटले की, ''स्त्रियांनी पुरुषांच्या तुलनेत जास्त वाईट स्वप्नं पडल्याच्या तक्रारी दाखल केल्या.''

या अभ्यासावरून असेही स्पष्ट झाले की, १९ टक्के पुरुषांनी वाईट स्वप्नं पडल्याची तक्रार दाखल केली, तर याबाबतीत स्त्रियांचे प्रमाण ३० टक्क्यांएवढे होते. शास्त्रज्ञांनी असेही सांगितले की, स्त्रियांना पडणारी स्वप्नं जास्त भावनात्मक असतात आणि झोपेतून उठल्यानंतर त्यांच्या मनावर त्या स्वप्नांचा होणारा परिणाम बराच काळ टिकून राहातो. १७० लोकांवर केल्या गेलेल्या या अध्ययनाच्या शेवटी असे आढळून आले की, मासिक पाळीमुळे स्त्रियांच्या शरीरातील तापमानात होणाऱ्या बदलामुळे त्यांना चमत्कारिक आणि वाईट स्वप्नं पडतात.

मासिक पाळीचा निम्मा काळ पूर्ण होण्याच्या दरम्यान घडणाऱ्या अंडोत्सर्ग क्रियेमुळे त्यांच्या शरीराचे तापमान वाढते आणि पाळी सुरू होण्यापूर्वी हे तापमान कमी होते. डॉ. पार्क म्हणाले की, ''मासिकपाळी सुरू होण्यापूर्वी स्त्रियांना जास्त भीतीदायक स्वप्नं पडतात आणि त्यांचा परिणामही बराच काळ ठेवतात.''

# गोड बोला, यश तुमचेच!



० बोलताना विचित्र चेहरा करू नका. बोलताना उगाचच हातवारे करू नका अथवा हलवू नका. फारच आवश्यक नसेल तर समोर जेव्हा दोन माणसे असतात तेव्हा त्यातील एकाच्या कानात हळूवारपणे काही सांगू नका.

० शब्दांचा रवंथ केल्यासारखा उच्चार करू नका, खाली मान घालून बोलू नका. ० बोलताना उत्तेजित होऊ नका.

० बोलताना तुमची जीभ कोठे अडखळत नाही ना? तसे असल्यास ही सवय घालवण्याचा प्रयत्न करा.

० तुम्ही कपाळावर वा डोक्यावर हात फिरवणे, ओठ चावणे किंवा बोटे चाटणे अशा कृती करीत नाही ना याची खात्री करा.

० समोरच्या माणसाशी ताठ मानेने, नजरेला नजर देऊन बोला, त्यातून तुमचा आत्मविश्वास प्रतीत होईल. बोलताना तुमची नजर जर इकडे-तिकडे भटकत असेल तर त्याचा चांगला प्रभाव पडत नाही.

० मध्येच विषयांवर करून बोलू नका ते इतरांना खटकते.

० गरजेपेक्षा जास्त तोंड उघडे ठेवून बोलणे योग्य नाही.एकच गोष्ट वारंवार सांगणे, अस्पष्ट बोलणे, फार बोलणे, फार थांबून-थांबून बोलणे हे समोरच्याला खटकते. हे लक्षात ठेवा.

० तुमच्या उच्चारावर लक्ष ठेवा. आरशासमोर उभे राहून एखाद्या वृत्तपत्रातील मजकूर स्पष्ट उच्चारात वाचण्याचा प्रयत्न करा. शक्य असेल तर आपले बोलणे टेप करून ऐका यातून स्पष्ट उच्चारण साध्य होते. तुम्ही जर उत्कृष्ट वक्ते असाल तर ती उत्तमच गोष्ट आहे, पण यापेक्षा जास्त महत्वाची गोष्ट आहे ती तुम्ही चांगले श्रोतेही बना. माणसाचे बोलणे पूर्ण होण्याच्या आत तुमचे घोडे पुढे दामटण्याचा प्रयत्न करू नका. जास्त बोलण्याच्या नादात तुम्ही तुमचा हेका चालवत आहात हे लक्षात आल्याने लोक तुम्हाला टाळतील.

# योग्य पध्दतीने मसाज केला तर सुदृढ राहतील केस



आपण शरीरासाठी जे अन्न खातो त्यामुळे केसांचेही जे अन्न खातो त्यामुळे केसांचेही पोषण होत राहतो, परंतु डोक्याचे स्नायू उत्तेजित करून रक्ताभिसरण वाढवण्यासाठी ते हलवणे, दाबणेही गरजेचे असते जे मसाजाद्वारे करता येते.

केसांमध्ये भरपूर तेल ओतून तळहाताने डोके व केस चोळणे ही परंपरागत पध्दत कोणत्याही दृष्टीने योग्य नसते. जर आपण केसांची रचना पाहीलीत तर केस आपल्या डोक्याच्या त्वचेतून निघाल्यासारखे जाणवते. खरे तर केसांची मुळे त्वचेच्या खाली असतात. त्वचेवर केसांचा आधार व त्यांची लांबीच असते.

जर आपण डोक्याची त्वचा जोरात चोळली तर केसांचा आधार कमकुवत होत जाईल व केस वरून वा मुळापासून तुटू लागतील. शिवाय, अशा मसाजाने त्यांचा गुंताही होतो व सोडवताना पुन्हा केस तुटतात. यासाठी मसाज करताना तळहाताऐवजी बोटांचाच वापर करायला हवा. बोटांचा वेग व लय त्वचेत कंपने जाणवणारी असावी. मसाज करताना डोके जोरजोरात हलवणे व चोळणे एकदम चुकीचे असते. कानपट्टींवर व डोक्यामागील हेअर लाइनजवळ दोन्ही हातांच्या अंगठ्यांनी दाबत डोक्याच्या त्वचेवर गोल गोल फिरवत मसाज करावा. जर केस सामान्य असतील तर आठवड्यातून एकदा, रूक्ष असतील तर आठवड्यातून दोनदा व जास्तच रूक्ष असतील, तर आठवड्यातून किमान तीनदा केस धुण्यापूर्वी मसाज अवश्य करावा. तशी आज केसांच्या मसाजासाठी अनेक उपरकणेही मिळतात. जी हातांपेक्षा जास्त कंपने डोक्यात निर्माण करतात. त्यामुळे शिरांमधील ताण संपून रक्ताभिसरणही वाढते. जे केसांच्या स्वास्थ्य-सुधारणेसाठी अत्यंत गरजेचे असते.

# मोठ्या माणसांची औषधे लहान मुलांना देवू नयेत



आपल्या घरातला कोणीतरी सदस्य आजारी असतो. काहींना दीर्घकाळ औषधं घ्यावी लागतात. अशावेळी वर्षानुवर्षे दवाखान्याच्या व मेडिकल स्टोअर्सच्या पायऱ्या चढून उतरुन आपण अनुभवाने अर्धा-पाव डॉक्टर बनतो व रोगावर इतरांना औषध सुचवत राहतो, हे चुकीचे आहे. व्यक्ती तितक्या प्रकृती असल्याने कोणतीही गोळी वा औषधे इतरांना सुचवु नयेत की, पाकिटात आहेत म्हणून देऊ नयेत. काही लोक डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधं पूर्ण न आणता अर्धा डोसच आणतात. चार गोळ्यांऐवजी दोनच आणून खातात; पण डोस पूर्ण न घेणे हे चुकीचे असते. ताबडतोब आराम पडावा म्हणून काहीजण एका ऐवजी दोन गोळ्या खातात. हे सुद्धा फार चुकीचे आहे. त्यामुळे प्रकृतीवर ताण येतो. ताप ज्या क्रमाने चढला त्याच क्रमाक्रमाने उतरला पाहिजे. एकाला पूर्वी ताप आला होता. त्याची औषध घरी शिल्लक आहेत म्हणून नंतर दुसऱ्या कोणाला ताप आला की ती औषधं वापरणंसुद्धा चुकीचं असतं. औषधांच्या एक्स्पायरी डेट पहाव्यात, मोठ्या माणसांची औषध मुलांना देऊ नयेत. अशामुळे जीवाला धोका होऊ शकतो. ताण उतरला म्हणून तापाची औषधं लगेच बंद करू नयेत. पुरा डोस घ्यावा. त्वचा रोगावरची औषधं, संधिवातावरची औषधं, दमा, क्षय, कुष्ठ, मधुमेह व ब्लडप्रेशरची औषध दीर्घकाळ घ्यावी लागतात. तसेच या रोगांची तपासणी वरचेवर करून घ्यावी लागते. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध घेणं बंद करू नये किंवा त्यांचे प्रमाण कमी करू नये. भंगारवाल्याला मोकळ्या औषधबाटल्या विकण्या पूर्वी त्या पूर्णपणे रिकाम्या करा. बाटल्या पाण्यात धुवा. बाटल्यावरची लेबल्स काढा. ती लेबल तशीच राहिली तर बनावट औषध बनवणाऱ्यांचे फावते. काही वेळा त्यांचा गैरवापर होऊ शकतो. औषधं, गोळ्या लहान मुलांच्या हाताला येणार नाहीत अशी उंचावर किंवा कपाटात ठेवा. घरात दोन-तीन पेशंट असतील तर त्यांची औषधं व गोळ्यांच्या चिठ्ठ्या वेगळ्या ठेवा. गडबडीत याचे औषध त्याला होऊ शकते.

# दिवस नोकरीसाठी, रात्र एन्जॉयसाठी




दिवसभरात वेळ काढायला कोठे जागा नसते, रात्रीची झोप मात्र सहजपणे कमी करता येते, शिवाय रात्रीच्या एन्जॉयमेंटमध्ये मनाला हवा असलेला शांतपणा, निवांतपणाही अनुभवता येतो. तरूण पिढीच्या या गणिताविषयी आणि जुळवाजुळवाविषयी मानसशास्त्रज्ञांनी मात्र चिंता व्यक्त केली आहे.

टार्गेट ओरिएंटेड कामामुळे मनावरील दडपण एवढे वाढले आहे की, मागच्या पिढीतील नोकरदार मंडळी रविवारच्या आशेवर जगत असत, तितकी सहनशीलता आता आमच्यात उरलेली नाही. आम्ही रात्रीच्या नाईटलाइफच्या आशेवर जगतो. रात्रीसाठी पार्टी, मित्रांशी गप्पा, म्युझिक किंवा चित्रपट, मौजमजा, इंटरनेटवर चॅटिंग, गिटार वाजवणे, चटपटीत मसालेदार काही खात भटकणे असा भरगच्च कार्यक्रम राखून ठेवलेला असतो. त्या आनंदाची स्वप्ने पाहताच आम्ही आमचा दिवस साजरा करतो. नाईटलाइफचा आधार दिवस रेटण्यासाठी मोठे बळ पुरवतो, अशी प्रतिक्रिया बीपीओ मध्ये काम करणाऱ्या अभय या तरूणाने व्यक्त केली. आयटी कंपनीत महत्वकांक्षी करिअर करण्याची इच्छा बाळगून असलेल्या गार्गीनेही अभयच्या म्हणण्यास दुजोरा दिला.

नाईटलाइफ फक्त मौजमजेसाठीच असते असे नाही, तर काही मंडळींना हा काळ त्यांच्या क्रिएटिव्हीसाठीही महत्वाचा वाटतो. स्वत:ला मला रात्रीच्या वेळी अत्यंत रिलॅक्स्ड वाटते आणि माझी क्रिएटिव्हिटी उफाळून मनाच्या पृष्ठभागावर येते. मला गिटार वाजवण्याचा छंद आहे आणि रात्रीच्यावेळी गिटार वाजवताना माझी समाधी लागते. साडेबारा किंवा अगदी एक-दीडही कधी वाजून गेले हे लक्षातही येत नाही, गार्गी मन:पूर्वक बोलत होती. मानसशास्त्रांनी मात्र या तथाकथित आधुनिक जीवनपध्दतीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. रात्रभर अशाप्रकारे जागरण करणे, मानसिक शारिरीक आरोग्याच्या दृष्टीने घातक आहे.

हे तरूण एका रात्रीत कशीबशी चार तासांचीच झोप घेतात, तीही गाढ आणि अखंड नसते. पुरेशा झोपेअभावी तरूणांवर रागीट, चिडचिडा स्वभाव, मानसिक तणाव, एकाग्रतेची कमतरता, अशक्तपणा, अकार्यक्षमता हे दुष्पपरिणाम दिसून येऊ लागले आहेत. मानसोपचारतज्ज्ञांकडे आठवडाभरात किमान चार अशा केस जाऊ लागल्या आहेत. आपले बहुतेक प्रॉब्लेम झोपेअभावी निर्माण झाले आहेत, हे तरूणांच्या लक्षातही आलेले नसते, हे अशा बहुसंख्य प्रकरणांत आढळून आले आहे.

# पती-पत्नीने आपल्या विचारांबाबत परस्परांची चर्चा करावी



नवरा - बायकोत भांडणे ही तशी सर्वसामान्य बाब; परंतु ते वाढवणे ही एक वेगळी गोष्ट आहे. पती - पत्नीत जर काही वाद झाला तर ते एकमेकांना समजावू शकतात; पण मध्ये काही माणसे या आगीत तेल ओतण्याचे काम करतात. दोहोंमध्ये भांडणे होण्याची अनेक कारणे असू शकतात. जर दिवसभर दमून घरी परतलेल्या पतीला त्याची पत्नी अव्यवस्थित दिसली तर त्याला राग येतो. याऐवजी पत्नीने टवटवीत रूपात त्याला चहाचा कप दिला तर तो स्वत:ला नशीबवान मानतो. बऱ्याचदा याउलटही होते. पत्नी दिवसभराची कामे संपवून पती येईपर्यंत फ्रेश होऊन तयार होऊन बसते; पण पती तिच्याकडे लक्ष देत नाही. पत्नीच्या इच्छा पाहत नाही व त्यामुळे पत्नी नाराज होते.

काही वेळा पत्नीच्या नातेवाइकांकडे पतीचे वा पतीच्या नातेवाइकांकडे पत्नीचे दुर्लक्ष झाल्यामुळेही भांडणे होतात.

अशा कारणांमुळे घरात भांडणे होतात. या घरगुती भांडणांमुळे हल्ली देशात घटस्फोटांच्या घटनाही वेगाने वाढत आहेत. ज्याचे प्रमुख कारण आहे तरूण - तरूणींमधील अहंकार व एकमेकांना ओळखण्याचा प्रयत्न न करणे. जर थोडेसे समजूतदारपणे घेतले तर आपण आपला संसार उद्ध्वस्त होणे टाळू शकतो.

लग्नानंतरच्या पहिल्या रात्रीच पती - पत्नींनी आपले विचार एकमेकांना सांगायला हवेत. आपल्या मनातील शंकांचे निरसन नि:संकोचपणे करायला हवे. यामुळे भविष्यात कोणतेही पाऊल उचलताना परस्परांचा विचार केला जाईल. बरेच नातेवाइक आग लावून देण्याचे काम करीत असतात अशा नातेवाइकांपासून दूर राहाया हवे. कधीही आपल्यातील गुपिते नातेवाइकांना सांगू नयेत. पती - पत्नीत एखाद्या गोष्टीवरून बिनसले तर आपसात तो वाद मिटवावा.

वाद मिटवताना कोणत्याही स्थितीत मनात अहंकार नसावा. तसेच एकमेकांचा पाणउताराही करू नये. शांत चित्ताने सारे हेवे - दावे विसरून वाद मिटवावा. एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवावी. पती - पत्नी जर नवरा - बायकोऐवजी खरे मित्र बनून राहिले तर जगातील कोणतीही ताकद त्यांना वेगळे करू शकणार नाही. त्यांनी कोणतीही समस्या

# ताजी फळे खाणे बुध्दीला वरदान...



स्मरणशक्ती वाढण्यास फळांच्या रसाचा सिंहाचा वाटा आहे. फळांचा रस प्या किंवा ताजी व तयार फळे खाणे हे उत्तम आरोग्यासाठी महत्वाचे आहे. फळे खाण्याने माणूस तणावमुक्त होतो. वास्तविक पाहता फळे तर सर्वच जण खातात; पण कोणती फळे केव्हा खावीत हेही माहित असणे तितकेच महत्वाचे आहे.

**फ्रूट कॉकटेल**

☐ मुले जेव्हा खेळून किंवा शाळेतून येतात तेव्हा त्याचा थकवा दूर करण्यासाठी त्यांना सफरचंद, संत्री, गाजराचा रस कॉकटेल करुन पिण्यास द्या.

☐ परीक्षा काळात मेंदूला आराम मिळावा यासाठी सफरचंद, अननस, लिंबाचा रस एकत्र करुन द्यावा.

मुलांची पचनक्रिया बिघडल्यावर सफरचंद, आले व गाजराचा रस एकत्रित करुन द्यावा. मुलांना सर्दी-पडसे झाल्यास गाजर, लिंबू, सफरचंदाचा रस एकत्र करुन द्यावा.

☐ शरीरातील विषारी तत्त्व बाहेर काढण्यासाठी सफरचंद, टरबूजचा रस एकत्र द्यावा.

☐ यकृत बिघडले असल्यास अननस, टरबूज, लिंबाचा रस एकत्र करुन द्यावा.

☐ प्रत्येक प्रकारच्या फळात काही प्रमाणात फ्रुट ॲसिड असते, त्यामुळे शरीरातील विषारी द्रव्य बाहेर पडतात. ब्ल्यू बेरी फळामुळे स्मरणशक्ती वाढण्यास मदत होते. डबाबंद फळांच्या रसाऐवजी ताज्या पळांचा खाण्यात वापर करण अधिक हितावह आहे. सकाळी नाश्त्याला ताजी फळे खावीत. सुकलेल्या व ताज्या फळात कॅलरी समानच असते. परीक्षेच्या काळात मुलांना फळे व पालेभाज्या खाण्यास दिल्यास कॅलरीज कमी होतील.

☐ मुलगा जर लठ्ठ असेल, तर त्याला आइस्क्रीम घालून फळांचा रस नियमितपणे पिण्यास द्यावा. घरात नेहमी फळे ठेवावीत.

☐ फळांचा रस काढण्यापूर्वी फळे स्वच्छ पाण्याने धुवून घ्यावीत. त्यामुळे फळावरील पेस्टीसाइड निघून जाईल. फळांचा ज्यूस काढताना बिया काढून टाका.

# सावध स्त्री कधीही फसत नाही

स्त्री आणि पुरुषांच्या लिंगविषयक मानसिकतेमध्ये बराच फरक असतो. स्त्रीला प्रेम, शृंगार व निष्ठा यांच अप्रुप असते. पुरुष मात्र अशाग गोष्टींवर ठाम असेलच असे नाही. त्याला कामसुखाची तीव्र आस असते.त्यामुळेच तो प्रसंग कामप्रवृत्त होऊन बलात्कारी होतो. त्यावेळी त्याला फक्त स्त्री दिसत असते. स्त्रीला मात्र कामसुखासाठी कोणताही पुरुष चालत नाही. म्हणूनच स्त्री पतीशी एकनिष्ठ असते. सुविचारी समाज घडवायचा असेल तर लहानपणापासून मुला-मुलींना लैंगिकता विषयक शिक्षण द्यावे. त्याला संस्काराची जोड द्यावी. मुलांना स्त्रीचा आदर करण्यास शिकवावे.

मुलींना स्वत:चे संरक्षण, समाजात वावरताना असणारे संभाव्य धोके याबद्दल योग्य वयात शिक्षण द्यावे; लैंगिक शिक्षण आजच्या काळातील मुला-मुलींना आवश्यक ठरत आहे.कितीही सावधानता बाळगली तरी लैंगिक आगळीक पूर्णपणे निपटून काढणे कठीण आहे. तरीसुद्धा स्त्रिया व मुलींसाठी काही सूचना..

१) स्वसंरक्षणासाठी ज्युदो, कराटे अशी मार्शल आर्ट शिकावी.

२) तंग उत्तान कपढे घालू नयेत. रात्री एकटीने बाहेर जावू नये. अनोळख्या ठिकाणी रात्री एकटीने मुक्काम करु नये.घरात परपुरुष असल्यास एकट्या स्त्रीने राहू नये.

३) आपल्या आतल्या आवाजावर विश्वास ठेवावा. जेथे जाणे धोक्याचे वाटत असेल तेथे जाणे टाळावे. अनोळख्या व्यक्तीशी नरमाईने बोलू नये.

४) अपरिचिताची हाक आल्यास घराचा दरवाजा उघडू नये.


५) बलात्कारचा प्रयत्न करणाऱ्याच्या डोळ्यात मिरचीफूड फेकावी. मोठ्याने ओरडावे, त्याच्या नाजूक जागी जोरात लाथ मारावी व पळून जाण्याचा प्रयत्न करावा. त्याला दम द्यावा. प्रवासात सेफ्टीपीन जवळ ठेवावी गर्दीचा फायदा घेऊन पुरुष अंगलट करत असेल तर तेथे पीन लावण्याचे निमित्त करुन पिन टोचावी. ■■■

# मुले तणावग्रस्त होण्यास पालकच कारणीभूत

व्यक्ती,घटना, परिस्थिती याला शरीर आणि मनाने दिलेली प्रतिक्रिया म्हणजे स्ट्रेस अर्थात ताण. हा ताण प्रत्यक्षात किंवा कल्पनेतून निर्माण झालेलाही असू शकतो. वास्तव आणि अपेक्षा यातली दरी ताण निर्माण करते. मुलांना दोन प्रकारच्या ताणांचा सामना करावा लागतो. एक तीव्र स्वरुपाचा ताण असतो. परीक्षा वगैरेच्या काळात प्रसंगात हा ताण जाणवतो. सतत जाणवणारा ताण हा दुसरा प्रकार आहे. हा प्रकार जास्त गंभीर आहे. तीव्र स्वरुपाच्या म्हणजे ॲक्यूट ट्रेस तात्पुरत्या स्वरुपाचा असतो. फार मानसिक किंवा शारीरिक त्रास न होता मुलं या ताणाशी जुळवून घेतात; पण सततच्या ताणाचा परिणाम जास्त नुकसान करतो. घरातली भांडणं, शिक्षकांनी भर वर्गात मुलांना टार्गेट करणं, स्पर्धेशी जुळवून घेणं मुलांना जड जातं आणि मुलांच्या सहनशक्तीचा कडेलोट होतो. कॉन्स्टन्ट स्ट्रेसमध्ये राहणारी मुलं घरुन पळून जातात, स्वत:ला इजा-दुखापत करुन घेतात, त्यांना डिप्रेशन येतं. ती हिंसक किंवा खूप हळवी बनतात.

ट्रेस अर्थात ताण हा आजच्या स्पर्धात्मक जीवनशैलीचा एक अविभाज्य भाग आहे, हे आजच्या पालकांनी मान्य केलं आहे; पण या स्ट्रेसफूल अर्थात तणावग्रस्त जीवनशैलीचा वाईट परिणाम घरातल्या मुलांवर होतो याची किती जणांना कल्पना आहे ? तणावाचे बळी फक्त पालकच नाहीत. वाढत्या अपेक्षा, परीक्षेची भीती, टीव्ही,सिनेमा बघण्याचा परिणाम शाळेतली स्पर्धा या सगळ्याचा सामना करताना लहान मुलं अतिशय ताणात जगत आहेत याची किती पालकांना कल्पना आहे ? यासाठीच आपल्या घरात ताणात वाढणारं राहणारं मूल नाही ना, हे तपासा, असेल तर त्याची कारण जाणून घ्या, त्यांच्या मनावरचा ताण दूर करा. कारण मुलांवर ताणाचे अतिशय गंभीर परिणाम होतात.

ताण असलेली मुलं पालकांचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतात. त्याचं वागणं लक्षात येण्याइतपत बदलतं, शांत मुलं अचानक चिडचिडी आणि आक्रमक बनतात; तर काही मुलं बोलत नाहीत, प्रतिक्रिया देत नाहीत. याशिवाय काहीही आजार नसताना पोट, डोक दुखणं,आळस,कंटाळा, मुडी स्वभाव, खूप रडणं, चिडचिडेपणा करणं, न जेवणं किंवा जास्त खाणं, विस्कळीत झोप, भीती वाटणं, झोपेत गादी ओली करणं अशी अनेक लक्षणं दिसतात.



या सगळ्या लक्षणांचा परिणाम म्हणजे शारीरिक, मानसिक भावनिक विकास खुंटतो. मुलांची प्रतिकार शक्ती कमी होते. आणि ते सतत आजारी पडतात. त्यांची शैक्षणिक प्रगती मंदावते, ते सारखे नापास होतात. स्वत:बद्दल आणि इतरांबद्दलची त्याची वागणूक हिंस्त्र बनते.

**मुलांवरचा ताण कसा कमी करावा :** प्रेम जिव्हाळा, मुलांची काळजी, त्यांच्याशी बोलणं, मनमोकळा संवाद साधणं हेच मुलांवरील ताण कमी करण्याचं सूत्र आहे. मुलांशी बोला, तणावग्रस्त परिस्थितीपासून त्यांना दूर ठेवा. ताणाशी सामना देण्यासाठी, जुळवून घेण्यासाठी त्यांना मदत करा. अशावेळी मुलांच्या जास्तीत जास्त सहवासात राहण्याचा प्रयत्न करावा. घरात आनंदाचं वातावरण असलं तर आपोआपच मुलांवरचा ताण कमी होऊ लागतो. एखादा छंद,खेळ,कौशल्य शिकण्यासाठी मुलांना प्रोत्साहन द्यावं, त्यांना जवळ घ्यावं, आपण सुरक्षित आहोत असा विश्वास मुलांना कायम द्यावा. स्पर्धा,पैसा,अनिश्चितता या चक्रात आज सगळेच अडकले आहेत; पण सगळ्याचा परिणाम घरा-दारावर, मुलांवर होऊ देणं यासारखं दुर्दैव दुसरं ते कोणतं ? घराचा ट्रेस ताणाला घरापासून लांब ठेवा.

मनावरचं ओझ कमी करण्यासाठी अनेक उपाय केले जातात. पण मनावरती ओझे येऊ नये यासाठीच उपाय केलाच तर बाकीचे काही करण्याची आवश्यकता भासणार नाही. मनामध्ये येणारे विचार कोणत्या प्रकारचे आहेत हे तपासण्याची आणि त्यावर औषध शोधण्याची परिस्थितीच निर्माण होणार नाही. आपल्या मुलांवरती योग्य संस्कार घडविले, योग्य शिक्षण दिले त्याचबरोबर नितीमत्तेच्या चौकटीत राहून वावरण्याची मुभा दिली. जगाच्या वाईट रिती समजावून सांगितल्या व संस्कार कशाला म्हणतात व त्याची वाढ होण्यासाठी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या मुलांमध्ये या गुणांची वाढ झाल्यास आपणाला नको ते व्याप आणि नको तो ताप अस म्हणत राहण्याची वेळ उद्भवणार नाही. संस्काराने मुले शहाणे होतात आणि आईवडिलांच्या संस्कारामुळे मुलांमध्ये शहापण येते. या शहाणपणामुळे ती कुठेही इतस्ता भटकत नाही. किंवा वाया देखील जात नाही म्हणून प्रत्येक पालकाने आपल्या पाल्यावर दडपण टाकून कोणतेही संस्कार घडविण्याचा प्रकार करु नये. सहजगत्या होणारे संस्कार मनावरचा ताण दूर करतात.

# स्त्री पुरूषांना लागलं प्रेम नाही तर 'नॅनोशिपचं' वेड, काही तासांसाठी रंगतो हा खेळ, पायाखालची जमिनच सरकेल असं सत्य

आताचा जमाना ट्रेंड्सवर चालणारा आहे, हल्लीच्या लोकांना प्रेमापेक्षा ट्रेंडसोबत चालणं आणि आम्ही किती अपडेटेड आहोत हे दाखवणं जास्त सोईचं वाटतं. असाच एक ट्रेंड सध्या सर्वत्र धुमाकूळ घालत आहे तो म्हणजे नॅनोशिप. नक्की काय आहे हा ट्रेंड? आणि याचे प्रेमात होणारे फायदे व नुकसान काय? ऐकल्यानंतर अक्षरश: भारावून जाल.

आजकालच्या डिजिटल युगात डेटिंगच्या पद्धती सतत बदलत आहेत. सोशल मीडियाचा वाढता प्रभाव आणि ऑनलाईन डेटिंग ॲप्सच्या वापरामुळे लोकांच्या डेटिंगच्या सवयींमध्ये क्रांतिकारक बदल झाला आहे. या डिजिटल क्रांतीमध्ये नवीन डेटिंग ट्रेंड्स उदयास येत आहेत, आणि सध्या नॅनोशिप डेटिंग हा असा एक ट्रेंड आहे जो तरुणांमध्ये प्रचंड लोकप्रिय होत आहे. परंतु, या ट्रेंडबद्दल चर्चा करणे गरजेचे आहे कारण त्याचे दीर्घकालीन परिणाम कुटुंब व्यवस्थेवर, नातेसंबंधांवर, आणि समाजावर होऊ शकतात.

यामध्ये नातेसंबंध खूपच अल्पकालीन असतात, जे केवळ काही दिवस किंवा आठवड्यांपुरते टिकतात. या प्रकारातील लोक नात्याची जबाबदारी टाळतात आणि केवळ तात्पुरता भावनिक किंवा शारीरिक आराम शोधतात. तात्पुरते समाधान देणारा हा ट्रेंड सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर चर्चेत आहे. या लेखामध्ये आपण नॅनोशिप डेटिंग ट्रेंड का लोकप्रिय होत आहे, त्याचे फायदे-तोटे, आणि भविष्यासाठी त्याचा काय परिणाम होऊ शकतो हे पाहुया.

**नॅनोशिप डेटिंग ट्रेंड काय आहे?**

नॅनोशिप डेटिंग ट्रेंड म्हणजे अत्यंत अल्पकालीन रिलेशनशिप होय. हे नाते केवळ काही आठवडे किंवा दिवस टिकते आणि त्यानंतर दोन्ही व्यक्ती आपापल्या मार्गाने निघून जातात. हे नाते बहुतेक वेळा शारीरिक आकर्षण किंवा तात्पुरत्या भावनिक आधारावर आधारित असते.या नात्यांमध्ये दीर्घकालीन बांधिलकी नसते, त्यामुळे दोन्ही व्यक्ती फक्त एकमेकांसोबत क्षणिक समाधान मिळवतात.डेटिंग ॲप्स, सोशल मीडिया, आणि ओपन कम्युनिकेशनमुळे हा ट्रेंड वाढत आहे.

**नॅनोशिप डेटिंग ट्रेंड इतका लोकप्रिय का झाला आहे?**

नॅनोशिप डेटिंग ट्रेंडच्या लोकप्रियतेमागे अनेक कारणे आहेत. ह्या आधुनिक काळात लोक फार बिझी



असल्यामुळे नात्यांमध्ये गुंतणे कठीण झाले आहे. त्यामुळे तात्पुरते नाते हे सोयीस्कर वाटते. लोकांना क्षणिक समाधान हवे असते आणि नॅनोशिप त्यासाठी एक पर्याय देतो. Tinder, Bumble यांसारख्या ॲप्समुळे तात्पुरत्या नात्यांचे स्वरूप सुलभ झाले आहे. लोक नात्यात गुंतून जबाबदारी घेण्यास घाबरतात. अनेक लोक सोशल मीडियावर नातेसंबंधांचे प्रदर्शन करतात, ज्यामुळे रिलेशनशिपकडे लोक आकर्षित होतात.

**नॅनोशिप डेटिंगचे फायदे**

नॅनोशिप डेटिंग काही बाबतीत फायदेशीर ठरू शकते, विशेषत: त्या लोकांसाठी ज्यांना दीर्घकालीन नात्यांची गरज नसते. यामुळे कोणत्याही प्रकारच्या जबाबदारीशिवाय तात्पुरत्या आनंदाचा शोध घेता येतो. व्यक्तीला स्वत:च्या इच्छेनुसार नाते निवडता येते. लोक वेगवेगळ्या व्यक्तींना भेटून आपले प्राधान्य शोधू शकतात.

**नॅनोशिप डेटिंगचे तोटे**

तुमच्या भावनिक आरोग्यासाठी आणि समाजासाठी नॅनोशिप डेटिंग हानिकारक ठरू शकते. असे नाते तोडल्यामुळे मानसिक त्रास किंवा एकाकीपणाची भावना निर्माण होऊ शकते. लोकांवर विश्वास ठेवणे कठीण बनते, ज्यामुळे भविष्यात दीर्घकालीन नाते टिकवणे कठीण होते. कुटुंब व्यवस्था आणि समाजावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो. प्रेम आणि नातेसंबंध यांचे मूल्य कमी होण्याची शक्यता निर्माण होते. तात्पुरत्या नात्यांमध्ये गुंतल्याने लोकांमध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित समस्या वाढू शकतात.

**नॅनोशिप डेटिंगचा भविष्यातील परिणाम कसा असेल?**

नॅनोशिप डेटिंग ट्रेंड दीर्घकाळ टिकल्यास समाजाच्या संरचनेवर मोठे परिणाम होऊ शकतात. लोक दीर्घकालीन नात्यांमध्ये गुंतण्यास तयार नसल्यामुळे विवाहसंस्थेचे महत्त्व कमी होऊ शकते. लोक अधिकाधिक एकटे पडू शकतात आणि नैराश्य किंवा चिंता यांसारख्या समस्या वाढू शकतात. नात्यांबाबत गंभीरता नसल्यामुळे कुटुंबसंस्था कमकुवत होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. नॅनोशिप डेटिंग ट्रेंड तात्पुरते समाधान देणारा असला तरी, दीर्घकालीन परिणाम विचारात घेतल्यास तो हानिकारक ठरू शकतो. लोकांनी नात्यांबाबत जबाबदार राहून त्यातील महत्त्व समजून घेतले पाहिजे. क्षणिक समाधानापेक्षा नातेसंबंधांमध्ये दीर्घकालीन मूल्य निर्माण करण्यावर भर दिल्यास अधिक चांगले परिणाम दिसून येतील.

# झोप १ तास कमी झाल्यास हृदयविकाराचा धोका २४ टक्के जास्त

कमी झोप होणे ही वर्तमानातील गंभीर समस्या झाली आहे. त्याचा थेट संबंध उच्च रक्तदाब, हृदयविकार किंवा स्ट्रोकसारख्या आजाराशी आहे. ज्यांची झोप पुरेशी नसते त्यांना चिंता आणि नैराश्याच्या तक्रारी जास्त असतात. एक तास कमी झोपेचाही आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतो. इल्सइवर जर्नलमधील लेखानुसार, पुरेशी झोप न घेणाऱ्या व्यक्ती आत्महत्या करण्यासारखे विचार करतात. अशा लोकांमध्येच आत्महत्येचे प्रमाणही अधिक आढळले.

**मेंदू : कमी झोप झाल्यास अल्झायमर**

सेंटर फॉर ह्युमन स्लीप सायन्सनुसार, रोज ६ तासांपेक्षा कमी झोप घेणाऱ्या आणि निद्रानाशाने पीडित असलेल्या लोकांमध्ये मेंदूशी संबंधित अल्झायमर आजार होण्याचा धोका जास्त असतो.

**वय : केवळ ४ तास झोपल्यास वृद्धत्व**

जामा जर्नलमध्ये प्रकाशित अभ्यासानुसार, निरोगी व्यक्तीने केवळ चार रात्री ४ तास झोप घेतली तर त्याचा



टेस्टोस्टेरोन त्यापेक्षा १० वर्षांनी मोठ्या व्यक्ती एवढा होतो, म्हणजेच हार्मोन्सच्या आधारे त्याचे वय १० वर्षे वाढते. म्हणजे कमी झोपेने वृद्धत्व वाढते.

**हृदय : झोप कमी, हृदयास धोका**

व्यक्तीने गरजेपेक्षा एक तास कमी झोप घेतली तर दुसऱ्या दिवशी हृदयविकाराचा धोका २४ टक्के वाढतो. ओपेन हार्ट जर्नलनुसार, या अभ्यासासाठी हृदयविकारामुळे रुग्णालयात दाखल झालेल्या ४२,००० पेक्षा जास्त लोकांचा अभ्यास करण्यात आला.

**इम्युनिटी :** फ्लूचा धोका तिप्पट वाढतो नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनद्वारे प्रकाशित शोधानुसार, रोज सात तासांपेक्षा कमी झोप घेणाऱ्यांमध्ये सर्दी, पडसे होण्याची शक्यता तिप्पट जास्त असते. कोविड रुग्णांच्या बाबतीत झोप कशी धोकादायक असू शकते, यावर संशोधन सुरू आहे.

**अँटिबॉडी :** ५० टक्के कमी बनतात स्लीप हेल्थ जर्नलमध्ये प्रकाशित संशोधनानुसार, लस घेण्याआधीच्या आठवड्यापर्यंत व्यक्तीने पुरेशी झोप घेतली नाही तर लसीकरणानंतर शरीरात केवळ ५० टक्के अँटिबॉडी तयार होतात. कोविड लसीवरील झोपेच्या परिणामाबाबत संशोधन सुरू आहे.

# घरासाठी योग्य लाकडाची निवड

घराच्या बांधकामात विविध जातीच्या लाकडाचा वापर करण्यात येतो. परंतु, ही लाकडेही आपल्या जीवनात मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण करत असतात. काही वास्तुशास्त्राच्या ग्रंथांत बाभळीचे लाकूड अशुभ मानले जाते. मात्र, बाभळीचे लाकूड अधिक टणक असल्याने त्याला ग्राह्य मानले आहे. तसेच काटे व ज्या झाडातून दुधासारखा द्रव पदार्थ निघतो अशा झाडाचे लाकूड वापरले जात नाही.



वड, पिंपळ आदी झाडाच्या लाकडाचा घर बांधणीत वापर केला जात नाही. मुख्य प्रवेशद्वार हे एकाच जातीच्या लाकडापासून तयार केले पाहिजे. हाच नियम घरात लावण्यात येणाऱ्या खिडक्या व इतर दरवाजांनाही लागू पडतो. ज्या नक्षत्रात आपला जन्म झाला आहे त्याच्याशी संबंधित वृक्ष आपल्याला शुभ वृक्ष आहे. तोच कल्पवृक्ष बनून आपल्याला सुखशांती प्रदान करत असते. वास्तुशास्त्रानुसार घराच्या पश्चिम दिशेला पिंपळाचे झाड असणे शुभ मानले जाते. बेल, नारळ, आवळा, तुलशी व चमेली आदी झाडे सर्व दिशाना शुभ आहेत काही झाडे विशिष्ट दिशाना लावली पाहिजेत. -

१. जांभूळ - दक्षिण-पूर्व-उत्तर.
२. केळी- तुळशीसोबत सर्व दिशाना.
३. वड- केवळ पूर्व दिशेला.
४. कडूलिंब- वायव्य-आग्नेय.
५ . डाळींब- आग्नेय-नैऋत्य दिशेला.

# दु:ख दूर लोटा, सुखाचा आनंद लुटा

कसं काय मित्रा, सारे ठीक आहे ना ? नाही रे मित्रा, तसं सारं ठिकच आहे पण काही खास नाही. 'का रे ? काय झालं ? काही नाही, रे घरात थोडा प्रॉब्लेम आहे. बहुतेकदा असाच सावा होतो. आणि याच छोट्या-छोट्या प्रॉब्लेमची कधी भली मोठी यादी होते कळतच नाही. असा दु:खाचा पाढा वाचताना कोठेतरी सुखाचा उल्लेख करायला हवा हेच माणूस विसरुन जातो. जीवनात आपण दु:खांना एवढे महत्व दिले आहे की आपण छोटे छोटे सुखाचे क्षणही स्वत: सामावू इच्छित नसतो. खरं तर आपल्याला माहीत असते की ही छोटी सुखे आपल्या मनात मनाला आनंद देऊ शकतात.




आपण सतत दु:खांचे डोंगर फोडण्याचाच प्रयत्न करीत राहतो. त्यात आनंदाचे आपल्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारे क्षण कधी लुप्त होतात तेही समजत नाही. तेल अवीव विद्यापीठाच्या बराक म्हणतात की माणसाच्या सुखाचे जेनेटिक संपादन करता येऊ शकते. बराक यांच्या मतानुसार माणसाचे सुख दोन कारकांवर अवलंबून असते.

एक त्याच्या भोवतालचे भावनिक वातावरण व दुसरे त्याच्या शरीरात असणारी सुख देणारी जीनची रचना. जेव्हा आर्थिक तंगी, तणाव वा असाध्य आजार असतो तेव्हा माणसाला सुख जाणवत नाही; पण जरी माणसाच्या शरीरात सुख देणाऱ्या जीनचा रचनेत गडबड असेल तरी माणसाला सुख जाणवत नाही. खरेतर माणसाचे ५० टक्के सुख या जीनवर आधारित असते. माणसा-च्या सुखाशी जीनचा किती संबंध असतो हे जरी सांगता येत नसले तरी माणूस-दु:खाची यादी बनवण्यातच जास्त गुंतलेला असतो हे मात्र नक्की. त्यामुळे जे दोन क्षणांचे सुख मिळणार असते तेही दु:खाच्या डोंगराआड झाकून जाते. यासाठी आपण दु:ख दुर्लक्षून, दूर लोटून छोटी छोटी सुखे गोळा करायला हवीत. समजा घरात एकाच वेळी छोट्या बाळाचे आगमन व वृद्ध वडीलधाऱ्याचे निधन झाले. आपल्याला आपले जवळचे माणूस गेल्याचे दु:ख असते. पण त्या दु:खाच्या शोकात आपण घरी आलेल्या बाळाचे स्वागतही करीत नाही. उलट त्याच वर्षी नव्हे तर त्या बाळाचा प्रत्येक वाढदिवस आनंदाने साजरा करण्याऐवजी वृद्ध गेल्याचे दु:ख उगाळीत बसतो. एखाद्याचा मृत्यू एखाद्या सणादिवशी झाला तर तो सण साजरा करणे कायमचे सोडून देतो. म्हणजेच कैक वर्षापूर्वीच घडलेल्या घटनेच्या दु:खात आजच्या सुखाचाही बळी देत असतो आपण जीवनात सुख भोगायला आलो आहे. दु:ख उगाळायला नव्हे. सुख पाहता जवा एवढे दु:ख पर्वताएवढे असे म्हणतात. पण आपणच दु:खाला जास्त महत्व देऊन डोंगराएवढे केले आहे. आता दु:ख दूर लोटा आणि सुखाचा यथेच्छ आनंद लुटा.

# डोकेदुखी सतावतेय? मग वापरा 'हे' ३ प्रभावी तेल

आजकाल डोकेदुखी हा एक सामान्य आजार झाला आहे. तणाव, थकवा, सतत मोबाईल किंवा लॅपटॉपच्या स्क्रीनवर पाहून काम केल्याने डोकेदुखीची समस्या बळावते. त्यामागे आणखीही बरीच कारणं असू शकतात. डोकेदुखीपासून सुटका मिळवण्यासाठी अनेकदा वेदनाशामक औषधांची मदत घेतली जाते. मात्र ही औषधं वारंवार घेत असा तर त्याचे आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. या गोष्टी टाळण्यासाठी तुम्ही ३ औषधी तेलांची मदत घेऊन डोकेदुखीपासून आराम मिळवू शकता. औषधी झाडांची पानं, देठ, फुलं, साल, खोड, मुळांपासून तयार होणारे हे तीन तेलांचे प्रकार तणाव कमी करण्यासह दुष्परिणामांशिवाय डोकेदुखी आणि मायग्रेनचा त्रास कमी करण्यास मदत करतात.




या तेलांच्या वापराने डोकेदुखीपासून होईल सुटका

**१) पेपरमिंट तेल** : डोकेदुखी आणि मायग्रेनमुळे होणाऱ्या वेदना कमी करण्यासाठी पेपरमिंट तेल सर्वाधिक प्रभावी मानलं जातं. डोकुदुखी होत असल्यास पेपरमिंट तेलाचे दोन ते तीन थेंब कपाळावर लावून हकल्या हाताने मसाज करा, याने तुम्हाला काही वेळातचं आराम पडेल. कारण पेपरमिंट तेलातील मेन्थॉल हा घटक स्नायूंना आराम देऊन वेदना कमी करण्यास मदत करतो. NCBI च्या रिपोर्टनुसार, पेपरमिंट तेलाचा वापर डोकेदुखी, स्नायूदुखी, खाज सुटणे आणि अपचन यांसारख्या समस्यांवरही एक रामबाण उपाय आहे.

**२) लॅव्हेंडर तेल** : लॅव्हेंडर तेलाच्या वापरामुळे नैराश्य, तणाव आणि चिंता यांसारख्या समस्यांवर नियंत्रण मिळवता येते. लॅव्हेंडर तेलामध्ये अनेक गुणधर्म आहेत जे स्नायूंचा ताण कमी करतात. त्यामुळे लॅव्हेंडर तेलाच्या वापराने तुम्हाला मायग्रेन आण डोकेदुखीच्या समस्यांपासून सुटका मिळवता येते. नारळ किंवा मोहरीच्या तेलात लॅव्हेंडर तेलाचे काही थेंब घाला आणि कपाळावर मालिश करा, दिवसातून दोनदा तरी असे केल्यास काही तासातचं फरक जाणवू लागेल.

**३) कॅमोमाइल तेल** : कॅमोमाइल तेल शरीरास आराम देत स्नायूंना शांत करण्यास मदत करते. अधिक तणावामुळे होणारी डोकेदुखी, चिंता आणि निद्रानाश यावरही हे तेल फायदेशीर आहे. गर्भवती महिलांनी कॅमोमाइल तेलाचा वापर करु नये, यामुळे गर्भपाताचा धोका उद्‌भवतो.



# सांसारिक आयुष्य आनंदी आणि निकोप हवं?

रिलेशनशीपमध्ये भावभावनांसोबतच फिजिकल रिलेशन्स चांगले असणं खूप गरजेचं असतं. रिलेशनशीपमध्ये आल्यानंतर प्रत्येक व्यक्ती आपलं नातं अधिक चांगलं कसं होईल याचा विचार करत असतो. या सगळ्यात व्यक्तीच्या सेक्स लाईफची महत्वाची भूमिका असते. अनेकदा काही गैरसमजांमुळे जोडप्यांना आपल्या सेक्स लाईफचा हवा तसा आनंद घेता येत नाही. नेहमी निराश वाटतं म्हणूनच आज आम्ही तुम्हाला सेक्स लाईफ चांगली राहण्यासाठी काही टिप्स सांगणार आहोत.

१) तुमचा विश्वास बसणार नाही पण अनेक जोडप्यांना सेक्सबाबत उत्कट भावना येत नाही. परमोच्च आनंद मिळेपर्यंत जोडप्यांमध्ये शरीर संबंध होत नाही, अशीही अनेकांची तक्रार असते. इंग्रजीत यालाच क्लाइमेक्स असं म्हणतात. अनेकदा अशी स्थिती कपल्समध्ये उद्भवते. म्हणून जास्त चिंतेत राहण्याचं काहीही कारण नाही. अनेकदा महिला एकापेक्षा जास्तवेळा ऑर्गज़्मचा अनुभव घेतात.

२) खूपदा सेक्स संबंधित पुस्तक, पॉर्न व्हिडीओजमध्ये जाहिराती दाखवल्या जातात. ज्यात पुरूषांच्या प्रायव्हेट पाईट्सच्या कमी लांबीची समस्या दाखवली जाते. या प्रकारच्या जाहिराती तरूणांना भ्रमात टाकू शकतात. त्यामुळे गरज आणि माहिती नसताना पुरूष कोणताही उपाय करायला जातात. यामुळे आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. अनेकदा पुरूषांच्या प्राव्हेट पार्टचा आकार लहान असतानाही ते पार्टनरला ऑर्गज्म देण्यात यशस्वी राहतात.

३) शरीर संबंधादरम्यान कल्पना केल्यानं तुमचा पार्टनरसोबतचा वेळ आणखी चांगला जाऊ शकतो. डोक्यात सुरू असलेल्या इंटिमेट कल्पनांमुळे आनंद वाढवता येऊ शकतो. पार्टनरसोबत असा वेळ घालवत असताना स्वतःला शांत ठेवा आणि या क्षणांचा आनंद घ्या.

४) काळानुसार नातं अधिक घट्ट होत जातं तर कधी कधी दुरावाही येतो. आपल्याला याची चिंता करण्याची गरज नाही. रिलेशन नेहमी चांगले राहण्यासाठी शेअरिंग फार महत्वाचं आहे. तुम्ही पार्टनरशी आपल्या बेडवरील आवडी निवडींबाबत चर्चा करा, तिला किंवा त्याला काय हवंय हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा. एकमेकांना स्पेशल फिल करून द्या.

५) साधारणत: नात्यात बराच वेळ घालवूनही स्त्रिया लैंगिक संबंधासाठी पुढाकार घेत नाहीत. याऊलट एका रिसर्चनुसार महिलांनी शरीर संबंधांसाठी पुढाकार घ्यावा अशी पुरूषांची इच्छा असते. त्यातल्या त्यात मुलं झाली असतील तर इंटिमेट होण्यासाठी वेळ काढणं खूप कठीण होतं. अशावेळी त्या रिलॅक्स होऊन स्वतःकडे लक्ष देऊ शकत नाहीत. अशा स्थितीत दोघांनीही वेळ मिळेल तेव्हा आपल्या रोमॅन्टिक लाईफवर लक्ष द्यायला हवं.

**असा प्रयत्न करून पाहा**

शेड्यूल करा तयार- जर तुम्ही लॉन्ग डिस्टन्स रिलेशनशिपमध्ये आहात तर तुम्हाला शेड्यूल सेक्सची टर्म नक्कीच माहीत असायला हवी. यात दोघांनी मिळून शारीरिक संबंधासाठी एक अशी वेळ ठरवावी लागते जेव्हा दोघेही पूर्णपणे मोकळे असाल. म्हणजे काय तर सगळंकाही ठरवून केलं जातं.

कॅलेंडरवर मार्क करा- जर तुम्ही दोघेही शारीरिक संबंधासाठी दिवस आणि वेळ ठरवत असाल तर ती लेखी ठेवा. हवं तर दिवस आणि वेळ कॅलेंडरवर लिहून ठेवा म्हणजे लक्षात राहील. इतकंच काय तर मोबाइलमध्ये अलार्महीं लावू शकता.

तयारीसाठी वेळ मिळेल- जेव्हा तुम्ही शारीरिक संबंधाचं प्लॅनिंग करता तेव्हा त्या क्षणांसाठी स्वत:ला तयार करण्यासाठी तुम्हाला भरपूर वेळ मिळतो. तुम्हाला तुमच्या लैंगिक जीवनात नवा रोमांच हवा असेल तर शेड्यूल सेक्स चांगला पर्याय ठरू शकतो. याने शारीरिक संबंधाची उत्सुकताही कायम राहील.

एकत्र चांगला वेळ घालवा- टेक्नॉलॉजीच्या या जगात सगळंच व्हर्चुअल झालं आहे. प्रेमाचे दोन शब्द बोलण्यासाठीही लोकांकडे वेळ नाही. अशात जर तुम्ही आधीच शारीरिक संबंधाचं प्लॅनिंग कराल तर दिवसातला एक ठराविक वेळ तुम्ही सोबत असाल. बिझी लाइफमधून सोबत घालवलेला हा वेळ तुमचं नातं अधिक मजबूत करेल.

# गाजराचा हलवा खाल्ल्याने होतात खास आरोग्य लाभ

हिवाळ्यात गाजराचा हलवा आरोग्यासाठी चांगला पदार्थ आहे. हा हलवा दूध, सुकामेवा आणि बऱ्याच पौष्टिक वस्तू मिसळून तयार केला जातो. हा खाल्ल्यामुळे शरीराला खूप फायदे होतात.

**आयर्नचे भरपूर प्रमाण**

गाजरात कॅरिटोनॉइड, पोटॅशियम, व्हिटॅमिनसारखी पोषक तत्त्वे भरपूर प्रमाणात असतात. यात व्हिटॅमिन ए चे प्रमाणही मोठ्या प्रमाणात असते. गाजर रक्तशुद्धीकरणाचे काम करते. यात आयर्नची मात्रा जास्त असते. शिवाय फायबर्स असल्यामुळे पचनक्रिया चांगली राहते.

**वजन कमी करण्यास मदत करते**

गाजराचा हलवा बनवण्यासाठी तुपाचा उपयोग होतो. तूप आणि गाजरामध्ये असणारी पोषक तत्त्वे वजन कमी करण्यास मदत करतात. यामुळे कोलेस्टेरॉल कमी होते आणि हृदयाच्या आजारापासून वाचवण्यास परिणामकारक आहे. यामुळे प्रतिकारशक्ती वाढते आणि आजारापासून वाचण्यासाठी फायदेशीर आहे. याला पुरेसे खाणेदेखील आवश्यक आहे.

**हाडांसाठी फायदेशीर**

गाजराच्या हलव्यात दूध आणि सुकामेवा घालतात. या पदार्थांमध्ये असणाऱ्या प्रथिनांमुळे स्नायू आणि हाडे मजबूत होतात. यामुळे अशक्तपणा दूर होतो. इन्सुलिनची पातळी नियंत्रित करण्यासाठी तसेच रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठी गाजर खाणे फायदेशीर आहे. एनर्जीचे प्रमाण संतुलित ठेवण्यासाठीही परिणामकारक आहे.

## छान छान गोष्टी...

# हावरटपणाचे फळ

एक कुत्रा होता. त्याचे नाव होते मोती. मोठा इमानदार कुत्रा होता तो. घराची तो राखण करीत असे. कोणी अनोळखी माणूस दिसला तर भुंकून सर्वांना सावध करीत असे. त्याच्या अंगी सारे चांगले गुण होते. पण तो मोठा हावरट होता. सारे काही आपल्यालाच मिळायला पाहिजे असे त्याला वाटत असे.

एक दिवस काय झाले, मोती रात्रभर घराची राखण करुन आराम करत होता. अचानक त्याला दूरवर काहीतरी पांढरे-पांढरे दिसले. तो धावत धावत तिकडे गेला. पाहतो तो एक हाडूक तेथे पडले होते. कुत्र्यांना



हाडके खूप आवडतात. हे तर तुम्हाला माहित आहेच. तोंडात हाडूक घेऊन मोती इकडे-तिकडे फिरु लागला. कोठेतरी शांत जागी त्याला बसायचे होते. तेथे जवळच एक ओढा वाहत होता. मोतीने विचार केला की, चला त्या ओढ्याच्या पलीकडच्या बाजूला जावे. तो ओढ्यावरच्या छोट्या पुलावरुन पलीकडे जाऊ लागला, ओढ्याचे पाणी अगदी स्वच्छ नितळ होते. पाण्यात बघताना मोतीला आपलेच प्रतिबिंब दिसले.

त्याला वाटले तो दुसरा कुत्रा आहे. त्याच्याही तोंडात हाडकाचा तुकडा होता. मोतीला वाटले, समोरच्या कुत्र्याला घाबरुन त्याच्याकडे असलेला हाडाचा तुकडा आपण मिळवावा. म्हणजे आपल्याकडे दोन हाडके होतील.

पाण्यातील प्रतिबिंबाकडे पाहत मोती मोठ्याने भुंकू लागला. त्याबरोबर त्याच्या तोंडातील हाड पाण्यात पडले. आणखी मिळवताना होते तेही गेले. म्हणून हावरटपणा करु नये. आहे तेही जाऊन नुकसान होते.

# मुलांमध्ये स्क्रीन एक्स्पोजर वाढत आहे, हा धोका कमी करा

रिसर्च गेटच्या एका संशोधनानुसार, वयाच्या आठ वर्षांपर्यंतची मुले पाच तास मोबाइलवर असतात. हा वाढलेला स्क्रीन टाइम अनेक गंभीर आजारांचे कारण होऊ शकतो.

गॅजेटचा प्रकाश किती धोकादायक आहे? स्क्रीन एक्सपोजरशी संबंधित ६ मोठे धोके

**रेटिनाला धोका:** वेगवेगळ्या संशोधनांत असे आढळले की, जास्त वेळ स्मार्टफोन वापरल्याने त्याच्या निळ्या प्रकाशाने रेटिनाचे नुकसान होऊन दृष्टीवर परिणाम होतो.

**कॅन्सर :** रात्री निळ्या प्रकाशाचे एक्सपोजर आणि झोपमोड होण्याचा संबंध सापडला आहे. यामुळे स्तन आणि प्रोस्टेट कॅन्सरचा धोका वाढला आहे.

**लठ्ठपणा :** निळा प्रकाश मेलाटोनिन, झोप, भूक नियंत्रित करणाऱ्या हार्मोनवर परिणाम करतो. त्यामुळे लठ्ठपणा वाढण्याचा धोका आहे.

**औदासीन्य :** निळ्या प्रकाशाने ज्यांच्या मेलाटोनिनवर परिणाम झाला आहे, शरीरचक्र बिघडले आहे त्यांच्यात जास्त औदासीन्य येते.

**न्यूरोटॉक्सिन :** दीर्घकाळ झोपवर परिणाम झाल्यामुळे शरीरात न्यूरोटॉक्सिनची निर्मिती होऊ लागते. त्यामुळे चांगल्या झोपेची शक्यता आणखी कमी होऊ लागते.

**स्मरणशक्ती :** झोपेवर परिणाम झाल्यामुळे सहजपणे लक्ष विचलित होते. स्मरणशक्तीवर परिणाम होतो.

**डोळ्यांशी निगडित ३ वाईट सवयी**

**स्क्रीन खूप जवळ असणे** : इलेक्ट्रॉनिक गॅजेट खूप जवळून पाहिल्यामुळे निळा प्रकाश डोळ्यांच्या मॅक्युलरचे नुकसान करतो. पापण्या मिटणे कमी होते. डोळ्यांत कोरडेपणा, वेदना आणि थकवा वाढतो.

- न्यूयॉर्कच्या सनी कॉलेज ऑफ ऑप्टोमेट्रीनुसार गॅजेट ४० सेमी दूर ठेवून त्याचा फॉंट मोठा ठेवा.

**तणाव डोळ्यांसाठी धोकादायक**

स्ट्रेस हार्मोन कॉर्टिसोल रेटिनाच्या कार्यप्रणालीवर परिणाम करतो. सेंटर सीरियस कोरियो रेटिनापॅथीचा धोका वाढतो. अस्पष्ट दिसते.

- ब्रिटनमध्ये झालेल्या संशोधनानुसार, एक तासाच्या म्युझिक कॉर्टिसोलमुळे हार्मोनमध्ये २५ टक्के घट

**हिरव्या भाज्या कमी खाणे**

हिरव्या भाज्यांमध्ये लुटीनसारखे न्यूट्रियंट्स असतात. त्या मॅक्युलर डिजनरेशनपासून वाचवतात.

- एका संशोधनानुसार, एक कप पालक रोज खाल्ल्याने ग्लुकोमाचा धोका ३० टक्के कमी होतो.

# भारतीयांचं स्वप्न पूर्ण करणारा अर्थसंकल्प

## भारतीयांचं स्वप्न पूर्ण करणारा अर्थसंकल्प, पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून अर्थसंकल्पाचं कौतुक

जनप्रवास । प्रतिनिधी

नवी दिल्ली : अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी १ फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पात विविध क्षेत्रांसाठी महत्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. आता १२ लाखांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करण्यात आलं आहे. या बरोबरच लघू उद्योग, शेती, उत्पादन, रोजगारासह ३६ औषधांवरील करात सूट देण्याची घोषणा करण्यात आली आहे. आता ३६ औषधांवरील शुल्क कर पूर्णपणे रद्द करण्यात येणार आहे, तसेच सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये कॅन्सर डे केअर सेंटर सुरू करण्यात येणार असल्याची मोठी घोषणा देखील अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी केली.



अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केलं आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा प्रत्येक भारतीयांची स्वप्ने पूर्ण करणारा अर्थसंकल्प असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. भारताच्या विकासाच्या प्रवासातील आजचा दिवस महत्त्वाचा टप्पा आहे. भारताच्या विकासासाठी आजचा अर्थसंकल्प गुंतवणूक आणि बचत वाढवणारा आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटलं आहे. अर्थसंकल्पात सरकारची तिजोरी कशी भरली जाईल यावरच लक्ष केंद्रित केलं जातं. मात्र, हा अर्थसंकल्प त्याच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. देशातील नागरिकांचे खिसे कसे भरले जातील, देशातील नागरिकांची बचत कशी वाढेल आणि देशातील नागरिक विकासाचे भागीदार कसे होतील, याचं उदाहरण म्हणजे हा आजचा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पात अत्यंत महत्त्वाची आणि ठोस पावले उचलण्यात आली आहेत. या अर्थसंकल्पात एक नाही तर अनेक महत्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं. आज संसदेत सादर झालेला अर्थसंकल्प हा १४० कोटी भारतीयांची स्वप्ने पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प आहे. विकसित भारताचे ध्येय सामान्य नागरिकच पुढे नेण्याचं काम करतील. या अर्थसंकल्पामुळे सर्वसामान्यांची बचत नक्कीच वाढणार आहे. या अर्थसंकल्पामुळे देशातील विकास झपाट्याने वाढेल. ज्यामुळे विकसित भारताच्या ध्येयाला अधिक चालना मिळेल. आत्मनिर्भर भारत मोहिमेला चालना मिळण्यासाठी नक्कीच फायदा होईल, असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. जनतेची स्वप्ने पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प आहे. तरुणांची स्वप्ने पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प देशाची शक्ती वाढवणारा आहे. या अर्थसंकल्पामुळे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक वाढेल. तसेच अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी करण्यात आलेल्या घोषणा कृषी क्षेत्रात आणि संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेत नव्या क्रांतीचा आधार ठरतील. या अर्थसंकल्पातून शेतकऱ्यांना आणखी मदत मिळेल, असंही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटलं आहे.

## कायदा व सुव्यवस्थेत अग्रेसर व सुरक्षित महाराष्ट्र निर्माण करुया : उपमुख्यमंत्री अजित पवार



जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : राज्यात कायदा व सुव्यवस्था सुस्थितीत राहण्याकरीता पोलीस दलाला सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन सुसज्ज करणे ही राज्य शासनाची प्राथमिकता आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. सर्वांच्या प्रयत्नातून आगामी काळात कायदा व सुव्यवस्थेत अग्रेसर व सुरक्षित महाराष्ट्र निर्माण करुया, असा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.

पोलीस उपमुख्यालय बऱ्हाणपूर येथे पोलीस विभागाकरीता ४ स्कॉर्पिओ वाहनांचे लोकार्पण तसेच तालुक्यातील नागरिकांना त्यांचा चोरी गेलेला मुद्देमाल वितरण समारंभाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी पोलीस अधीक्षक पकंज देशमुख, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बप्पा बहीर, महावितरणचे मुख्य अभियंता धर्मराज पेटकर, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, तहसीलदार गणेश शिंदे, मुख्याधिकारी महेश रोकडे, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक संभाजी होळकर, बारामती सहकारी बँकचे अध्यक्ष सचिन सातव, बऱ्हाणपूरचे सरपंच बाळासाहेबत चांदगुडे आदी उपस्थित होते.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्याची सफारी सुरु होणार : पालकमंत्री आशिष शेलार





जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : बोरिवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्याची सफारी सुरु होणार असून राज्याचे माहिती तंत्रज्ञान तथा सांस्कृतिक कार्य मंत्री आणि मुंबई उपनगर पालकमंत्री ड.आशिष शेलार यांनी याबाबत घोषणा केली. तसेच या उद्यानातील दोन सिंह वर्षभरासाठी त्यांनी दत्तक घेतले आहेत.

मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री शेलार यांनी आज बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा पाहणी दौरा केला. यावेळी उपनगराचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, मुख्य वनसंरक्षक श्रीजी मल्लिकार्जुन, उपसंचालक रेवती कुलकर्णी, सहाय्यक वनरक्षक सुधीर सोनवणे, मुख्य सुरक्षा अधिकारी योगेश महाजन आणि संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये सध्या वाघ आणि सिंहाच्या दोन सफारी उपलब्ध आहेत. महाराष्ट्राच्या विविध भागात बिबट्यांचे सापडलेले बछडे याच उद्यानात संरक्षित करण्यात आलेले आहेत. त्यांचे पालन करण्यात येत आहे. मात्र पर्यटकांना पाहण्यासाठी त्यांची सफारी उपलब्ध नाही. त्यासाठी सुमारे तीस हेक्टर जागा लागणार असून ही जागा या क्षेत्रात उपलब्ध आहे. तर सफारीसाठी प्रकल्प उभारण्यासाठी सुमारे ५ कोटी खर्च अपेक्षित आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या राष्ट्रीय उद्यानाला वर्षभरात २० लाख पर्यटक भेट देतात. जर बिबट्याची सफारी उपलब्ध झाली तर पर्यटकांची संख्या वाढेल व त्यातून वनक्षेत्राचे उत्पन्न वाढेल, अशी माहिती देऊन मुख्य वनरक्षक श्रीजी मल्लिकार्जुन यांनी मंत्री शेलार यांच्यासमोर सादरीकरण केले.

दरम्यान, याबाबत आढावा घेतल्यानंतर मंत्री आशिष शेलार यांनी या क्षेत्रात नवी बिबट्याची सफारी सुरू करा, त्यासाठी लागणारा निधी वन खात्याकडून आणि जिल्हा नियोजन समितीमधून आम्ही देऊ, असे त्यांनी सांगितले. याबाबत तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

## शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या विज्ञान केंद्राचे ९० टक्के काम पूर्णत्वास

जनप्रवास । प्रतिनिधी

नवी मुंबई : नवी मुंबई शहराचा आयकॉनिक ठरणारा महत्वपूर्ण प्रकल्प म्हणजे विज्ञान केंद्र. नेरुळ येथील वंडर्स पार्कलगतच होत असलेल्या विज्ञान केंद्राचे काम पूर्णत्वास आले आहे. केंद्राच्या अवघड अशा डोमसह ९० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. लवकरच विज्ञान केंद्रामध्ये ठेवण्यात येणाऱ्या विज्ञान स्कीटसाठी निविदा काढण्यात येणार असल्याची माहिती पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

१०९ कोटी खर्चाच्या या प्रकल्पाच्या निर्मितीचे काम वेगात सुरू आहे. नवी मुंबई शहराची नवी ओळख म्हणून ठरणाऱ्या प्रकल्पामुळे मुंबई, बंगळूर व पिंपरी चिंचवड शहराप्रमाणेच नवी मुंबईत विज्ञान केंद्र निर्माण आकारास येत आहे. पालिकेने नेरुळ सेक्टर १९ अ वंडर्स पार्कच्या नजिकच दहा हेक्टर भूखंडापैकी दोन हेक्टरचा भूखंड या विज्ञान केंद्रासाठी ठेवला आहे.

येथील संपूर्ण भूखंड चिल्ड्रन पार्क म्हणून सिडकोने राखीव ठेवला होता. काही भागावर वंडर्स पार्क उभारले असून शिल्लक दोन हेक्टर भूखंडावर पालिकेचे देखणे विज्ञान केंद्र आकारास येत आहे. यात जागतिक दर्जाच्या केंद्रात पायाभूत सोयीसुविधा दिल्या जाणार आहेत. विज्ञान केंद्र आजच्या लहान मुलांसाठी आकर्षक, रोजच्या व्यवहारात विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर काय आहे, भविष्यात याचा फायदा याची प्रचिती देणारे ठरावे यासाठी पर्यावरण, जीवन, ऊर्जा, यंत्र व रोबोट, अंतराळ घटकांचा त्याच्यात अंतर्भाव आहे.

## कुष्ठरोग शोध अभियानाअंतर्गत ४९ लाख नागरिकांची महानगरपालिका करणार तपासणी



जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : 'राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमा'च्या मार्गदर्शक तत्वांनुसार २०३० पर्यत कुष्ठरोग निर्मूलनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. लवकरात लवकर शोध घेऊन कुष्ठरोग रुग्णांना औषधोपचाराखाली आणण्यासाठी मुंबई महानगरपालिकेमार्फत विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईतील सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे ३१ जानेवारी ते १५ फेब्रवारी २०२५ दरम्यान कुष्ठरोग शोध अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानादरम्यान मुंबईतील ९ लाख ८९ हजार घरांतील अंदाजित ४९ लाख नागरिकांची तपासणी करण्यात येणार आहे.

मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये कुष्ठरोग शोध तपासणी मोहिमेअंतर्गत शेवटच्या घटकापर्यंत पोहचून नागरिकांची तपासणी करण्याचे निर्देश मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत. तसेच नव्याने आढळणाऱ्या कुष्ठरोग रुग्णांसाठी नजीकच्या परिसरातच उपचाराची सुविधा उपलब्ध करण्याच्या सूचना अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांनी दिल्या आहेत.

कुष्ठरोग शोध अभियान २०२४-२५ अंतर्गत आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन कुष्ठरोगविषयक जनजागृती, तपासणी करणार आहे. कुष्ठरोगाच्या नवीन रुग्णांचा शोध घेणार आहेत. या अभियानाकरिता एकूण २ हजार ८०७ चमू तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक चमूमध्ये एक महिला आरोग्य स्वयंसेविका व स्वयंसेवक यांचा समावेश असेल. या चमूंमार्फत ९ लाख ८९ हजार घरांतील अंदाजित ४९ लाख नागरिकांची तपासणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या अभियानादरम्यान आढळलेल्या नवीन कुष्ठरुग्णांची नोंदणी करण्यात येईल. त्यांना नजिकच्या महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रे, दवाखाने येथे मोफत उपचाराकरिता संदर्भित केले जाईल.

कुष्ठरोगाचे असांसर्गिक कुष्ठरोग व सांसर्गिक कुष्ठरोग असे दोन प्रकार असून बहुविध औषधोपचार पद्धतीने कुष्ठरोग बरा होतो. कुष्ठरोगाच्या प्रकाराप्रमाणे एमडीटीचे औषध असांसर्गिक रुग्णास ६ महिने व सांसर्गिक रुग्णास १ वर्ष एवढ्या कालावधीसाठी देण्यात येते.

# कलाविश्व

## 'गजनी'चा सिक्केल येणार? अल्लू अरविंद आणि आमिर यांची भेट




'मिस्टर परफेक्शनिस्ट' असणाऱ्या आमिर खान यांची मुख्य भूमिका असलेला व अल्लू अरविंद प्रस्तुत 'गजनी' या हिंदी चित्रपटाने २००८ साली तिकिट खिडकीवर दमदार कामगिरी करीत भारतात १०० कोटींच्या क्लबमध्ये स्थान मिळवणारा पहिला हिंदी चित्रपट ठरण्याची किमया साधली होती. 'तंडेल' या चित्रपटाच्या ट्रेलर लाँचच्या निमित्ताने अल्लू अरविंद यांनी 'गजनी' चित्रपटाच्या आठवणींना उजाळा दिला आणि आमिर खान यांच्यासोबत १ हजार कोटींचा व्यवसाय करणाऱ्या सुपरहिट चित्रपटाची निर्मिती करण्याची इच्छाही व्यक्त केली. तसेच हा मोठ्या स्तरावरील चित्रपट 'गजनी'चा सिक्केल 'गजनी २' असू शकतो, अशी शक्यताही वर्तविली आहे.

दरम्यान, अल्लू अरविंद यांच्या वक्तव्याला आमिर खान यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत सध्या समाजमाध्यमांवर 'गजनी'च्या सिक्केलबाबत प्रचंड चर्चा असून प्रेक्षकांना उत्सुकता असल्याचे सांगितले. त्यामुळे अल्लू अरविंद आणि आमिर खान यांची भेट झाल्यानंतर 'गजनी'चा सिक्केल येण्यासंदर्भात प्रेक्षकांमध्ये चर्चा रंगली असून उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

चंदू मोंडेटी दिग्दर्शित आणि अल्लू अरविंद प्रस्तुत 'तंडेल' या चित्रपटाची कथा मच्छीमारांच्या वास्तविक जीवनावर आधारित आहे. या चित्रपटात नागा चैतन्यने श्रीकाकुलम हे पात्र साकारले आहे, तर त्याच्यासह मुख्य भूमिकेत साई पल्लवी दिसणार आहे. या चित्रपटात नागा चैतन्यदेखील एक मच्छीमार आहे. तर बनी वासू यांनी निर्मात्याची आणि देवी श्री प्रसाद यांनी संगीतकाराची धुरा सांभाळली आहे. हा चित्रपट येत्या ७ फेब्रुवारी रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार असून तेलुगू, तमिळ आणि हिंदी या भाषेत प्रेक्षकांना पाहायला मिळेल. या चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा प्रसिद्ध अभिनेते आमिर खान यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार, ३१ जानेवारी रोजी मुंबईत पार पडला. यावेळी चित्रपटातील सर्व कलाकार आणि तंत्रज्ञांनी हजेरी लावली होती. तसेच 'तंडेल' या चित्रपटाचा ट्रेलर उत्तम असून संगीतही अप्रतिम आहे, असे आमिर खान यांनी आवर्जून सांगितले.

## सूरज चव्हाणचा 'झापूक झुपूक' चित्रपट लवकरच येणार प्रेक्षकांच्या भेटीला

'बिग बॉस मराठीचा ५' चा विजेता सूरज चव्हाण लवकरच मराठी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. बिग बॉसच्या पाचव्या पर्वाचा विजेता ठरल्यानंतर दिग्दर्शक केदार शिंदेंनी सूरज चव्हाण(डीरक्ष उहरींरप) प्रमुख भूमिका असलेला झापूक झुपूक सिनेमात दिसणार असे म्हटले होते. त्यानंतर हा चित्रपट कधी प्रदर्शित होणार, याची प्रेक्षकांना उत्सुकता लागली होती. आता स्वत:सूरज चव्हाणच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर चित्रपट कधी प्रेक्षकांच्या भेटीला येणार, हे पाहायला मिळत आहे.

जिओ स्टुडिओ मराठीने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये सूरज चव्हाणचा चित्रपटातील लूक पाहायला मिळत असून, झापुक झुपूक हा सिनेमा केव्हा प्रदर्शित होणार, हे जाहीर केले आहे. ही पोस्ट शेअर करताना जिओ स्टुडिओने सूरज चव्हाण व चित्रपटाचे दिग्दर्शक केदार शिंदे यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटला टॅग केले आहे. सूरजच्या लूकबद्दल बोलायचे तर त्याने धोतर नेसले आहे, त्यावर कुर्ता घातला आहे. व त्यावर कोट घातल्याचे दिसत आहे. हातात अंगठ्या, मनगटावर घड्याळ, गळ्यात सोन्याची चैन, डोळ्यांवर गॉगल व चेहऱ्यावर मोठे हसू अशा लूकमध्ये सूरज चव्हाण दिसत आहे. त्याच्या शेजारी दोन डॉल्बी पाहायला मिळत आहेत. तसेच झापुक झुपूक असे ऐकायला येत आहे. हा व्हिडीओ शेअर करत जिओ स्टुडिओने, करूया श्रीगणेशा, माघी गणपतीच्या मुहूर्तावर. बाप्पाच्या आशीर्वादाने येतोय. तुमच्यातलाच माणूस, तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात, २५ एप्रिल पासून, 'झापुक झुपूक', असे लिहित झापुक झुपूक हा चित्रपट २५ एप्रिलला प्रदर्शित होणार असल्याचे म्हटले आहे.

# महावितरणचे नवीन टीओडी मीटर; प्रीपेड नव्हे तर आधुनिक तंत्रज्ञानाचे!

## टीओडीमुळे वीजदरात सवलत तर सध्याच्या बिलिंग प्रणालीत बदल

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : नवीन वीजजोडणीसाठी तसेच सदोष व नादुरुस्त मीटर बदलताना आधुनिक तंत्रज्ञानाचे टीओडी वीजमीटर वीजग्राहकांकडे मोफत लावण्यात येत आहेत. हे मीटर प्रीपेड नाहीत. तर सध्याच्या मीटरप्रमाणे पोस्टपेड म्हणजेच वीज वापरानंतर दरमहा बिल या पद्धतीचे आहे. त्यामुळे सध्याच्या बिलिंग प्रणालीमध्ये कोणताही बदल होणार नाही. नव्या टीओडी मीटरमुळे ग्राहकांना त्यांचा वीजवापर नियमितपणे मोबाईल फोनवर समजणार असून अचूक बिलिंग होईल. हा मीटर बसवून ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

घरगुती वीजग्राहकांसाठी स्वस्त वीज दराच्या स्लॅबसाठी टीओडी (टाईम ऑफ डे) प्रणाली, सौर ऊर्जा प्रकल्पासाठी नेटमिटरिंग, स्वयंचलित व अचूक मीटर रीडिंग तसेच वीजवापर किती झाला याची प्रत्येक मिनिटाला मोबाईलवर माहिती कळू शकेल अशा मुख्य सोयी या नव्या वीज मीटरमध्ये आहेत. महावितरणतर्फे बसविण्यात येणारे नवे टीओडी मीटर हे ग्राहकांना मोफत मिळत आहेत.

टीओडी मीटरमुळे वीजदरात सवलतीचा लाभ -* विजेचे दर महावितरणकडून नव्हे, तर मा. विद्युत नियामक आयोगाकडून जनसुनावणी घेऊन निश्चित केले जातात. कमी वीज वापरणाऱ्यांना कमी दर आणि जास्त वीज वापरणाऱ्या श्रीमतांना अधिक दर असे वीजदराचे सूत्र यापुढेही कायम राहणार आहे. एप्रिल महिन्यापासून घरगुती ग्राहकांना टाईम ऑफ डे (टीओडी) प्रमाणे वीज दर लागू होणार आहे. महावितरणने मा. विद्युत नियामक आयोगाकडे सादर केलेल्या वीजदरनिश्चिती प्रस्तावात घरगुती ग्राहकांनी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वीज वापरल्यास सवलत देऊ केली आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी टीओडी मीटर आवश्यक आहे, असे महावितरणकडून सांगण्यात आले.



टीओडी मीटर मोफत अन् प्रीपेडही नाही -* मॅकॅनिकल, इलेक्ट्रोमॅग्नेटिक, इलेक्ट्रॉनिक्स अशा प्रवासानंतर आता वीज मीटरमध्ये डिजिटल तंत्रज्ञान आले आहे. जुन्या मीटरची उपयुक्तता संपल्यानंतर महावितरणकडून नव्या तंत्रज्ञानाचे आधुनिक मीटर लावण्यात येतात. सध्या नवीन वीजजोडणी, सदोष व नादुरुस्त ठिकाणी टीओडी मीटर लावण्यात येत आहेत. केंद्र शासनाच्या सुधारित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (आरडीएसएस) महावितरणकडून ॲडव्हान्स मीटरिंग इन्फ्रास्ट्रक्चरसाठी (एएमआय) सेवा पुरवठादारांची (एनसीसी, अदानी, मान्टेकार्लो, जिनस) निविदा प्रक्रियेतून निवड करण्यात आली आहे. या सेवा पुरवठादारांकडून वीजग्राहकांकडे टीओडी मीटर मोफत बसविण्यात येत आहे. यात प्रीपेडची सोय असली तरी प्रीपेडची कोणतीही सक्ती नाही. सध्याच्या पोस्ट पेडप्रमाणे बिलिंग चक्र सुरू राहील.

'आरडीएसएस' योजनेतून आधुनिक डिजिटल मीटर बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून अनुदान मिळणार आहे. उर्वरित सर्व रक्कम महावितरणकडून एकाच वेळी दिली जाणार नाही. तर प्रत्यक्ष लावलेल्या मीटरचीच रक्कम महावितरणकडून सेवा पुरवठादारांना १२० हप्त्यांत (१० वर्षे) देण्यात येईल. ही रक्कम प्राप्त होणाऱ्या नेहमीच्या महसूलामधून देण्यात येणार आहे. तसेच महावितरणच्या नियंत्रणात पुढील १० वर्ष सदोष व नादुरुस्त मीटर बदलण्याची जबाबदारी संबंधित सेवा पुरवठादारांवर राहणार आहे. यामुळे नव्या तंत्रज्ञानाच्या मीटरचा कोणताही आर्थिक भुर्दंड महावितरण व वीजग्राहकांवर स्वतंत्रपणे पडणार नाही. विशेष म्हणजे या नवीन मीटरसाठी महावितरणकडून कोणतेही कर्ज काढण्यात आलेले नाही. कोणताही अतिरिक्त वीज दर आकारण्यात येणार नाही. पर्यायाने नव्या मीटरमुळे वीज दरवाढीवर कोणताही परिणाम होणार नाही. मुख्य म्हणजे सेवा पुरवठादार हे केवळ कंत्राटदार आहेत. नव्या वीज मीटरची मालकी तसेच वीज व ग्राहकसेवेचे सर्व अधिकार सरकारी कंपनी असलेल्या महावितरणकडेच राहणार आहे.

स्वयंचलित मीटर रीडिंगमुळे वीजबिल अचूक -* नव्या डिजिटल वीजमीटरमुळे ग्राहकांनी वापरलेल्या विजेचे अचूक व स्वयंचलित रीडिंग होणार आहे. ग्राहकांना स्वत:च्या मोबाईलवर विजेचे मीटर रीडिंग प्रत्येक मिनिटाला पाहण्याची सोय उपलब्ध आहे. त्यामुळे दरमहा बिलिंग आणखी अचूक होणार आहे. मीटरचा फोटो अस्पष्ट घेणे, विविध कारणांमुळे मीटर रीडिंग घेता न येणे किंवा नादुरूस्त शेऱ्यामुळे सरासरी किंवा अंदाजे युनिटच्या वीजबिलाचे सध्याचे प्रकार बंद होणार आहे. पर्यायाने चुकीच्या वीजबिलांमुळे ग्राहकांना होणारा मनस्ताप देखील टळणार आहे. या सर्व फायद्यांमुळे कोणताही गैरसमज न ठेवता आणि प्रीपेडची सक्ती नसलेल्या नव्या तंत्रज्ञानाचा टीओडी मीटर बसविण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

वीजयंत्रणेमध्ये देखील डिजिटल मीटर -* पुणे परिमंडलातील ३५ हजार ४३६ वितरण रोहित्रे व उपकेंद्रातील १८६३ उच्चदाब वीजवाहिन्यांना नव्या तंत्रज्ञानाचे डिजिटल मीटर लावण्याचे काम पूर्ण होत आहे. त्यामुळे वीज यंत्रणेतील विजेचा हिशेब आणखी अचूक होणार आहे. तसेच कोणत्या ठिकाणी वीजवाहिनीत किंवा रोहित्रात बिघाड झाला हे संबंधित अभियंता व कर्मचाऱ्यांना लगेचच कळणार आहे. परिणामी वीजपुरवठा खंडित राहण्याचा कालावधी कमी होणार आहे. डिजिटल मीटरमुळे विजेची नेमकी मागणी किती आहे याचा निश्चित अंदाज येणार आहे. याप्रमाणे पुण्यासह राज्यात मागणीच्या आवश्यकतेनुसार विजेची खरेदी करता येईल. प्रामुख्याने ऑक्टोबर हिट किंवा उन्हाळ्याच्या कालावधीत विजेची मागणी वाढल्यास ऐनवेळी महागडी वीज खरेदी करणे टाळता येईल. त्याचा महावितरणसह वीजग्राहकांचा देखील आर्थिक फायदा होणार आहे.

**– निशिकांत राऊत,**
**उपमुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण, पुणे**

□ संपादक – संजय प्रल्हाद भोकरे □ सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०-२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com